





# जनमाध्यम

e paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

■ अमरावती, शनिवार ५ जूलै २०२५ ■ मूल्य ३.०० ■ पृष्ठ १०


## शहांसमोर एकनाथ शिंदेंचा 'जय गुजरात'चा नारा



**पुणे/प्रतिनिधी :** आज मी, देवेंद्र फडणवीस आणि अजित पवार एक टीम बनून काम करत आहोत. या राज्याला पुढे घेउन जात आहोत. मी तुम्हाला मनापासून शुभेच्छा देतो. अशीच एकजूट मजबूत ठेवा. या राज्याच्या विकासात आपलही योगदान आहे. आपल्याला उद्योग, व्यवसायात कुठली अडचण येणार नाही असा विश्वास व्यक्तकरतो असे एकनाथ शिंदे म्हणाले. यावेळी अमित शाहंसाठी त्यांनी एक खास शेर म्हटला. भाषण संपवताना उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी जय हिंद, जय महाराष्ट्र, जय गुजरातचा नारा दिला. आजचा दिवस पुन्हा गुजराती समाजासाठी ऐतिहासिक दिवस आहे. इथे कुठल्या गोष्टीची कमतरता नाही. कारण तुम्ही सर्व लक्ष्मीपुत्र आहात. त्यामुळे काही कमी पडण्याचा प्रश्नच येत नाही. मोदीजी ज्या कार्याचे भूमिपूजन करतात ती काम वेगवान गतीने पूर्ण होतात. मी आपला अनुभव सांगतोय, समृद्धी हायवे असो, कोस्टल रोड असो अशी अनेक उदाहरण आहेत. त्यांचे भूमिपूजन आणि उद्घाटन दोन्ही मोदीजींनी केले. या वास्तूच भूमिपूजन मोदीजींनी केले. पण लोकार्पण अमित भाईंच्या हस्ते होतय असे एकनाथ शिंदे म्हणाले. ते कोंढवा बुद्रुक येथे जयराज स्पोर्ट्स आणि कन्व्हेन्शन सेंटरच्या उद्घाटन कार्यक्रमात बोलत होते. एकनाथ शिंदे यांनी या कार्यक्रमात अमित शाह यांचे भरभरुन कौतुक केले. नरेंद्र मोदी आणि अमित शाह आमच्यासाठी वेगळे नाहीत. मोदीजींची सावली म्हणजे अमितभाई आहेत. अमित शाहांचा स्पर्श झाल्यानंतर त्या कार्याचे सोने होते. तुम्ही सर्व लक्ष्मीपुत्र आहात. आंनद दिघे साहेबांचे शब्द मला आठवतात. कुठलही शहर असो, गहसंकूल असो, त्या शहराला बाजारपेठ नसेल तर शोभा वाढत नाही.

## बाजीराव-मस्तानी यांच्या वंशजालाच मंचावर जागा नाही



**पुणे/प्रतिनिधी :** शुक्रवार दि. ४ जुलै रोजी सकाळी ११:३५ वाजता एनडीएमधील श्रीमंत बाजीराव पेशवे यांच्या अश्वारूढ पुतळ्याचे लोकार्पण झाले. या कार्यक्रमासाठी सुरक्षेच्या पार्श्वभूमीवर अनेक मान्यवरांना निमंत्रण देण्यात आले आहे मात्र या कार्यक्रमावर बाजीराव मस्तानी यांचे आठवे वंशज शादाब अली बहादुर पेशवे यांनी नाराजी व्यक्त केली आहे. मात्र या अनावर सोहळयाला उशिरा निमंत्रण मिळाल्याने आणि व्यासपीठावर जागा न मिळाल्याने बाजीराव मस्तानी यांचे आठवे वंशज शादाब अली बहादुर पेशवे यांनी नाराजी व्यक्त केली आहे. 'शेर का बच्चा शेर होता है या बकरी का बच्चा शेर होता है?' असा प्रश्न विचारत थेट आयोजकांवर त्यांनी निशाणा साधला आहे. ज्या पुष्कर पेशव्यांना अमित शहा यांच्या सोबत व्यासपीठावर बसण्याची संधी दिली ते दत्तक पुत्र आहेत. असेही ते म्हणाले. मी बाजीराव पेशव्यांचा रक्ताचा वंशज आहे. मला अशा प्रकारे दिलेली वागणूक अमित शहा यांना देखील आवडणार नसल्याचे सांगत त्यांनी नाराजी व्यक्त केली.

# प्रत्येक क्षेत्रात देशाला अग्रेसर ठेवण्याची प्रेरणा पहिल्या बाजीराव पेशव्यांच्या जीवनचरित्रातून-अमित शाह






**पुणे/प्रतिनिधी :** संपूर्ण विश्वात प्रत्येक क्षेत्रात आपला देश पुढे राहील हे आपले जीवन ध्येय असले पाहिजे, यासाठीची प्रेरणा आणि उर्जा पहिले बाजीराव पेशवे यांच्या जीवनचरित्रातून मिळते, असे प्रतिपादन केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी केले. राष्ट्रीय संरक्षण प्रबोधिनी (एनडीए) परिसरातील त्रिशक्ती गेट येथे उभारण्यात आलेल्या थोरले बाजीराव पेशवे यांच्या अश्वारूढ पुतळ्याच्या अनावरण कार्यक्रमप्रसंगी ते बोलत होते.

यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार, नागरी विमान वाहतूक केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ, उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील, थोरले बाजीराव पेशवे प्रतिष्ठानचे अध्यक्ष एअर मार्शल (नि.) भूषण गोखले, लष्कराच्या दक्षिण कमांडचे प्रमुख ले. जनरल धीरज शेठ, एनडीएचे कमांडंट व्हाईस ॲडमिरल गुरचरण सिंग, खासदार मेधा कुलकर्णी, माजी मंत्री रविंद्र चव्हाण, थोरले बाजीराव पेशवे प्रतिष्ठानचे सचिव कुंदनकुमार साठे आदी उपस्थित होते. केंद्रीय गृहमंत्री श्री.शाह म्हणाले, पहिल्या बाजीरावांनी तंजावर ते अफगाणीस्तानपर्यंत आणि अफगाणीस्तान ते बंगाल कटकपर्यंत मोठ्या हिंदवी साम्राज्याची स्थापना केली जे छत्रपती शिवरायांचे स्वप्न होते. बाजीरावांनी युद्ध नियोजनातील वेग, रणकौशल्य, रणनीती आणि वीर सोबत्यांच्या साथीने अनेक पराभवांना विजयात रुपांतरीत केले. पालखेडच्या विजयाचा अभ्यास बारकाईने केल्यास हा अकल्पनीय होता हे लक्षात येईल. गुलामीचे निशाण उध्वस्त करुन स्वातंर्त्याचा दीप लावण्याचे काम त्यांनी यशस्वीपणे केले. देश-विदेशातील अनेक युद्धकौशल्यातील अभ्यासू सेनानींनी त्यांच्या युद्धकौशल्याविषयी गौरविले आहे. युद्धनीतीचे काही नियम हे कधीच कालबाह्य होत नाहीत. त्यात व्यूहरचना, वेग, सैन्याची समर्पण भावना, देशभक्ती आणि बलिदान भाव सैन्याला विजय मिळवून देतो. गेल्या पाचशे वर्षातील या सर्व गुणांचे उत्कृष्ट उदाहरण पहिले बाजीराव पेशवे आहेत. त्यांनी त्यांच्या २० वर्षाच्या काळात मृत्यूपर्यंत लढलेली सर्व ४१ युद्धे जिंकली, असेही गौरवोद्‌गार केंद्रीय गृहमंत्री यांनी काढले.महान भारताची रचना ही शिवछत्रपतींची प्रेरणा आहे, असे सांगून केंद्रीय गृहमंत्री श्री. शाह म्हणाले, संपूर्ण दक्षिण भारत अनेक जुलमी सत्ताधीरांमुळे पीडित होता आणि उत्तर भारत मुघल साम्राज्याच्या अधीन होता. अशा परिस्थितीत छत्रपती शिवाजी महाराजांनी केवळ हिंदवी स्वराज्याची स्थापनाच केली नाही तर युवक, बालक आदींच्या मनावर स्वराज्याचे संस्कार केले, छत्रपती शिवाजी महाराजांनंतर धर्मवीर संभाजी महाराज, वीर ताराराणी, संताजी -धनाजी आदी अनेक वीरांनी स्वराज्याची ज्योत विझू दिली नाही. त्यानंतर छत्रपती शाहू महाराजांनी बाळाजी विश्वाथ आणि नंतर पहिल्या बाजीरावांची पेशवा म्हणून नेमणूक केल्यानंतर त्यांनी स्वराज्याची ज्योत तेवत ठेवली.पहिले बाजीराव यांचे स्मारक बनविण्याची सर्वात उचित जागा कोणती असेल तर ती 'एनडीएच'. कारण येथून देशाच्या तिन्ही सेनादलांचे प्रमुख अधिकारी प्रशिक्षित होउन बाहेर पडत असतात. येथून बाहेर पडताना श्रीमंत बाजीराव पेशवे यांच्या जीवनकाळाचा अभ्यास करून जेव्हा भविष्यातील सेनानी जातील तेव्हा भारताच्या सीमांना स्पर्श करण्याचे धाडस कोणी करणार नाही. भविष्यात स्वराज्य टिकविण्यासाठी संघर्ष करावा लागल्यास आपली सेना आणि नेतृत्व निश्चित करेल. ऑपरेशन सिंदूर हे याचे उदाहरण आहे, असेही ते म्हणाले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, छत्रपती शिवाजी महाराजांनी जिजाउ माँसाहेबांच्या मार्गदर्शनाखाली जनतेला एक करून मुघल साम्राज्याच्या चारही आक्रमकांना सळो की पळो करून सोडले. या प्रेरणेतून अनेक पराक्रमी योद्धे तयार झाले. छत्रपती शिवाजी महाराजांच्या साम्राज्याला विस्तारित करण्याचा श्रीमंत बाजीराव पेशवे यांचा इतिहास आहे. त्यांनी लढलेल्या ४१ लढायापैकी एक ही लढाईत पराभव स्वीकारला नाही. उत्तरेला काबूलपर्यंत आणि पूर्वेला बंगालपर्यंत मराठी साम्राज्यचा विस्तार करण्याचे काम थोरल्या बाजीराव पेशव्यांनी केले. वेग ही त्यांची सर्वात मोठी रणनीती होती.

'समृद्धी' ठरतोय मृत्यूचा महामार्ग

## भीषण अपघातात एकाच कुटुंबातील 4 ठार

**अकोला/प्रतिनिधी :** हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे समृद्धी महामार्गावर वाशीम जिल्ह्यातील वनोजा आणि कारंजा दरम्यान चॅनल क्र. २१५ जवळ भीषण अपघातात एकाच कुटुंबातील चार जणांचा दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना गुरुवारी रात्री घडली. या अपघातात एक जण गंभीर जखमी झाला आहे. भरधाव मोटारीवरील चालकाचे नियंत्रण सुटल्याने ती दुभाजकावर जाउन आदळली. या भीषण अपघातात दोघांचा घटनास्थळीच, तर दोघांचा उपचारादरम्यान मृत्यू झाला.समृद्धी महामार्गावर अपघाताच्या घटनांमध्ये सातत्याने वाढ होत असल्याचे दिसून येते. नागपूर जिल्ह्यातील उमरेड येथील जयस्वाल कुटुंबीय पुण्यात एका नामकरण समारंभासाठी गेले होते. कार्यक्रम आटोपून ते नागपूर (उमरेड)कडे परत येत होते. दरम्यान, चालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटले. त्यामुळे कार महामार्गावरील दुभाजकावर आदळली. या भीषण अपघातात वैदही जयस्वाल, माधुरी जयस्वाल, संगीता जयस्वाल आणि राधेश्याम जयस्वाल या एकाच कुटुंबातील चार जणांचा दुर्दैवी मृत्यू झाला. दोघांचा घटनास्थळीच, तर अन्य दोघांची उपचारादरम्यान प्राण ज्योत मालवली. एक जण गंभीर जखमी असून त्याच्यावर वाशीम येथील रुग्णालयात उपचार केले जात आहेत.



अपघाताची माहिती मिळताच समृद्धी महामार्गावरील बचाव पथक आणि महामार्ग पोलीस घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी जखमींना तातडीने रुग्णालयात हलवले. पोलिसांनी पंचनामा करून पुढील तपास सुरू केला आहे. (पान २ वर)

## देशांतर्गत बाबींमध्ये हस्तक्षेप करू नका

### दलाई लामांना पाठिंबा दिल्याने चीन संतापला

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** बौद्ध धर्मगुरू दलाई लामा वयाची नव्वदी पूर्ण करणार आहेत, त्यामुळे त्यांचा उत्तराधिकारी कोण असेल, याची सध्या सर्वत्र चर्चा सुरू आहे. अवघ्या जगाचे याकडे लक्ष याकडे लागले आहे. त्यांच्या पश्चात तिबेटी बौद्ध परंपरा टिकवून ठेवणे आवश्यक असल्याने, उत्तराधिकारी हा अतिशय महत्त्वाचा असतो. यातच चीनचा तिबेटवर डोळा असल्याने, या प्रक्रियेत हस्तक्षेप करण्याचा प्रयत्न चीनकडून केला जातोय. दरम्यान, या प्रकरणात भारताने केलेल्या वक्तव्यावर चीनची प्रतिक्रिया आली आहे. केंद्रीय अल्पसंख्याक व्यवहार मंत्री किरेन रिजिजू यांनी चीनला ठामपणे सांगितले की, 'दलाई लामा यांना त्यांच्या इच्छेनुसार उत्तराधिकारी निवडण्याचा अधिकार आहे. दलाई लामांच्या उत्तराधिकारीची निवड केवळ स्थापित परंपरा आणि दलाई लामांच्या इच्छेनुसारच केली (पान २ वर)



## शेगावचे श्री संत गजानन महाराज मंदिर शनिवारी रात्रभर खुले राहणार

**बुलढाणा/प्रतिनिधी :** आषाढी एकादशीच्या निमित्ताने जे भाविक श्री क्षेत्र पंढरपूर येथे जाउ न शकले नाहीत ते भाविक विदर्भातील प्रति पंढरी म्हणून विख्यात असलेल्या श्री संत गजानन महाराज संस्थान शेगाव येथे दर्शन घेण्यासाठी येत असतात. भाविकांची गर्दी लक्षात घेता श्री संस्थानच्या वतीने शनिवार, ५ जुलै रोजी श्रींचे मंदिर रात्रभर खुले ठेवण्यात येणार आहे.रविवार आषाढी एकादशी



निमित्त, मराठवाडा, जळगाव खान्देश, विदर्भातील विविध जिल्ह्यांतील हजारो भाविक श्रींच्या समाधी दर्शनासाठी येतात. यामुळे (पान २ वर)






सोमनाथ सूर्यवंशी कोठडीतील मृत्यू प्रकरण

## पोलिसांवर गुन्हा दाखल करण्याचे न्यायालयाचे आदेश

**छत्रपती संभाजीनगर/परभणी/ प्रतिनिधी :** परभणी येथील न्यायालयीन कोठडीत मृत्यू पावलेल्या सोमनाथ सूर्यवंशी प्रकरणात, मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने महत्त्वाचा आदेश दिला आहे. न्यायमूर्ती विभा कंकणवाडी आणि न्यायमूर्ती संजय देशमुख यांच्या खंडपीठाने, सोमनाथच्या आई विजयाताई सूर्यवंशी यांनी दाखल केलेल्या याचिकेच्या पार्श्वभूमीवर, संबंधित पोलीस कर्मचा-यांविरोधात आठ दिवसांच्या आत गुन्हा दाखल करण्याचे निर्देश दिले आहेत. सोमनाथ सूर्यवंशी याला परभणीत संविधान प्रतिकृतीच्या अपमानानंतर उसळलेल्या दंगलीनंतर पोलिसांनी अटक केली होती. त्यानंतर न्यायालयीन कोठडीत असताना त्याचा मृत्यू झाला. (पान २ वर)




## लाडक्या बहिणींना कर्ज देण्याचा कोणताही विचार नाही-आदिती तटकरे

**मुंबई/प्रतिनिधी :** दोन महिन्यांपूर्वीच महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी लाडकी बहीण योजनेच्या लाभार्थी महिलांसाठी कर्जाबाबत घोषणा केली होती. त्याला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांनी दुजोराही दिला होता. पण दोन महिन्यांत महिला व बाल कल्याण विभागाच्या मंत्री आदिती तटकरेंनी अशी कोणतीही योजना सध्या सरकारच्या अजेंड्यावर नसल्याचे स्पष्ट केले आहे.

महाराष्ट्र विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनादरम्यान आदिती तटकरेंनी दिलेल्या लेखी उत्तरात हे सांगितले आहे. त्यामुळे अजित पवारांनी केलेल्या घोषणेचे काय झाले? असा प्रश्न आता उपस्थित होत आहे. या वर्षी मे महिन्यात उपमुख्यमंत्री व राज्याचे अर्थमंत्री अजित पवार यांनी मुखेडमध्ये एका कार्यक्रमात बोलताना लाभार्थी महिलांना कर्ज पुरवठा करण्याबाबत अजित पवारांनी घोषणा केली होती. ही कर्ज पुरवण्यासाठी सरकार सहकारी बँका व इतर स्थानिक बँकांसोबत भागीदारी करण्याचा विचार सरकार करत असल्याचे अजित पवार म्हणाले होते.जिल्हा सहकारी बँका माझ्या बहिणींना ३० ते ४० हजारांचे कर्ज देउ शकतात. हे रक्कम त्यांना छोटे व्यवसाय सुरू करण्यासाठीचं भांडवल म्हणून कामी येईल. नंतर या महिलांच्या खात्यात या कर्जाचे हप्ते चुकते करण्यासाठी १५०० रुपये प्रतिमहिना जमा केले जातील असे अजित पवार म्हणाले होते. यासंदर्भात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांनीही लाभार्थी महिलांना मिळणा-या या आर्थिक मदतीतून त्यांना अधिकाधिक फायदा होईल यासाठी राज्य सरकार काम करत आहे. ही योजना कार्यक्षमपणे राबवली जाईल असे म्हटले होते. अजित पवारांनी जाहीर केलेल्या या योजनेसंदर्भात विधानसभेत विचारणा केली असता आदिती तटकरे (पान २ वर)



## सॅनिटरी पॅडच्या पाकिटवर राहुल गांधींचा फोटो

**पटना/वृत्तसंस्था :** बिहार विधानसभा निवडणुकीपूर्वी काँग्रेस बिहारमधील ५ लाख महिलांना सॅनिटरी पॅड वाटणार आहे. या सॅनिटरी पॅडच्या मुखपृष्ठावर राहुल गांधींचा फोटो छापलेला आहे. त्यावर लिहिले आहे, 'माई-बहन मान योजना, गरजू महिलांना मानधन - दरमहा २५०० रुपये.' बिहार प्रदेश काँग्रेसचे अध्यक्ष राजेश कुमार यांनी शुक्रवारी पाटणा येथे पत्रकार परिषदेत सांगितले की, 'आम्ही बिहारमधील महिलांसाठी विशेष तयारी केली आहे. घरोघरी जाउन ५ लाख महिलांना सॅनिटरी पॅड वाटण्याचे आमचे लक्ष्य आहे.'भाजपने याला बिहारच्या महिलांचा अपमान म्हटले आहे. भाजपचे राष्ट्रीय प्रवक्ते अजय आलोक म्हणाले की, हे जाणूनबुजून केलेले घृणास्पद कृत्य आहे. बिहारच्या महिला गरीब असू शकतात, परंतु त्यांचा स्वाभिमान मेलेला नाही. सॅनिटरी नॅपकिनच्या पाकिटांवर राहुल गांधींचा फोटो छापल्याच्या बाबतीत भाजपचे राष्ट्रीय प्रवक्ते अजय आलोक म्हणाले की, यापेक्षा घृणास्पद काहीही असू शकत नाही. मी याला लज्जास्पद म्हणणार नाही... काँग्रेस नेते त्यांच्या घरी जाउन हे सॅनिटरी पॅड वाटतील का ज्यावर राहुल गांधींचा चेहरा चमकत आहे आणि हे लोक बिहारमध्ये महिलांना सॅनिटरी पॅड वाटण्यासाठी गेले आहेत? राहुल गांधी जाहिरातींचे स्टार झाले आहे. ते आता सॅनिटरी पॅडची जाहिरात करत आहे. राजकारण सोडा आणि काहीतरी वेगळं करा. ही मूर्खपणाची पराकाष्ठा आहे. मी याला घृणास्पद कृत्य म्हणेन. आणि हे लोक राहुल गांधींना देशाचे पंतप्रधान बनवण्याचा प्रयत्न करत आहेत. आणि काँग्रेसवाले याला पाठिंबा देत आहेत. या योजनेबाबत अखिल भारतीय महिला काँग्रेसच्या अध्यक्षा अलका लांबा म्हणाल्या, 'आम्ही बिहारमध्ये एक सर्वेक्षण केले आणि धक्कादायक आकडेवारी समोर आली आहे. आजही बिहार आणि आधुनिक भारतात, महिला आणि मुली मासिक पाळीच्या वेळी कापड वापरत आहेत आणि गंभीर आजारांना बळी पडत आहेत. महिला काँग्रेसने जबाबदारी घेतली आहे की आम्ही बिहारमधील आमच्या माता, बहिणी आणि मुलींना मोफत सॅनिटरी व्हेंडिंग मशीन देउ ज्या गरिबीमुळे सॅनिटरी पॅड वापरत नाहीत आणि कापड वापरत आहेत. हे पॅड बिहारच्या महिला तयार करत आहेत आणि त्यामुळे त्यांना रोजगार मिळत आहे.




## अकोला जिल्ह्यात 'कॉलरा'चा उद्रेक; एकाचा मृत्यू

**अकोला/प्रतिनिधी :** जिल्ह्यातील ग्रामीण भागात 'कॉलरा' आजाराचे रुग्ण मोठ्या प्रमाणात आढळून येत आहेत. अकोट तालुक्यातील धामणा बुद्रुक येथील एका रुग्णाचा शासकीय वैद्यकीय महाविद्यालय उपचारादरम्यान मृत्यू झाला. हा रुग्ण कॉलराबाधित असल्याचा अहवाल प्रयोगशाळेने दिला आहे. त्यामुळे या गावात कॉलरा उद्रेक जाहिर करण्यात आला असून, प्रतिबंधात्मक कार्यवाही व उपचार सुरू करण्यात आल्याची माहिती आरोग्य विभागाकडून देण्यात आली. कॉलरा हा एक तीव्र अतिसार आणि उलट्या होणारा रोग आहे. हा रोग दूषित पाणी किंवा अन्नातून पसरतो. या रोगावर वेळेवर उपचार न झाल्यास, निर्जलीकरणामुळे मृत्यू देखील होउ शकतो. याच प्रकारे जिल्ह्यातील धामणा गावातील एका रुग्णाचा कॉलरामुळे मृत्यू झाला. कॉलरा व्हिब्रिओ कॉलरे नावाच्या बॅक्टेरियामुळे होतो. हा बॅक्टेरिया दूषित पाण्यात किंवा अन्नातून शरीरात प्रवेश करतो. तीव्र अतिसार, उलट्या, निर्जलीकरण, स्नायू पेटके, थकवा,अशक्तपणा आदी कॉलराची लक्षण आहेत. ज्या ठिकाणी पिण्याच्या पाण्याची सोय नसते, तिथे 'कॉलरा'चा धोका वाढतो. ग्रामीण भागात नागरिकांना 'कॉलरा' रोगाची लागण झाल्याची लक्षणे दिसून येत आहे.

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

## धडकी भरवणारी घटना!

# बिबट्याची दुचाकीवर झडप

### पंजांच्या फटक्याने मुलगी जखमी; वनविभाग सतर्क, नागरिकांत भीतीचे वातावरण

अमरावती - राजूरा मार्गावर बुधवारी सायंकाळी जंगलालगत घडलेली एक घटना अक्षरशः थरकाप उडवणारी ठरली. मासोद गावाजवळील पाण्याच्या टाकीसमोरील रस्त्यावरून जात असलेल्या कुटुंबाच्या दुचाकीवर अचानक बिबट्याने झडप घेतली, यात दुचाकीवरील एका मुलीच्या पायाला दुखापत झाली. सुदैवाने इतर सदस्य बचावले. ही घटना बुधवारी सायंकाळी ७ वाजण्याच्या सुमारास घडली. या घटनेने संपूर्ण परिसरात भीतीचं वातावरण निर्माण झालं असून, वनविभाग आणि ग्रामपंचायतीकडून सतर्कतेचे निर्देश देण्यात आले आहेत. निलेश डोईफोडे हे आपल्या पत्नी आणि दोन मुलींना घेऊन राजूराकडून अमरावतीला शैक्षणिक साहित्य खरेदीसाठी निघाले होते. वाटेत, जंगलातून बिबट्या मागे लागल्याचे त्यांना साईड मिररमध्ये दिसले. त्यांनी तातडीने दुचाकीचा वेग वाढवण्याचा प्रयत्न केला. मात्र काही क्षणातच बिबट्याने उडी मारून थेट दुचाकीवर झडप घेतली. या हल्ल्यात दुचाकीवरील



एका मुलीच्या पायाला बिबट्याच्या पंजाचा फटका बसून जखम झाली. प्रसंगावधान राखत निलेश डोईफोडे यांनी दुचाकीला बाजूला नेले आणि सर्व जण सुरक्षित स्थळी पोहोचले. घटनेची माहिती मिळताच वडाळी वनपरिक्षेत्र अधिकारी वर्षा हरणे यांच्या मार्गदर्शनाखाली वनविभागाचे पथक घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी बिबट्याच्या हालचालींचा पंचनामा केला आणि परिसरात सतत गस्त व लक्ष ठेवण्याचे आश्वासन दिले. या घटनेनंतर ग्रामपंचायतीला अधिकृत सूचना देण्यात आल्या असून, जंगलालगत राहणाऱ्या नागरिकांनी विशेषत: महिला व शालेय विद्यार्थ्यांनी सावधगिरी बाळगावी, असे वनविभागाकडून आवाहन करण्यात आले आहे. बिबट्यासारखा वन्यप्राणी दिसल्यास नागरिकांनी तत्काळ वनविभागाच्या टोल-फ्री क्रमांकावर माहिती द्यावी, असे आवाहन उपवनसंरक्षक धैर्यशील पाटील यांनी केले आहे. बिबट्यापासून सावध राहण्यासंदर्भात फलकही लावण्यात आले आहेत.

# सहदुय्यम निबंधक पदाचा पदभार स्वीकारताच अधिकाऱ्याचा मृत्यू

### आर्णी तहसील कार्यालयाची घटना

यवतमाळ - नियमित अधिकाऱ्याच्या अनुपस्थितीत सह दुय्यम निबंधक म्हणून अतिरिक्त पदभार स्वीकारला. मात्र त्यानंतर अवघ्या काही तासातच नियतीने डाव साधला. चार्ज घेतल्यानंतर काही वेळातच तहसील कार्यालयातील युवा पदाधिकाऱ्याचा हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना समोर आली आहे. यामुळे हळहळ व्यक्त केली जात आहे. आर्णी तालुक्यात ही दुर्दैवी घटना घडल्याचे समोर आले आहे. येथील तहसील कार्यालयात सह दुय्यम निबंधक यांचे कार्यालय आहे. या ठिकाणी नियमित अधिकारी कामानिमित्त सुट्टीवर होते. त्यामुळे या पदाचा अतिरिक्त पदभार घाटंजी येथील ३५ वर्षीय कनिष्ठ लिपीक अनिकेत अन्नमवाड यांना देण्यात आला होता.अनिकेत अन्नमवाड हे नांदेड जिल्ह्यातील मूळ रहिवासी आहेत. अन्नमवाड यांनी चार्ज घेतला



आणि थोड्याच वेळातच त्यांना अस्वस्थ वाटू लागले. तसेच छातीत तीव्र वेदना होऊ लागल्या. छातीत दुखून आल्याने त्यांनी लगेच आर्णी येथील रुग्णालयात जाण्याचा निर्णय घेतला. तिथे त्यांचा ईसीजी काढण्यात आला असता डॉक्टरांनी त्यांना यवतमाळ येथे पुढील उपचारासाठी जाण्यास सांगितले. मात्र वाटेत असतानाच अनिकेत अन्नमवाड यांना हृदयविकाराच्या दुसरा झटका आल्याने त्यांचा यात दुर्दैवी मृत्यू झाला. ही घटना गुरुवारी दुपारी सुमारास आर्णी येथे घडली.

## दहा दिवसांपूर्वीच झाले दुसरे बाळ

अनिकेत अन्नमवाड यांच्या पत्नीची दहा दिवसांपूर्वीच प्रसूती झाली होती. दुसरे बाळ झाले असल्याने ते पत्नीच्या डिलिव्हरी निमित्ताने सुट्टीवर होते. सुट्टीनंतर लगेच त्यांनी ऑफिस जॉईन केलं आणि ही दुर्दैवी घटना घडली. सन २०१६ मध्ये त्यांची कनिष्ठ लिपीक म्हणून यवतमाळ येथील दुय्यम निबंधक कार्यालयात निवड झाली होती. त्यानंतर ते अनेक वर्ष झरी तालुक्यात कार्यरत होते. अनिकेत अन्नमवाड यांच्या पश्चात पत्नी, दहा दिवसांच्या लेकरासह दोन मुलं आणि आई-वडील, तसेच मोठा आप्त परिवार आहे.

# डॉ नितीन धांडे यांनी घेतली मनपा आयुक्त सौम्या शर्मा यांची भेट

**अमरावती** — अमरावती महानगरपालिकेच्या नवनियुक्त आयुक्त सौ. सौम्या शर्मा यांची भारतीय जनता पक्षाचे शहर जिल्हाध्यक्ष डॉ. नितीनजी धांडे यांच्या नेतृत्वाखाली शिष्टमंडळाने सदिच्छा भेट घेऊन शुभेच्छा दिल्या. या प्रसंगी माजी महापौर संजय नरवणे, माजी सभागृहनेता सुनिल काळे, माजी स्थायी समिती सभापती राधाताई कुरील, माजी समिती सभापती सचिन रासने, ललित समदुरकर, राजू कुरील हे उपस्थित होते. शिष्टमंडळाने आयुक्तांशी अमरावती शहरातील विविध ज्वलंत समस्यांवर सविस्तर चर्चा केली. शहरातील दैनंदिन स्वच्छतेच्या अडचणी, करारनाम्यांमध्ये फॉगिंग व फवारणी व्यवस्था नसणे, कुत्र्यांचे वाढते प्रमाण, सीसीटीव्हीची गरज, तसेच महिला सुरक्षेच्या दृष्टीने आवश्यक पावले उचलण्याबाबत चर्चा झाली. शहरातील आरोग्य व्यवस्था सक्षम करण्यासाठी हेल्थ अँड वेलनेस सेंटर पूर्ण क्षमतेने सुरू करणे, औषधांचा नियमित पुरवठा, आणि दवाखान्यांमध्ये सुविधा उपलब्ध करून देण्याचे मुद्दे मांडण्यात आले. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक सुविधांसाठी शाळांमध्ये नवीन वर्ग खोल्यांचे बांधकाम, डिजिटल लॅब, शौचालय व सीसीटीव्हीची मागणी केली. तसेच भुयारी गटार योजना, ५० ई-बस लवकर मिळवण्यासाठी पाठपुरावा, महिला बचत गटांसाठी मॉलचे बांधकाम, आणि अमृत योजनेअंतर्गत २४×७ पाणीपुरवठ्याची कार्यवाही यावर चर्चा झाली. यावर आयुक्त सौ. शर्मा यांनी स्वच्छता व इतर कामांवर कार्य सुरू असल्याचे सांगून, उर्वरित विषयांवर लवकरात लवकर कार्यवाही केली जाईल, असे आश्वासन दिले. तसेच



सर्व प्रकल्पांचा आढावा घेण्यासाठी पालकमंत्री व महसूल मंत्री मा. चंद्रशेखर बावनकुळे यांच्या उपस्थितीत लवकरच बैठक घेण्यात यावी, यासाठी शिष्टमंडळाने लेखी मागणी केली.

पोलिस बंदोबस्त ठेवण्यात आला असून मंत्रालय परिसरात चोख सुरक्षा व्यवस्था तैनात करण्यात आली आहे.

### कचऱ्या सह भीम ब्रिगेड

जागो जागी पडला आहे. राहुल नगर , बिच्छू टेकडी येथे लोकांच्या घरा समोरील नाल्या भरलेल्या असून नालीतील किडे घरात घुसत आहे. त्यांच्या घरातील सदस्य आजारी पडले आहे.त्यांचे आरोग्य हे अतिशय धोकादायक पातळीवर पोहोचले आहे. सार्वजनिक शौचालयात घाण आहे. सफाई कंत्राटदारांना लोकप्रतिनिधींचे बळ असल्याने ते काम करण्यासाठी कोट्यवधी रुपयांची बिल वसूल करून फक्त कागदोपत्री सफाई करत असतात. शहरात मच्छर निर्मूलन, फवारणी, धुवारणी अद्यापही झालेले नाही. प्रत्येक प्रभागात कचरा आणि घाण दिसून पडतो. पावसाळ्यात झाडांची कटाई करण्यात आली परंतु त्यांच्या फांद्या रस्त्यावरच फेकून देण्यात आले आहेत. सफाई कर्मचाऱ्यांची हजेरी हा देखील संशोधनाचा विषय बनला आहे. त्यामुळे जर साफ सफाईकडे ध्यान दिले नाही, तर मोठ्या आंदोलन करण्याचा इशारा दिला. आंदोलन करणाऱ्यांमध्ये राजेश वानखेडे, ज्ञानेश्वर रंगारी, विक्रम तसरे, प्रवीण मोहोड, केवल हिवराळे, अमित कुलकर्णी, शुभम राऊत, अविनाश जाधव, प्रफुल तंतरपाळे, रोशन गवई,अजय खडसे, सोहेल खान, बाबाराव धुर्वे,अजय तायडे, सागर वर्धे, विजय खंडारे, सुरज खिराडे, प्रणय पाटील ,सुरज शिरसाठ, दर्शन धांदे उपस्थित होते.

### पुणे - अमरावती एक्सप्रेसच्या

कर्मचाऱ्यांना घटनाची माहिती दिली. माहिती मिळताच पोलीस कर्मचारी कोच मध्ये पोहोचले. त्यांनी रमेश चौधरी यांना शासकीय रुग्णालय अकोला येथे पाठवले.जेथे डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले. रमेश चौधरी यांचा मुलगा राहुल चौधरी याला घटनेची माहिती देण्यात आली. माहिती मिळतात त्यांचा मुलगा अकोलासाठी रवाना झाला. पोस्टमार्टम नंतर मृतदेह कुटुंबीयांच्या स्वाधीन करण्यात आले. या घटनेने परिसरात खळबळ उडाली.

### एसी वायर व पाईप चोरणारे

आधारे आरोपी आशिलदास पवार व विक्की भोसले यांना अटक केली.आरोपींनी चोरीची कबूली दिली. त्यांच्याकडून आर आर कंपनीची नेट केबल १४०० मीटर, किं १ लाख २४ हजार, आरआर कंपनीचे केबल वायर २०० मीटर किं.३० हजार, मल्टीस्टेट वायर ४०० मीटर किं.१६,८००, १.५ एम एम मल्टीस्टेट केबल वायर ४०० मीटर कि.१३,२०० , कॉपर पाईप ३०० फुट किं. ८१००० असा एकूण २ लाख ६५ हजार चा मुद्देमाल जप्त केला. पोलीस आयुक्त अरविंद चावरिया, उपायुक्त श्याम घुगे, सहाय्यक आयुक्त जयदत्त भवंर यांच्या मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक मनोहर कोटनाके, रामदास पालवे, विजय गीते, रंगराव जाधव, हरीश बुंदिले, प्रमोद हरणे ,आकाश इंगोले, सुकेशनि चक्रनारायण, मोनाली मोकळकर, आनंद जाधव यांनी सहभाग घेतला.

### वृक्ष लागवडीची बनवा

आरएफओ यांना देण्यात आला की तुम्ही तुमच्या खर्चाने त्याच ठिकाणी पुन्हा मोठमोठे अंदाजे ६ ते ७ फिटचे झाडे लावा. बाकी तक्रारकर्ते यांच्या तक्रारी खोट्या आहेत हे वरिष्ठ कडे शाबित करणार, असा गुरुमंत्र डीएफओ यांनी आरएफओ यांना देताच. आरएफओ पुन्हा लागले कामाला आणि पुन्हा अमरावती जिल्ह्यातील रोपवाटिका मार्डी येथून २ ट्रक झाडे बोलवून पुन्हा त्याच ठिकाणी ३ जुलै पासून वृक्षारोपण सुरू केलेले आहे. ऐसा विचित्र वृक्षारोपणचा खेळ हा बहुतेक महाराष्ट्रात अचलपूर तालुक्यातच सुरू आहे का अजून कुठे सुरू आहे. या प्रति आदिवासी पर्यावरण सामाजिक संघटना अध्यक्ष योगेश खानझोडे, सुरेश प्रजापती, प्यारेलाल प्रजापती, गोंडवाघूलीचे वृक्ष मित्र राजाराम कारले, संतोष भालेराव, फिरोजखान यांनी गेल्या दोन वर्षापासून सातत्याने पाठपुरावा शासन कडून घेत वृक्ष बचाव मोहीम हातात घेतली आहे. लालच व दबावला न भीत अजूनही कठोर कारवाई होईपर्यंत आम्ही थांबनार नाही ऐसा संकल्प घेतला आहे. वनविभागाच्या वृक्षतोड वनाकर्तेपणा प्रति आदिवासी पर्यावरण संघटना पदाधिकारी व तक्रारकर्ते यांनी पालकमंत्री, विभागीय आयुक्त अमरावती, पीसीसीएफ नागपूर,जिल्हाधिकारी अमरावती,सीसीएफ अमरावती,डीएफओ अमरावती यांना तक्रार दिल्या वर माहिती नुसार आरएफओ वॉलके व वनपाल हाते यांना जवाब मागितला आहे. आणि झालेल्या वृक्षांची नुकसानभरपाई दोन्ही अधिकारी स्वतः करतील अशी माहिती प्राप्त झाली आहे.

## १ व १० वरिल उर्वरित

### भीषण अपघातात एकाच

प्रवासादरम्यान जयस्वाल कुटुंबीयांनी मेहकर येथील नातेवाइकांच्या घरी थोडा वेळ विश्रांती घेतली होती. नातेवाइकांच्या विनंतीनंतरही ते थांबले नाहीत आणि पुढचा प्रवास सुरू केला. काही अंतर गेल्यानंतरच हा दुर्दैवी अपघात घडला. या अपघातामुळे संपूर्ण परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे.

**महामार्गाच्या सुरक्षेवर प्रश्नचिन्ह-** अत्याधुनिक पद्धतीने समृद्धी द्रुतगती महामार्ग तयार केल्या गेला आहे. नियमित घडणा-या अपघातांमुळे मात्र या महामार्गाच्या सुरक्षेवर प्रश्नचिन्ह लागले. अपघातासाठी मानवी चुकांसह विविध कारणे समोर आली आहेत. यासाठी उपाययोजना देखील करण्यात आल्या. मात्र, तरी देखील अपघाताचे प्रमाण कमी झालेले नाही. समृद्धी महामार्गावरील प्रवास विनाअडथळा पूर्ण होतो. त्यामुळे वाहन चालक देखील निर्धास्त राहतात. लवकर प्रवास पूर्ण करण्यासाठी चालक थांबा न घेता अनेक तास वाहन चालवत असतात. थकव्यामुळे चालकाला डुलकी लागून अपघाताचा अनर्थ घडतो. बहुतांश अपघात हे चालकाला डुलकी लागल्यामुळेच घडल्याचे समोर आले.

### देशांतर्गत बाबींमध्ये हस्तक्षेप

जाईल. यामध्ये इतर कोणालाही अधिकार नाही. चीनने यात हस्तक्षेप करू नये.' या वक्तव्यावर आता चीनने आक्षेप घेतला असून, तिबेटशी संबंधित मुद्द्यांवर भारताने सावध विधाने करावी, जेणेकरून द्विपक्षीय संबंधांच्या सुधारणेवर त्याचा परिणाम होणार नाही, असे चीनने म्हटले आहे. नाही.

रिजिजू यांच्या वक्तव्यावरील प्रश्नाला उत्तर देताना, चीनच्या परराष्ट्र मंत्रालयाचे प्रवक्ते माओ निंग यांनी पत्रकार परिषदेत सांगितले की, भारताने १४ व्या दलाई लामांच्या चीनविरोधी फुटीरतावादी स्वरुपाबद्दल स्पष्ट असले पाहिजे. शिवाय, झिझांग (तिबेट) शी संबंधित मुद्द्यांवर त्याच्या वचनबद्धतेचा आदर करावा. चीन तिबेटला झिझांग म्हणतो. माओ पुढे म्हणाले की, भारताने आपल्या शब्दात आणि कृतीत सावधगिरी बाळगावी. झिझांगशी संबंधित मुद्द्यांवर चीनच्या अंतर्गत बाबींमध्ये हस्तक्षेप करणे थांबवावे आणि चीन-भारत संबंधांच्या सुधारणा आणि विकासावर परिणाम करणारे मुद्दे टाळावेत.

दलाई लामांच्या निवडीसाठी चिनी कायदे पाळले पाहिजेत - माओ

माओ यांनी चीनच्या भूमिकेचा पुनरुच्चार करताना म्हटले की, दलाई लामा आणि तिबेटी बौद्ध धर्माचे दुसरे सर्वोच्च धार्मिक नेते पंचेन लामा यांच्या उत्तराधिकारीसाठीची निवड सुवर्ण कलशातून काढलेल्या भाग्य पत्रानुसार आणि केंद्र सरकारच्या मान्यतेनुसार कठोर धार्मिक विधी आणि ऐतिहासिक परंपरांनुसार असावी. सध्याचे १४ वे दलाई लामा या प्रक्रियेतून गेले होते आणि तत्कालीन केंद्र सरकारने त्यांना मान्यता दिली होती. दलाई लामा यांचा उत्तराधिकारी निवडताना ही तत्त्वे, धार्मिक विधी, ऐतिहासिक परंपरा, चिनी कायदे आणि नियमांचे पालन केले पाहिजे, असेही त्यांनी म्हटले.

### शेगावचे श्री संत गजानन

होणारी मोठी गर्दी, दर्शनासाठी लागणा-या दीर्घ रांगा, भाविकांची गैरसोय लक्षात घेता हा निर्णय घेण्यात आला आहे. आषाढी एकादशी निमित्त श्रींच्या मंदिरात धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. यामध्ये काकडा भजन, दुपारी प्रवचन, सायंकाळी हरिपाठ व श्रींच्या पालखीची मंदिर परिक्रमा होणार आहे, रात्री ८ ते १० वाजेदरम्यान कीर्तन होणार आहे. ५ जुलैच्या रात्री आणि ६ जुलैला दिवसभर मंदिरांमध्ये जाउन दर्शन घेता येईल. दर्शनबारी व श्रीमुख दर्शनबारी, महाप्रसाद, पारायण व्यवस्था करण्यात आली आहे. तसेच भक्तांच्या सोयीसाठी संस्थानच्या भक्तनिवासामध्ये नियमानुसार अल्पदरात राहण्याची व्यवस्था नित्याप्रमाणे सुरू आहे. भाविकांना कोणताही त्रास होउ नये यासाठी श्रींचे सेवेकरी आपली सेवा देण्यास तत्पर आहेत.

### पोलिसांवर गुन्हा दाखल करण्याचे

हा मृत्यू अनैसर्गिक असल्याचे नमूद करून त्याचा तपास सीआयडीकडे वर्ग करण्यात आला. दरम्यान, सोमनाथच्या आई विजयाताई सूर्यवंशी यांनी या प्रकरणी उच्च न्यालायच्या औरंगाबाद खंडपीठात याचिका दाखल केली. या प्रकरणात प्रथम वर्ग न्यायदंडाधिका-यांनी केलेल्या चौकशीत तब्बल ७२ पोलिसांवर ठपका ठेवण्यात आला आहे. अन्य मागण्यांवरील सुनावणी ३० जुलै रोजी होणार आहे. ९ जून रोजी झालेल्या सुनावणीत ॲड. प्रकाश आंबेडकर यांनी याचिकाकर्ती विजयाताई सूर्यवंशी यांच्यावतीने युक्तिवाद सादर केला. त्यांनी न्यायालयाच्या निदर्शनास आणून दिले की, भारतीय न्याय संहितेच्या (BNS) कलम १९६ नुसार कोठडीतील मृत्यूची चौकशी प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी करतात, मात्र त्यानंतरची कायदेशीर पावले कोणती हे स्पष्ट केलेले नाही. त्यामुळे अशा प्रकरणांत पुढील कार्यवाहीसाठी नियमावली ठरवण्याची गरज आहे, असे त्यांनी सुचवले.

त्याचप्रमाणे, राज्य सरकारने तपासासाठी सीआयडी नियुक्ती केली असली तरी ती रद्द करून न्यायालयाच्या अधीन राहणारी विशेष तपास समिती (SIT) नेमण्याची मागणीही करण्यात आली. यावर सरकारतर्फे मुख्य सरकारी वकील अमरजितसिंग गिरासे यांनी सांगितले की, १९० हून अधिक साक्षीदारांचे जबाब नोंदवले गेले असून तपास अद्याप पूर्ण झालेला नाही. या प्रकरणात ॲड. प्रकाश आंबेडकर यांना ॲड. मिलिंद संत, ॲड. सिद्धार्थ शिंदे, ॲड. प्रफुल्ल पिंपळगावकर, ॲड. डी. एल. गीलचे, ॲड. राहुल सोनवणे आणि ॲड. कोमल शिंदे यांचे सहकार्य लाभले.

न्यायालयात काय घडलं?

सुनावणीदरम्यान न्यायालयाने सरकारला विचारणा केली की, शवविच्छेदन अहवालावर दुसरे मत घेण्याचा निर्णय पोलीस अधीक्षकांनी कोणत्या नियमाखाली घेतला? तसेच, सीआयडीकडे तपास वर्ग करण्यासाठी काय कायदेशीर आधार होता? आणि सरकारचा अहवाल का स्वीकारावा, याचा खुलासा करण्याचे निर्देश दिले. २८ एप्रिल रोजी झालेल्या सुनावणीत न्यायालयाने चौकशी अहवाल अंतिम करू नये, असे आदेश दिले होते. यावेळी देखील ॲड. आंबेडकर यांनी बाजू मांडताना सांगितले की, या प्रकरणात तपास यंत्रणा आणि गुन्ह्यातील आरोपी हे एकच असल्याने स्वच्छ चौकशी होणे शक्य नाही. प्राथमिक माहिती अहवाल (FIR) पोलिसांवरच दाखल व्हावा आणि विशेष तपास समिती गठीत व्हावी, अशी मागणी त्यांनी केली होती.

### लाडक्या बहिणींना कर्ज देण्याचा

यांनी त्यावर नकारात्मक उत्तर दिले. अशी कोणतीही योजना सध्या सरकारच्या अजेंड्यावर नसल्याचे त्यांनी स्पष्ट केले. आदिती तटकरेंनी विधानसभेत लाडकी बहीण योजनेबाबत निवेदन सादर करताना यासंदर्भातली आकडेवारी दिली. लाडकी बहीण योजनेअंतर्गत लाभार्थी महिलांना १५०० रुपयांचा लाभ मिळावा यासाठी २०२५-२६ या आर्थिक वर्षासाठी तरतूद करण्यात आली आहे. त्यानुसार सामान्य गटातील लाभार्थ्यांसाठी २८ हजार २९० कोटी, अनुसूचित जमाती प्रवर्गातील लाभार्थ्यांसाठी आदिवासी विकास विभागाच्या माध्यमातून ३२४० कोटी आणि सामाजिक न्याय विभागाच्या माध्यमातून अनुसूचित जातींमधील लाभार्थ्यांसाठी ३९६० कोटींची तरतूद केली आहे. त्यानुसार निधी वितरीत करण्यात आला आहे असे तटकरेंनी आपल्या उत्तरात सांगितले. २२८९ सरकारी कर्मचारी महिलाही लाडकी बहीण योजनेच्या लाभार्थ्यांमध्ये होत्या ही बाब आदिती तटकरेंनी विधानसभेत मान्य केली आहे. या महिलांना योजनेसाठी अपात्र ठरवण्यात आल्याची माहितीही त्यांनी यावेळी दिली.

### पुणे-अमरावती एक्सप्रेसच्या

रमेश चौधरी हे गुरुवारी सकाळी पुणे स्टेशनवरून अमरावतीसाठी बी-२ कोचमध्ये बसले होते. गाडी अकोला स्थानकावर प्लॅटफॉर्म क्रमांक दोनवर अर्धा तास थांबली असताना कोचमधील प्रवाशांनी शौचालयाचे दार उघडण्याचा प्रयत्न केला. मात्र दार न उघडल्याने संशय निर्माण झाला. प्रवाशांनी मोठ्या प्रयत्नांनंतर दार उघडले असता चौधरी हे आत मृतावस्थेत आढळले.याची माहिती रेल्वे पोलिसांना देण्यात आली. पोलिसांनी तत्काळ घटनास्थळी पोहोचून चौधरी यांना अकोल्याच्या शासकीय रुग्णालयात हलवले. मात्र डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले. या घटनेची माहिती रमेश चौधरी यांचा मुलगा राहुल चौधरी याला देण्यात आली असून तो अकोलासाठी रवाना झाला. पोस्टमार्टमनंतर मृतदेह कुटुंबीयांच्या ताब्यात देण्यात आला. शुक्रवारी सायंकाळी अमरावती येथे त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात आले. या दुर्दैवी घटनेमुळे प्रवासी वर्गात आणि परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे.

### रमेशचंद्र चौधरी यांच्या पार्थिवावर

हृदयविकाराचा तीव्र झटका बसला व त्यातच त्यांचे प्राणोत्क्रमण झाले बराच वेळ शौचालय बंद असल्याने प्रवाशांनी तक्रार केल्यावर अकोला रेल्वे स्थानकावर रेल्वे पोलिसांनी शौचालयाचे दार उघडले असता रमेशचंद्र चौधरी मृतावस्थेत आढळले. शव विच्छेदनानंतर आज त्यांचे शव अमरावतीला आणण्यात आले. शेकडो चाहत्यांच्या उपस्थितीत त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले.

रमेशचंद्र चौधरीच्या पश्चात पत्नी, १ मुलगा राहुल, विवाहित कन्या डॉ. रश्मी, सून, जावई, नातवंडे व बराच मोठा परिवार आहे.

### बँकांच्या सक्तीच्या वसुलीविरोधात

अधिकाऱ्यांमध्ये खळबळ उडाली असून प्रशासनही अलर्ट मोडवर गेले आहे. शेतकऱ्यांच्या प्रश्नावर बच्चू कडू पुन्हा एकदा रस्त्यावर उतरल्यामुळे या लढ्याला जनतेचा मोठा पाठिंबा मिळत आहे. आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांच्या कर्जमाफीचा मुद्दा अधिक तीव्रतेने पुढे येत असून राज्य सरकारवरही दबाव निर्माण होत आहे.बच्चू कडू यांच्या आक्रमक भूमिकेमुळे शेतकऱ्यांच्या समस्यांकडे पुन्हा एकदा लक्ष वेधले जात आहे. स्टेट बँक तथा अन्य राष्ट्रीयकृत बँका जर धोरणात बदल करीत नाहीत, तर या आंदोलनाची व्याप्ती अधिक वाढू शकते, असे संकेतही मिळत आहेत. या तीव्र आंदोलनामुळे बँकेच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांमध्ये घबराट पसरली असून प्रशासनही सतर्क झाले आहे. शेतकऱ्यांच्या प्रश्नावर पुन्हा एकदा बच्चू कडू आक्रमक पवित्र्यात आल्याने संपूर्ण यंत्रणेत खळबळ उडाली आहे. आंदोलन स्थळी मोठा

No.2

**CIVIL JUDGE SENIOR DIVISION**

**IN THE COURT OF Smt. S.V. Chandak**
**18th Jt. Civil Judge Senior Division, Amravati,Amravati.**

**SUMMONS FOR SETTLEMENT OF ISSUES (O, 5, R, 1, 5)**

**Spl. C.S./121/2025**
**Vishal Babarao Pund Vs Vilas Babarao Boke**
**NEXT DATE: 07.07.2025**

To,
**Ujwala Atul Dhole alias Ujwala Dilip Shelotkar**
**R/o. Nandgaon Khandeshwar,Tq.Nandgaon Khandeshwar,Dist. Amravati**

Whereas **Vishal Babarao Pund** has instituted a suit against you for you are hereby summoned to appear in the Court in person, or by a pleader duly instructed, and able to answer all material questions relating to the suit, or who shall be accompanied by some persons able to answer all such questions, on the **07.07.2025** at **11.00 o'clock in the forenoon,** to answer the claim, and further you are hereby directed to file on that day a written statement of your defence and to produce on the said day all documents in your possession or power upon which you base your defence or claim for set-off or counter-claim, and where you rely on any other document whether in your possession or power or not, as evidence in support of your defence or claim for set-off or counter-claim, you shall enter such documents in a list to be annexed to the written statement.

Take notice, that, in default of your appearance on the day before mentioned, the suit will be heard and determined in your absence.

Given under my hand and the seal of the Court, this **23.06.2025**

**18th Jt. Civil Judge Senior Division**

**Notice -** 1) Should you apprehend your witnesses will not attend of their own accord you can have a summons from this Court to compel the attedance of any witness, and the production of any document that you have a right to call on the witness to produce, on applying to the Court and on depositing the necessary expenses.
2) If you admit the claim, you should pay the money into Court together with the costs of the suit, to avoid execution of the decree, which may be against your person or property, or both.

Visit **ecourts.gov.in** for updates or download mobile app **"eCourts Services"** from Android or IOS.

The process is system generated and transmitted in secured manner by authorised user as such physical signature not applied.

शिक्का
**आदेशानुसार,**
सहाय्यक अधीक्षक
**दिवाणी न्यायालय (व.स्तर), अमरावती**

**जाहीर नोटीस**

**अमरावती येथील विद्यमान जिल्हा व सत्र न्यायाधीश-२ यांचे न्यायालय**

**किरकोळ दिवाणी अर्ज क्र.२८३/२०२५** **ने.ता.११/०७/२०२५**

**पिटीशनर :- सपना अमोल महल्ले व इतर**
**-- विरुध्द --**
**रिस्पांडंट :- निरंक**

**हिंदू मायनॉरीठी ॲड गार्डीयन ॲक्ट १९५६ चे कलम ८ अन्वये स्थावर मालमत्ता शेतजमीन चे विक्री करिता परवानगीसाठी अर्ज**

ज्याअर्थी वरील अर्जदार यांनी अज्ञान पाल्याच्या नावे असलेली खालील वर्णनाची मालमत्ता विकण्याची परवानगी मिळण्याकरिता वि.जिल्हा व सत्र न्यायाधीश-२, अमरावती यांच्या न्यायालयात रितसर अर्ज दाखल केला आहे.

**मालमत्तेचे वर्णन**

मौजा-भातकुली भाग-१ मधील गट नं.२५, ० हे ४७ आर.आकारणी २ रु.६४ पैसे चतुसिमा खालीलप्रमाणे :-
पुर्वेस - दिलीप मंत्री यांचे शेत, पश्चिमेस - नाला
उत्तरेस- विनय महल्ले यांचे शेत दक्षिणेस- अलोक ढोके यांचे शेत

त्याअर्थी सदर अर्जाविरुध्द कारण दाखविण्यास अगर काही हरकती घ्यावयाचे असल्यास अर्जदाराचे सर्व नातलग व हितसंबंधी आणि सर्वत्र लोकांस जाहीर नोटिसव्दारे कळविण्यात येते की, त्यांनी दिनांक ११/०७/२०२५ रोजी सकाळी १०.३० वाजता वि.जिल्हा व सत्र न्यायाधिश-२, अमरावती यांचे न्यायालयात स्वतः किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर व्हावे. वर नमुद केलेल्या तारखेस जर कोणीही हजर न झाल्यास सदहू अर्जाची एकतर्फी सुनावणी होऊन निकाल दिला जाईल.

आज दिनांक ०४/०७/२०२५ रोजी माझे सहीनिशी व कोर्टाचे शिक्क्यानिशी प्रसिध्दीसाठी दिला असे.

**अमरावती**
**दिनांक ०४.०७.२०२५**

शिक्का
**आदेशानुसार,**
**सहायक अधीक्षक (न्यायिक विभाग)**
**जिल्हा व सत्र न्यायालय, अमरावती**

**उपविभागीय अधिकारी, चांदूर रेल्वे यांचे कार्यालय**
**रा.मा.क्र./आर.टी.एस.-६४/सावनेर-२७/ २०१८-२०१९**

**जाहिर नोटीस**

**अर्जदार सौ.जयाताई विलासराव घायवट व इतर १, रा.कापरखेरणा, ता.ठाणे, जि. ठाणे यांनी मालकीच्या मौजा सावनेर, ता.नांदगाव खंडेश्वर, येथील शेत गट क्र.११४/१ क्षेत्रफळ १ हे ६२ आर व शेत गट क्र.१३९/१ क्षेत्रफळ १ हे ६६ आर. या शेतजमिनीबाबत घेण्यात आलेले फेरफार क्र. १०६३, दिनांक ३०/१०/२००२, फेरफार क्र.२६६ दिनांक ०२/०२/२००७ व फेरफार क्र.१६३७/४७ दिनांक १३/०२/२०१६ रोजीचे फेरफार रदद करणेबाबत या कार्यालयात अपिल दाखल केला आहे.**

करिता याव्दारे सर्व लोकांना कळविण्यात येते की, वरील शेतजमिनीसंदर्भात, अपील प्रकरणाविरुध्द ज्या हितसबंधीतांना आक्षेप/हरकती दाखल करावयाच्या असतील किंवा आपले म्हणणे मांडावयाचे असेल त्यांनी सदर जाहीर नोटिस प्रसिध्द केल्यापासून स्वतः किंवा विधी व्यवसायी अभिकर्ता यांचे मार्फत १५ दिवसांचे आंत या कार्यालयामध्ये हजर राहून आक्षेप/हरकती दाखल करावेत. विहीत कालावधीत नंतर प्राप्त झालेल्या आक्षेप/हरकतींचा विचार करण्यात येणार नाही.

**ठिकाण - चांदूर रेल्वे**
**दिनांक -०२/०७/२०२५**

शिक्का
**सही /-**
**उपविभागीय अधिकारी**
**चांदूर रेल्वे**

**तहसिलदार, तिवसा यांचे न्यायालय**
**रा.मा.क्र./एम. आर. सी.-८१// सार्शी/ २०२४-२५**

**क्रमांक : प्रस्तु-१/स.म.अ./ज.मृ.नों./कावि-२३४/२०२५** **दिनांक : २५/०६/२०२५**

**जाहीरनामा**

या द्वारे सर्वत्र नागरीकांना सुचित करण्यात येते की, अर्जदार : **जया पिसाजी बनकर, रा. सार्शी ता. तिवसा जि. अमरावती** यांनी महाराष्ट्र जन्म / मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ चे कलम १३ (३) व जन्म व मृत्यु नोंदणी सुधारणा कायदा, २०२३ भारत राजपत्र दिनांक :११/०८/२०२३ व मा.जिल्हाधिकारी. अमरावती यांचे आदेश क्रमांक : अका/एमएजी/ड-२७/जन्म व मृत्य नोंदणी (सुधा) अधि/आदेश/कावि-८१९/२०२३, दिनांक : २३/१०/२०२३ व सार्वजनिक आरोग्य विभाग, महाराष्ट्र शासन यांचे शासन निर्णय क्रमांक : जमृनों २५२५(/ई. ऑ.९९११८१)/प्र.क्र.२२/कु.क, दिनांक १२ मार्च २०२५ नुसार अर्जदार : अर्जदार : **जया पिसाजी बनकर, रा. सार्शी, ता. तिवसा जि. अमरावती** यांनी यांचा दिनांक ०७/१०/१९५९ रोजी **सार्शी** येथे **जन्म** झाला असल्यामुळे त्याच्या जन्माची नोंद ग्रामपंचायत कार्यालय, सार्शी येथे होण्याकरीता आदेश मिळावा म्हणून अर्ज दाखल केला आहे.

तेव्हा ज्या कोणाला सदर प्रकरणी आक्षेप किंवा हरकती घ्यावयाच्या असतील त्यांनी सदरहू जाहिरनामा प्रसिध्द झाल्यापासून १५ दिवसाचे आत आपल्या आक्षेप अर्ज लेखी आवश्यक पुराव्यासह या कार्यालयात सादर करावा. मुदतीनंतर प्राप्त झालेला आक्षेप अर्ज स्विकारण्यात येणारे नाही तथा त्या अर्जाचा विचार करण्यात येणार नाही, याची नोंद घ्यावी.

**(शिक्का)**
**स्वा /-**
**(मयूर कळसे )**
**तहसीलदार, तिवसा**

# जनमाध्यम

अकोला | वाशिम | बुलडाणा

■ शनिवार, ५ जुलै २०२५ ■ मूल्य ३.०० ■ पृष्ठ ४

एक प्रतिष्ठित सवय

epaper : janmadhyam.com
mail : jmakola.thakur@gmail.com


# जातीय तेढ निर्माण करणा-या लक्ष्मण हाकेवर गुन्हा दाखल करण्याची मागणी

## अकोला जिल्हा राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीकडून पोलीस अधीक्षकांना निवेदन

■ प्रतिनिधी | अकोला ■

**महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री तथा राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे राष्ट्रीय अध्यक्ष ना. अजित पवार यांच्याविरोधात अपमानास्पद व अर्वाच्य वक्तव्य करणाऱ्या लक्ष्मण हाके याच्यावर तात्काळ गुन्हा दाखल करण्यात यावा, अशी मागणी अकोला जिल्हा राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या वतीने जिल्हा पोलीस अधीक्षकांना निवेदन देत करण्यात आली.**



या निवेदनाचे नेतृत्व जिल्हाध्यक्ष मोहम्मद बदरुज्जमा यांनी केले. यावेळी त्यांनी सांगितले की, स्वतःला ओबीसींचा नेता म्हणवणारा लक्ष्मण हाके ओबीसी समाजाची दिशाभूल करत असून त्याच्या खोट्या विधानांमुळे समाजात जातीय तेढ निर्माण होण्याची शक्यता आहे.

हाके यांनी ना. अजित पवार यांनी ओबीसी विद्यार्थ्यांच्या फेलोशिपमध्ये जातीय भेद केला असल्याचे खोटे आरोप केले असून, महाज्योती संस्थेला निधी न दिल्याबाबत चुकीची माहिती समाजात पसरवली आहे. तसेच माळेगाव सहकारी साखर कारखान्याच्या निवडणुकीत अजित पवार यांच्या पॅनलने विजय मिळवल्यानंतर, 'अजितदादांनी मुख्यमंत्रीपद आणि अर्थमंत्री पदाचा राजीनामा देऊन चेअरमन पदाची निवडणूक लढवावी' अशी बेताल व अपमानास्पद टीका केली.

हा प्रकार ना. पवार यांच्या संविधानिक पदाचा अवमान करणारा आहे. लक्ष्मण हाके याला प्रसिद्धीच्या झोतात यायचे असल्यामुळे तो मुद्दामहून अशा प्रकारची वक्तव्य करत असल्याचा आरोपही निवेदनात करण्यात आला आहे.

या निवेदनावेळी जिल्हाध्यक्ष मोहम्मद बदरुज्जमा यांच्यासह अकोला जिल्हा राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे मदन भरगड, सौ. प्रतिभा अवचार, माजी जि.प. सदस्य काशीराम साबळे, माजी जि.प. अध्यक्षा सौ. संध्या वाघोळे, युवक जिल्हाध्यक्ष अमोल काळणे, महिला जिल्हाध्यक्ष सौ. रूपाली वाकोडे, सामाजिक न्याय विभाग जिल्हाध्यक्ष प्रकाश खाडे, सौ. सुषमा राठोड, सेवादल जिल्हाध्यक्ष विनोद कोगदे, विद्यार्थी जिल्हाध्यक्ष उमेर अदनान, रिजवान बाबा, जगदीश मारोडकर, हरिभाऊ वाघोडे, प्रभाकरराव अवचार, अनिल मालगे, गजानन म्हैसने, सिद्धार्थ तायडे, सर्वर बेग, किशोर तेलगोटे, अमोल लोकरे यांच्यासह असंख्य पदाधिकारी उपस्थित होते.

# माजी सभापती आकाश शिरसाट यांच्या वाढदिवसानिमित्त भव्य रक्तदान शिबिर

■ प्रतिनिधी | अकोला ■

## ३०० युवकांचे स्वयंस्फूर्तीने केले रक्तदान




जिल्हा परिषदेचे माजी समाजकल्याण सभापती आकाश शिरसाट यांच्या वाढदिवसानिमित्त भीमनगर येथील त्यांच्या निवासस्थानी भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत ३०० युवकांनी रक्तदान करून समाजासाठी आपली सामाजिक बांधिलकी जपली.

या रक्तदान शिबिरात अकोला जिल्हा रुग्णालयाच्या रक्तपेढी विभागासह जिल्हा स्त्री रुग्णालयाच्या रक्तपेढी विभागाचे डॉक्टर्स आणि तज्ज्ञ पथकांनी सहभाग घेतला. शिबिरात उपस्थित राहून मार्गदर्शन करणाऱ्या वैद्यकीय अधिकाऱ्यांमध्ये डॉ. संतोष दोडेवार, डॉ. अमोल पाचपांडे, डॉ. सुरज पवार, डॉ. कल्पेश सर, शिल्पा सावदेकर, साक्षी टोबरे, संतोष शिरसाट आणि निलेश भावनागरे यांचा समावेश होता.

तसेच जिल्हा स्त्री रुग्णालय, अकोला येथून आलेल्या डॉ. शितल पवार (वर्ग १ रक्तपेढी प्रमुख), डॉ. कुंदन चव्हाण, डॉ. एस. पी. जोशी (रक्तपेढी अधिकारी), मोहम्मद मुशीर, श्रीसंत थोरात (रक्तपेढी तंत्रज्ञ), देवानंदन धांडे, आशिष इंगळे, गोविंदा पाचंगे, संदीप वाघ, कार्तिक पवार, महेश जाधव, गजेंद्र भुयारकार, रविंद्र रणवटे, अनिल काकड आदींची उपस्थिती लाभली. या उपक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी सागर खाडे, आशु वानखडे, स्वप्नील शिरसाट, स्नेहल चक्रनारायण, शिवा वैरागडे, रतन शिरसाट, आनंद दाभाडे, शुभम भारसाकळे, यश शिरसाट, अजय वाहूरवाघ, मंगेश शिरसाट, कपिल नितनवरे, रवी मोरे, किरण मोरे, सोनू हिरोळे, मयूर गिते, रवी सावळे, प्रदीप वरठे यांनी विशेष परिश्रम घेतले. हा उपक्रम केवळ एक सामाजिक कार्य नव्हते, तर तरुणाईला प्रेरणा देणारा आणि रक्तदानाच्या महत्त्वाची जाणीव करून देणारा संदेशही होता. आयोजकांच्या पुढाकारामुळे एक सकारात्मक सामाजिक वातावरण निर्माण झाले आहे.

# आषाढी एकादशीनिमित्त उद्या श्रींचा पालखी सोहळा



■ प्रतिनिधी | कारंजा ■

श्री संत गजानन महाराज संस्थान व सेवा समिती ममतानगर, बायपासच्या वतीने देवशयनी आषाढी एकादशीनिमित्त ६ जुलै रोजी श्रींचा भव्य पालखी सोहळा आयोजित करण्यात आला आहे. हा पालखी सोहळा सकाळी ८.४५ वाजता स्थानिक टेलिकॉम कॉलनी येथील श्री विठ्ठल - रुक्मिणी मंदिराकडे दर्शनासाठी प्रस्थान करणार आहे. श्री संत गजानन महाराज संस्थान व सेवा समिती ममतानगर, बायपासच्या वतीने दरवर्षी आषाढी एकादशीनिमित्त श्रींचा भव्य पालखी सोहळा आयोजित करण्यात येत असतो. सालाबादप्रमाणे यंदाही ही पालखी ६ जुलै रोजी सकाळी ८.४५ वाजता ममतानगर येथील श्रींच्या मंदिरातून श्री विठ्ठल रूक्मिणी मंदिर टेलीकॉम व यशवंत कॉलणी येथील विठुरायाच्या दर्शनासाठी निघणार आहे. पूजनानंतर ही पालखी ममता नगर, गुरुदेव नगर, धर्मकाटा, बायपास, झाशीची राणी चौक या मार्गे निघणार असून त्यात बाहेर जिल्ह्यातून , तालुक्यातून खेड्यापाड्याच्या अकरा दिंड्या सहभागी होणार आहे. श्री विठ्ठल रुक्मिणी संस्थान टेलिकॉम कॉलनी या ठिकाणी दर्शन सोहळा करून त्या ठिकाणी श्रींची आरती व भक्तगण दर्शन घेतात.

# मंगरुळपीरमध्ये बालकामगार मुक्ती मोहीम

■ प्रतिनिधी | वाशिम ■

जिल्हाधिकारी बुवनेश्वरी एस यांच्या निर्देशानुसार व बाल व किशोरवयीन कामगार प्रतिबंध व नियमन अधिनियम, १९८६ (सुधारणा २०१६) अंतर्गत मंगरुळपीर येथे दि. ३ जुलै २०२५ रोजी विशेष धाडसत्र राबविण्यात आले. या मोहिमेदरम्यान दोन आस्थापनांवर छापा टाकून तीन बालकामगारांची मुक्तता करण्यात आली.



या कारवाईत आई जगदंबा ऑटोमोबाईल्स अँड सर्विसिंग सेंटर ( श्याम लुंगे) आणि भोलेनाथ मोटार गॅरेज (अक्षय राऊत) या आस्थापनांमध्ये बालकामगार कार्यरत असल्याचे आढळले. कृती दलाने तत्काळ बालकामगारांची सुटका करून संबंधित मालकांविरुद्ध मंगरुळपीर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला. सदर मोहिमेमागील उद्देश म्हणजे बालकामगार या अनिष्ट प्रथेचे समुळ उच्चाटन करणे. यावेळी आस्थापनांना बालकामगार न ठेवण्याचे स्पष्ट निर्देश देण्यात आले. या कारवाईसाठी कामगार उपआयुक्त अमरावती चंद्रकांत राऊत, सहाय्यक कामगार आयुक्त अकोला राहुल काळे, सहाय्यक कामगार आयुक्त अमरावती श्रीमती श्रद्धा वाघमारे, तसेच सरकारी कामगार अधिकारी वाशिम पंकज खांडेकर यांच्या मार्गदर्शनाखाली कृती दल कार्यरत होते. कारवाईत योगेश गोटे (शॉप इन्स्पेक्टर), निलिमा भोंगाडे (चाईल्ड हेल्पलाईन),

## तीन बालकांची सुटका

श्रीमती शबनम नंदावाले (पोलीस कॉन्स्टेबल), समीर शेख (पोलीस कॉन्स्टेबल) तसेच किशोर शेळके (पोलीस निरीक्षक) आणि काळे सर (एपीआय) यांचे मोलाचे सहकार्य लाभले. सरकारी कामगार अधिकारी वाशिम यांनी नागरिकांना आवाहन केले आहे की, बालकामगार प्रथा रोखण्यासाठी सहकार्य करावे आणि कुठेही बालकामगार आढळल्यास त्वरित तक्रार नोंदवावी.असे आवाहन कामगार विभागाच्या वतीने करण्यात आले आहे.

# रिठद ते अमानी रस्त्याची दुरुस्ती कधी होणार?



■ प्रतिनिधी | मालेगाव ■

तालुक्यात गाव खेड्याचा आढावा घेतला असता प्रत्येक गावातील रस्ते हे अत्यंत दैनंदिन आणि नामशेष होण्याच्या मार्गावर आहेत पूर्वीपासून आजपर्यंत लोकप्रतिनिधींचे संबंधित विभागावर वर्चस्व नसल्याकारणाने मालेगाव तालुक्यातील रस्त्याची अत्यंत दुरावस्था झाली आहे .

रस्त्याची दुरुस्ती भविष्यातही कधी होणार की नाही असा प्रश्न संबंधित मतदार संघातील नागरिकांना पडलेला असताना अमानी पासून ते शेलगाव पर्यंत संबंधित लोकप्रतिनिधीनी निकटवर्तीय कार्यकर्ते नसल्याकारणाने तसेच सर्वच लोकप्रतिनिधी या रस्त्याने ये जा न करणे नसल्याकारणाने त्यांना रस्त्याची स्थिती काय आहे. ती आजपर्यंत वीस वर्षाच्या कालावधीत समजलीच नाही अमानी ते मुठा या रस्त्यावर शाळकरी मुलांना साचलेल्या खड्ड्यातून वाटचाल करून जीव मुठीत धरून शिक्षणाचा गुड पाया रोवत असल्याचे दिसत आहेत आपल्या दिवसाची सुरुवात करावी लागत आहे अनेक हातमाग लघुव्यवसायिक लघुउद्योग,आणि वयोवृद्ध ज्यांना कमरेचा त्रास आहे मणक्याचा त्रास आहे या रस्त्याने ये जा करण्यास अधिकतम त्रासाचे सूत्र हे दिवसेंदिवस वाढत चालले आहे जनता जनार्दन प्रतिनिधित्व करण्याची संधी देते पण वन कॉल प्रॉब्लेम सॉल संबंधित विभागाला संध्याकाळपर्यंत मुरूम खड्ड्यात पडलाच पाहिजे असे शब्दही अधोरेखित आणि अपुरे असलेल्या रस्त्याची भविष्यात तरी दुरुस्ती कधी होणार का आणि शेलगाव ते मुठा या रस्त्याचे डांबरीकरण येणाऱ्या काळात तरी मार्गी लागणार का असा प्रश्न अमानी तसेच रहदारी करणाऱ्या सर्वच गावकऱ्यांना पडला असल्याचे बोलल्या जात आहे.

> अमानी येथील नागरिक विवेक गवळी यांच्या मते अमानी ते मुठा या रस्त्याची दुरुस्ती व्हावी यासाठी अनेकदा विधानसभा आमदार विधान परिषद आमदार लोकसभा खासदार जिल्हाधिकारी कार्यालय सार्वजनिक बांधकाम विभाग मालेगाव यांच्याशी पत्रव्यवहार केले यांना बोललो पण का कुणास ठाऊक संबंधित विभाग काही सुन्नत नाही आणि काम का होत नाही असे चालल्यास संबंधित रस्त्याचा प्रश्न कदाचित भविष्यात तरी मार्गी लागावा हाच उद्देश आहे

# जिल्हा परिषद अनुकंपा यादी जाहीर; २५ उमेदवार पात्र ठरले



■ प्रतिनिधी | अकोला ■

अकोला जिल्हा परिषद अंतर्गत अनुकंपा तत्वावर नोकरीसाठी प्रलंबित असलेल्या ८३ उमेदवारांची ज्येष्ठता यादी शुक्रवारी जिल्हा परिषदेच्या अधिकृत संकेतस्थळावर पारदर्शक पद्धतीने प्रसिद्ध करण्यात आली आहे. या यादीत शासनाच्या निकषानुसार २५ उमेदवार पात्र ठरले असून, त्यांना लवकरच ज्येष्ठतेनुसार अनुकंपा तत्वावर नियुक्ती देण्यात येणार आहे.


जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी अनिता मेश्राम यांनी १५० दिवसांच्या कृती आराखड्यात या प्रक्रियेचा समावेश करत, प्रशिक्षण पूर्ण होताच तात्काळ या प्रकरणाला गती दिली. अखेर सततच्या पाठपुराव्यानंतर अनुकंपा यादी अंतिम करण्यात आली आहे.या पारदर्शक प्रक्रियेमुळे जिल्हा परिषद प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर विश्वास वाढला असून, अनुकंपा नियुक्तीसाठी आतुर असलेल्या अनेक कुटुंबांना दिलासा मिळाला आहे.

# चिखलमय रस्त्यामुळे नागरिक हैराण

## दुरुस्तीसाठी रास्ता रोकोचा इशारा

■ प्रतिनिधी | पातूर ■

पातूर शहरातील टीकेव्ही चौक ते आगीखेडदरम्यानचा रस्ता अत्यंत खराब स्थितीत असून, पावसामुळे रस्त्यावर मोठ्या प्रमाणात चिखल व पाणी साचले आहे. त्यामुळे पायी चालणे तर दूरच, वाहन चालवणेही धोकादायक बनले आहे. या दुरवस्थेच्या विरोधात संतप्त ग्रामस्थांनी रस्त्याच्या तात्काळ दुरुस्तीसाठी प्रशासनाकडे निवेदन सादर करत रास्ता रोकोचा इशारा दिला आहे.



गेल्या अनेक दिवसांपासून या मार्गाची अवस्था गंभीर बनली आहे. पावसाळा सुरू झाल्यामुळे रस्त्याच्या मध्यभागी चिखल साचून अनेक ठिकाणी अपघातही घडले आहेत. विशेषतः शाळा सुरू झाल्यामुळे विद्यार्थी व पालकांना या रस्त्याने दररोज धोकादायक प्रवास करावा लागत आहे. ग्रामस्थांनी यापूर्वीही प्रशासन व लोकप्रतिनिधींना तक्रारी केल्या होत्या. मात्र, याकडे सातत्याने दुर्लक्ष केल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे. त्यामुळे अखेर ४ जुलै रोजी तहसील कार्यालयावर धाव घेत रस्ता दुरुस्तीसाठी ठोस कारवाईची मागणी करणारे निवेदन सादर केले.

### प्रशासन व लोकप्रतिनिधींकडून दुर्लक्ष – ग्रामस्थांचा आरोप

टीकेव्ही चौक ते आगीखेड रस्त्याच्या अत्यंत वाईट अवस्थेबाबत प्रशासन व लोकप्रतिनिधींना वारंवार कळवूनही कोणतीही ठोस कारवाई झाली नाही. यामुळे नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. 'गावकऱ्यांच्या समस्या ऐकून घेतल्या जात नाहीत,' असा आरोप या निवेदनातून ग्रामस्थांनी केला आहे.

### रास्ता रोकोचा इशारा

रस्त्याची त्वरित दुरुस्ती न झाल्यास टीकेव्ही चौक ते आगीखेड या चिखलमय रस्त्यावरच रास्ता रोको आंदोलन छेडण्यात येईल, असा इशाराही ग्रामस्थांनी दिला आहे. प्रशासनाने आता तरी या प्रश्नाची दखल घेऊन तातडीने रस्त्याचे डागडुजीचे काम सुरू करावे, अशी मागणी परिसरातील नागरिक करत आहेत.

# पाणी उकळून पिण्याचे आवाहन

**अकोला :** अकोट तालुक्यातील धामणा बुद्रुक येथील एक रूग्णाचे शासकीय वैद्यकीय महाविद्यालय उपचार घेत असताना दि. २ जुलै रोजी निधन झाले. हा रूग्ण कॉलराबाधित असल्याचा अहवाल प्रयोगशाळेने दिला आहे. त्यामुळे या गावात कॉलरा उद्रेक जाहीर करण्यात आला असून, प्रतिबंधात्मक कार्यवाही व उपचार सुरू करण्यात आले आहेत.

आरोग्य विभागाच्या ४ पथकांद्वारे धामणा गावात घरोघरी जाऊन सर्वेक्षण करण्यात येत आहे. पिण्याचे पाणी उकळून व आर. ओ. पाण्याचा वापर किंवा मेडिक्लोरचा उपयोग करण्याबाबत आरोग्य शिक्षण नागरिकांना देण्यात येत आहे. करोडी येथील उपकेंद्रामार्फत औषधोपचार होत आहेत.गावात ८० घरे असून, प्रत्येक घरी तपासणी करण्यात आली आहे. ताप, मळमळ, पोटदुखी, हगवण, डोकेदुखी अशी लक्षणे असलेल्या व्यक्तींना तातडीने उपचार मिळवून देण्यात येत आहेत.

# जिल्ह्यात पुढील चार दिवस पावसाचे अंदाज

**अकोला :** नागपूर येथील प्रादेशिक हवामान विभागाने अकोला जिल्ह्यात आजपासून दि. ८ जुलैपर्यंत विजांच्या कडकडाटासह पाऊस पडण्याची शक?यता वर्तवली आहे. जूनमधील पावसामुळे नदी, नाले व तळ्यांतील पाणीसाठ्यात वाढ झाली. पाण्यात शिरण्याचे अनावश्यक धाडस करू नये, असे आवाहन करण्यात आले आहे. अमरावती जिल्ह्यातील पूर्णा नदीवरील धरणात पावसाचे प्रमाण वाढल्यास कोणत्याही क्षणी विसर्ग केला जाऊ शकतो.

# वाशिम शहर विकास आघाडीची लवकरच घोषणा - भाई जगदिश कुमार इंगळे

■ प्रतिनिधी | वाशिम ■

जिल्ह्यातील विविध सामजिक संघटना चे राजकीय पुनर्वसन करण्यासाठी बिगर सातबारा शेतकरी संघटनेचे प्रणेते भाई जगदिश कुमार इंगळे यांनी वाशिम नगर परिषद निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर वाशिम शहर विकास आघाडी स्थापन करण्याचा संकल्प केला असून विवीध सामजिक संघटना व राजकिय पक्षातील नाराज असलेले पदाधिकारी यांची लवकरच बैठक आयोजीत करणार असल्याचे भाई जगदिश कुमार इंगळे यांनी प्रसिद्धी पत्रकातून कळविले सामाजिक कार्यकर्त्यांच्या कार्यच कौतुक करताना भाई म्हणाले की कार्यकर्ता संघटनेच्या मार्गदर्शक तत्त्वानुसार चार वर्ष अकरा महिने पंधरा दिवस लोकांच्या न्याय हक्कासाठी समाजाच्या विविध समस्या घेवुन रस्त्यावर संघर्ष करतो परंतू कोणताही राजकीय पक्ष त्याच्या कार्याची दखल घेत नाही म्हणून राजकारणात त्याला योग्य स्थान मिळत नाही त्यासाठी सामाजिक कार्याच राजकीय पुनर्वसन व्हाव यासाठी सामजिक संघटना व राजकीय पक्षात नाराज असलेल्या नेते मंडळीला सोबत घेवुन वाशिम शहर विकास आघाडी स्थापन करण्याचा निर्णय भाई इंगळे यांनी घेतला.



> **वाशिम न. प. निवडणुकीसाठी सर्व सामजिक संघटना व राजकीय पक्षात नाराज असलेल्या पदाधिकाऱ्यांना एकत्र करून आघाडी करणार**

# सस्ती मार्गावर भंगार बस फेऱ्यांमुळे प्रवासी त्रस्त

## प्रवाशांची डोकेदुखी वाढली : महामंडळ विभागाचे दुर्लक्ष

■ प्रतिनिधी | खेट्री ■

अकोला जिल्ह्यातील अकोला-गोरेगाव-वाडेगाव मार्गे चान्नी, सस्ती, पिंपळखुटा या मार्गावर दररोज महामंडळाच्या बस फेऱ्या सुरू असल्या तरी, या मार्गावर जुनाट आणि भंगार बस सोडल्या जात असल्यामुळे प्रवाशांचे प्रचंड हाल होत आहेत. वारंवार बस बंद पडत असल्याने प्रवाशांना वेळेवर पोहोचणे अशक्य बनले आहे.



विशेषतः गुरुवारी सस्ती येथे मुक्कामी असलेली बस दुसऱ्या दिवशी म्हणजे शुक्रवारी दोन तासांच्या विलंबाने निघाली. त्यामुळे प्रवाशांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागले. या मार्गावर दररोज शिक्षणासाठी अकोलाकडे ये-जा करणाऱ्या विद्यार्थिनी व विद्यार्थ्यांसह महिला आणि ज्येष्ठ नागरिक यांना मोठ्या प्रमाणात त्रास सहन करावा लागत आहे. वेळेवर पोहोचता न येण्यामुळे त्यांच्या दिनचर्येवर परिणाम होत आहे. या पार्श्वभूमीवर प्रवाशांनी संताप व्यक्त केला असून, परिवहन विभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी याकडे लक्ष द्यावे आणि या मार्गावर नवीन व सुस्थितीत असलेल्या बस फेऱ्या सुरू कराव्यात, अशी मागणी जोर धरू लागली आहे. गोरेगाव, नकाशी, माझोड, देगाव, सस्ती, सुकळी, पिंपळखुटा, तुलंगा, वाडेगाव, शहापूर आदी गावांतील प्रवाशांनी या समस्येला गांभीर्याने घेतले आहे.

> 'या मार्गावर भंगार बस फेऱ्या धावत असल्यामुळे वारंवार बंद पडतात. त्यामुळे प्रवाशांना नाहक त्रास सहन करावा लागतो. चांगल्या बस फेऱ्या सुरू कराव्यात, अन्यथा शिवसंग्रामकडून रास्ता रोको आंदोलन छेडले जाईल.'
>
> **दिलीप परनाटे,** जिल्हाध्यक्ष, शिवसंग्राम

> 'सस्ती मार्गावर महामंडळाच्या बस फेऱ्या नेहमीच बंद पडतात. हा प्रकार सातत्याने घडतो. लोकप्रतिनिधी आणि परिवहन विभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी याकडे गांभीर्याने लक्ष द्यावे.'
>
> **मनोहर बेलोकर,** युवा नेते, वंचित बहुजन आघाडी, सस्ती

# जनमाध्यम

e paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

■ वर्धा ■ वर्षे १३ ■ अंक २२० ■ शनिवार, ५ जुलै २०२५ ■ पृष्ठे ४ ■ मुल्य ३.०० रु.


# बोगस शिक्षक भरती व शालार्थ आयडी घोटाळ्याची राज्यस्तरीय एसआयटी करणार चौकशी

## -आमदार सुधाकर अडबाले यांचा प्रश्न:शिक्षण राज्यमंत्री पंकज भोयर यांची माहिती

**वर्धा जनमाध्यम :** नागपूर विभागातील शिक्षक पदभरती घोटाळा, शालार्थ आयडी घोटाळ्याने राज्यात खळबळ उडाली आहे. या घोटाळ्याची व्याप्ती नागपूर विभागासह संपूर्ण राज्यात आहे. त्यामुळे राज्यातील बोगस शिक्षक पदभरती / शालार्थ आयडी प्रकरणाचा तपास एसआयटीमार्फत करावा. यात गृह, शिक्षण विभागातील निवृत्त अधिकारी व उच्च न्यायालयातील निवृत्त न्यायाधीशांचा समावेश करण्याची मागणी आमदार सुधाकर अडबाले यांनी शुक्रवार (ता. ४) विधानपरिषदेत तारांकित प्रश्नाद्वारे केली. या प्रकरणाची प्रशासकीय, पोलिस विभागामार्फत चौकशी सुरू आहे. या प्रकरणाची व्याप्ती बघता राज्यस्तरीय एसआयटी नियुक्त करून यात आयएएस, आयपीएस दर्जाच्या अधिकाऱ्यांसह न्यायालयातील वरिष्ठ अधिकाऱ्यांचा समावेश करण्यात येणार असल्याचे शिक्षण राज्यमंत्री पंकज भोयर यांनी उत्तर देतांना सांगितले.

महाराष्ट्रातील शिक्षण क्षेत्रात अराजकता माजली आहे. शिक्षक पदभरती घोटाळा, शालार्थ आयडी घोटाळा नागपूर या उपराजधानीत उघडकीस आला आहे. या घोटाळ्याची पाळेमुळे राज्यभर पसरली आहेत. २ मे २०१२ पासून शिक्षक पदभरती बंद करण्यात आली. फेब्रुवारी २०१३ ला शिक्षक पात्रता परीक्षा (टीईटी) अनिवार्य करण्यात आली. त्यानंतर शिक्षण विभागातील अधिकारी, कर्मचाऱ्यांनी २०१३ पूर्वी उत्तीर्ण झालेल्या डीएड धारकांच्या नियुक्तीस मृत शिक्षणाधिकारीच्या स्वाक्षरीने मान्यता देण्यात आली. २०१९ नंतर या पदभरतीस बोगस शालार्थ आयडी मिळविण्यात आला. यातून शासनाच्या कोट्यवधी रुपयांच्या निधीची लूट करण्यात आली. या घोटाळ्यात शिक्षणाधिकारी, शिक्षण उपसंचालक, संचालक, आयुक्त कार्यालय तसेच मंत्रालयातील अधिकाऱ्यांचा देखील समावेश असून जवळपास १००० कोटींच्या वर भ्रष्टाचार झाला असण्याची शक्यता आहे.



नागपूर, भंडारा या जिल्ह्यांमध्ये बोगस भरती, शालार्थ आयडी घोटाळा उघडकीस आला. या घोटाळ्याची व्याप्ती मोठी आहे. संपूर्ण महाराष्ट्रामध्ये अशा प्रकारच्या नियुक्तीस मान्यता व शालार्थ आयडी देण्यात आलेल्या आहेत. त्यामुळे राज्यस्तरावर तात्काळ एसआयटी नियुक्त करावी. एसआयटीमध्ये गृह, शिक्षण विभागातील निवृत्त अधिकारी व उच्च न्यायालयातील निवृत्त न्यायाधीशांचा समावेश करावा. नागपूर विभागातील बोगस भरती, शालार्थ आयडी घोटाळ्यातील निलंबित सूत्रधार गेल्या तीन महिन्यांपासून फरार आहे. त्याला अटक कधी करणार? या घोटाळ्यात १८ च्यावर अधिकारी, कर्मचाऱ्यांना आतापर्यंत अटक करण्यात आली आहे. त्यांना बडतर्फ करावे तसेच त्यांच्या संपत्तीची ईडीमार्फत चौकशी करावी, आदी प्रश्न आमदार सुधाकर अडबाले यांनी विधानपरिषदेत उपस्थित केले.

यावर शिक्षण राज्यमंत्री पंकज भोयर यांनी उत्तरात नागपूर, भंडारा, नाशिक व जळगाव या जिल्ह्यांमध्ये बोगस भरती, शालार्थ आयडी घोटाळा उघडकीस आला आहे. त्यानंतर या प्रकरणाचा तपास विशेष चौकशी पथकामार्फत करण्याची मागणी पोलिस विभागाकडे करण्यात आली आहे. तसेच संचालक, सहसंचालक दर्जाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली चौकशी समिती गठीत करण्याचे आदेश देण्यात आलेले आहेत.

या प्रकरणाची व्याप्ती बघता राज्यस्तरीय एसआयटी नियुक्त करून चौकशी करण्यात येणार असून, यात गृह, शिक्षण विभागातील निवृत्त अधिकारी व उच्च न्यायालयातील निवृत्त न्यायाधीशांचा समावेश करण्यात येणार असल्याचे मंत्री भोयर सांगितले.

# आजनसरा येथे सापांचा खेळ दाखवणाऱ्यांना वनविभागाने घेतलं ताब्यात

**वर्धा जनमाध्यम :** हिंगणघाट तालुक्यातील श्री क्षेत्र आजनसरा येथे चार आरोपी विविध प्रजातीच्या १३ सापांचा खेळ भरवीत होते.वन विभागाच्या पथकाने धडक कारवाई करीत तो सुरु असलेला खेळ उधळून लावला आणि गोंदिया व नागपूर जिल्ह्यातील चार आरोपींना ताब्यात घेतले आहे.



श्री क्षेत्र आजनसरा येथे चार व्यक्ती विविध प्रजातीच्या १३ सापांचा खेळ भरवीत असल्याची गोपनीय माहिती वन विभागाच्या अधिकाऱ्यांना मिळाली.या आधारे वन विभागाच्या पथकाने आजनसराला जाऊन पाहणी केली असता,गोंदिया व नागपूर जिल्ह्यातील आरोपी संकेत लखपती पाठक, शशिकांत रमेश बागडे,रुपेश दिलीप गुप्ता व स्वप्नील गजानन काळे हे चौघेही १३ सापांचा खेळ दाखवीत होते.वन विभागाच्या पथकाने धडक कारवाई केली आणि अजगर, मण्यार, धामण या सापांसह इतर साप जप्त करीत चौघांना ताब्यात घेतले. ही कारवाई उपवनसंरक्षक हरविर सिंग व वनपरिक्षेत्र अधिकारी कु. व्ही एस भलावी यांच्या मार्गदर्शनात वनकर्मचारी जी एस सयाम, क्षेत्रसहायक वडनेर, वनरक्षक शिवाजी राठोड, माधव माने, अरुण गिते, पारस बडदे, प्रशांत कनेरी, कु. स्नेहल सुखदेवे यांच्यासह वन विभागाच्या पथकाने केली. पुढील तपास वन विभाग करीत आहेत.

# सामाजिक कार्यकर्ते अन्सार शहा यांचे ह्दयविकाराच्या झटक्याने मृत्यू

**आंजी (मोठी ) :** येथील सामाजिक कार्यकर्ते तथा नात खॉ अन्सार सत्तार शहा यांचे गुरूवार (ता.३) ला सायंकाळी पाचच्या सुमारास ह्दयविकाराच्या झटक्याने निधन झाले. ते ५२ वर्षांचे होते. त्यांच्या पार्थिवावर शुक्रवार (ता.४ ) ला स्थानिक कब्रस्थान येथे दफनविधी पार पडला.त्यांच्यामागे पत्नी,एक मुलगी, एक मुलगा,आई, दोन भाऊ, तीन बहिण, स्नुषा,जावाई असा बराच मोठा परिवार आहे.अन्सार शहा हे मोहरमची गुरुवारी ते जामणी येथील पंचपीर दरगाह येथे दर्शनाकरीता गेले होते.दरग्यावरील कार्यक्रमाची पाच वाजता सांगता झाल्यानंतर ते दरग्यामध्ये सलाम पठाण करीत असताना त्यांची छाती दाटून आली.त्यांना लगेच उपस्थित असलेल्या मित्रांनी आंजी येथील दवाखान्यात उपचाराकरीता दाखल केले असता डॉक्टरानी त्यांना ह्दयविकारा झटक आल्याने त्यांचा मृत्यू झाला.असे सांगितले.त्यांच्या आकास्मित मृत्यूमुळे गावात हळहळ व्यक्त होत आहे.



# दर्जेदार प्रशिक्षकच दर्जेदार स्काऊट गाईड चळवळ निर्माण करू शकतात - कॅप्टन मोहन गुजरकर

## जिल्हास्तरीय प्रशिक्षकांची बैठक संपन्न

**वर्धा जनमाध्यम :** 'नवीन शिक्षण पद्धती नुसार कृतिशील शिक्षणाला प्राधान्य दिलेले आहे या दृष्टिकोनातून स्काऊट गाईड चळवळीचा अभ्यासक्रम सर्वोत्तम असून हा अभ्यासक्रम विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचविण्याकरिता जास्तीत जास्त शिक्षकांना स्काऊट गाईड चळवळीत सहभागी करून त्यांना प्रशिक्षित करणे गरजेचे आहे. दर्जेदार प्रशिक्षकच दर्जेदार स्काऊट गाईड चळवळ निर्माण करू शकतात असे प्रतिपादन रोव्हर स्काऊटचे जिल्हा आयुक्त तथा सहाय्यक लीडर ट्रेनर कॅप्टन मोहन गुजरकर यांनी स्थानिक वर्धा भारत स्काऊट गाईड जिल्हा कार्यालयाच्या वतीने ३ जुलै रोजी संपन्न झालेल्या प्रशिक्षक सभेत आपले मत व्यक्त केले.





जिल्हास्तरीय स्काऊट गाईड प्रशिक्षकांची सभा स्थानिक जिल्हा प्रशिक्षण केंद्र येथे संपन्न झाली असून सभेच्या अध्यक्षस्थानी सहाय्यक लीडर ट्रेनर कॅप्टन मोहन गुजरकर तर प्रमुख अतिथी म्हणून जिल्हा प्रशिक्षण आयुक्त किरण जंगले, स्काऊटचे जिल्हा संघटन आयुक्त नितेश झाडे, गाईड जिल्हा संघटन आयुक्त वैशाली घोम व माजी जिल्हा संघटक प्रकाश डाखोळे उपस्थित होते. याप्रसंगी सहाय्यक जिल्हा आयुक्त राजहंस जंगले, अभिजीत पारगावकर, निर्मला नंदुरकर, रूपा कडू, सुनील खासरे, अयुब शेख, सुयोग ठाकरे, लिपिक प्रियंका ठोसर व राजेश जयस्वाल यांची प्रमुख उपस्थिती होती.

जिल्हा प्रशिक्षण आयुक्त किरण जंगले म्हणाले स्काऊट गाईड चळवळ सक्रिय करण्याकरिता वर्षभरात विविध उपक्रम राबवण्यावर भर दिला पाहिजे तर जिल्हा संघटक नितेश झाडे म्हणाले स्काऊट गाईडच्या अभ्यासक्रमावर आधारित विविध उपक्रम व प्रशिक्षण आयोजित करण्याचा आमचा मानस आहे.

सदर सभेत विविध विषयांवर चर्चा होऊन वर्षभर आयोजित करण्यात येणाऱ्या कार्यक्रमांचे नियोजन करण्यात आले. याप्रसंगी स्काऊट युनिट लीडरचे सर्वोच्च प्रशिक्षण प्राप्त करणाऱ्या हिमालया वूड बॅच होल्डर राजहंस जंगले व अभिजीत पारगावकर यांना सन्मानित करण्यात आले. तसेच नव्यानेच रुजू झालेल्या गाईडच्या जिल्हा संघटक वैशाली घोम यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले. सभेचे संचालन जिल्हा संघटक नितेश झाडे यांनी तर आभार जिल्हा संघटक वैशाली घोम यांनी मानले

# ८०९१ विद्यार्थ्यांनी केला अकरावी प्रवेश निश्चित

## -अकरावी प्रवेशाची पहिली फेरी

**वर्धा जनमाध्यम :** मार्गदर्शक सूचनांनुसार जिल्ह्यात अकरावीची प्रवेश प्रक्रिया ऑनलाइन पद्धतीने राबविली जात आहे. जिल्ह्यात अकरावी प्रवेशाची पहिली फेरी १ जुलैपासून सुरू झाली असून अवघ्या ३ दिवसांत ८ हजार ९२ विद्यार्थ्यांना कला, वाणिज्य व विज्ञान शाखेचे शिक्षण घेण्यासाठी जागा निश्चित केली आहे. पहिली फेरी ७ जुलैपर्यंत राबविली जाणार आहे.





प्रवेश प्रक्रियेसाठी ऑनलाइन नोंदणी करताना पालकांसह विद्यार्थ्यांना तांत्रिक अडचणीमुळे विविध समस्यांना तोंड द्यावे लागत असल्याचे गांभीर्य ओळखून नवीन वेळापत्रक जाहीर केले. या अंतर्गत प्रवेशासाठीची पहिली फेरी १ ते ७ जुलै या काळात राबविली जात आहे. विद्यार्थ्यांना एसएमएस पाठविले जात आहेत. जिल्ह्यात १३३ महाविद्यालयांत अकरावीच्या विद्या शाखांमध्ये २३ हजार ३०० जागा आहेत. १२९ महाविद्यालयांनी प्रवेशासाठी नोंदणी केली असून ३ जुलैपर्यंत ८ हजार ९२ विद्यार्थ्यांनी आपला प्रवेश निश्चित केल्याचे सांगण्यात आले.

विज्ञान शाखेत १० हजार ५५० जागा उपलब्ध आहेत. ३ जुलैपर्यंत ४ हजार ६१८ विद्यार्थ्यांनी विविध महाविद्यालयात विज्ञान शाखेत प्रवेश निश्चित केला आहे. कला शाखेच्या अकरावीसाठी ८ हजार ८३० जागा आहेत. ३ जुलैपर्यंत जिल्ह्यातील आठही तालुक्यातील विविध महाविद्यालयांमध्ये २ हजार ५११ विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला आहे. वाणिज्यमध्ये ९६३ विद्यार्थ्यांची एन्ट्री वाणिज्य शाखेच्या अकरावीसाठी ३ हजार ५७० जागा आहेत. ३ जुलैपर्यंत आठही तालुक्यात ९६३ विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतल्याची नोंद शिक्षण विभागाने घेतली आहे.

# भारत निवडणूक आयोग, नवी दिल्लीच्यावतीने द्वारका येथे निवडणूक प्रशिक्षणास वर्धेच्या ४ बीएलओचा समावेश

**वर्धा जनमाध्यम :** भारत निवडणूक आयोग नवी दिल्ली येथे महाराष्ट्र, आंध्रप्रदेश, कर्नाटक, ओडीसा या ४ राज्यातील बी.एल.ओ. पर्यवेक्षकांसाठी आयोग संस्था निर्मीत IIIDEM द्वारका नवी दिल्ली येथे दि.१२ व १३ जुन रोजी प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात आले होते. या प्रशिक्षणास वर्धा जिल्ह्यातील चार विधानसभा क्षेत्रातील चार मतदान केंद्र स्तरीय अधिकारी (बीएलओ) यांनी सहभाग नोंदवून यशस्वी प्रशिक्षण पूर्ण केले.

प्रशिक्षणास जिल्ह्यातील निवडणूक प्रक्रियेची उत्कृष्ट कामगिरी करणा-या आर्वी विधानसभा क्षेत्रातल ग्राम महसूल अधिकारी अबीब हासीब, देवळी विधानसभा क्षेत्रातील मंडळ अधिकारी चंद्रशेखर कोल्हे, हिंगणघाट विधानसभा क्षेत्रातील कृषी पर्यवेक्षक मनोज गायधने, व वर्धा विधानसभा क्षेत्रातील प्रयोगशाळा सहायक मंगेश गिरडे यांची प्रशिक्षणासाठी निवड करण्यात आली होती.

प्रशिक्षणाचे उदघाटन भारत निवडणूक आयोग नवी दिल्लीचे मुख्य निवडणूक आयुक्त डॉ. विवेक जोशी यांच्या हस्ते करण्यात आले होते. यावेळी केंद्रीय निवडणूक उपायुक्त संजयकुमार, व मुख्य निवडणूक अधिकारी कर्नाटक मीनल कुमार यांच्यासह आयटी तज्ञ प्रमुख सीमा खन्ना, पवन कुमार, राकेश कुमार वर्मा महानिदेशक यांच्यासह किरण शार्दुल सहायक मुख्य निवडणूक अधिकारी मुंबई यांची प्रमुख उपस्थित होती.

यावेळी निववडणूक पक्रियेत सुलभता यावी सासाठी निवडणूक प्रक्रियेतील प्रत्येक घटक महत्वाचा असतो. जगातील सर्वात मोठी लोकशाही भारताची असून जगात सर्वात मोठा निवडणूक आयोग म्हणून भारताच्या आयोगाकडे पाहिले जाते. यामध्ये प्रत्येक सहभागी घटक कर्मचाऱ्यांमुळेच हा सन्मान निवडणूक आयोगाला मिळाला आहे.





निवडणूक प्रक्रिया अधिकाधिक सोपी व्हावी यासाठी वेळोवेळी निवडणूक नियमांमध्ये बदल होत असल्याचे प्रतिपादन केंद्रीय मुख्य निवडणूक आयुक्त विवेक जोशी यांनी केले.

सदर प्रशिक्षणासाठी मुख्य निवडणूक अधिकारी, मुंबई यांनी महाराष्ट्रातून १४४ बी.एल.ओ. पर्यवेक्षक यांची प्रशिक्षणार्थी म्हणून निवड करण्यात आली होती.

प्रशिक्षणात राज्यातील जिल्हाधिकारी, उपजिल्हाधिकारी, उपविभागीय अधिकारी, तहसीलदार, नायब तहसीलदार, पर्यवेक्षक आणि बीएलओ अधिकारी सहभागी झाले होते. प्रशिक्षणाचा उद्देश भारतीय निवडणूक प्रक्रियेची अद्यावत माहिती करणे, विविध संगणकावरील ?प्स हाताळणे, हॅडस ऑन ट्रेनिंग, ?ज्जे हाताळणे त्यातील शंका व समाधान करणे, स्थानिक अडचणी सोडविणे, मतदार नोंदणी अधिक व्यापक व मतदारांचा प्रत्यक्ष सहभाग वाढविणे, मतदारांना अधिक जागरूकता निर्माण करणे तसेच मतदान प्रक्रिया अधिक सुलभ, व्यापक, प्रचार व प्रसार करण्यासाठी प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात आले होते.

सध्या BLO App पर्यवेक्षकांना हे पाहता येत नसल्यामुळे बी.एल.ओ. येणाऱ्या समस्यांचे पर्यवेक्षक निराकरण करू शकत नाहीत. सदर बाबीची नोंद राष्ट्रीय स्तरावर चर्चासत्रात घेण्यात आली. तसेच सामान्यात: विधानसभा मतदारसंघातील आंतर यादी भागातील मतदारांना फार्म ८ भरण्याची प्रक्रिया करावी लागते आणि सदर प्रकिया ही वारंवार करावी लागत असल्यामुळे मतदार सहसा करण्याचे टाळते त्यामुळे अशा मतदारांचे नावे अनेक यादी भागात दिसून येते. याकरीता श्री गिरडे यांनी या समस्येचे समाधान आपल्या आलेल्या प्रसंगातून सविस्तर स्पष्ट करून सांगितले.

यावेळी प्रशिक्षणअंती समारोपीय कार्यक्रमात किरण शार्दुल सहायक मुख्य निवडणूक अधिकारी मुंबई यांच्या हस्ते मंगेश गिरडे, चंद्रशेखर कोल्हे, अबीब हासीब व मनोज गायधने यांना प्रशस्तीपत्र देवून त्यांच्या पुढील कार्यासाठी शुभेच्छा देत यथोचित सन्मान करण्यात आला.

याकरीता सर्व प्रशिक्षणार्थी यांनी जिल्हाधिकारी वान्मथी सी, उपजिल्हा निवडणूक अधिकारी अनिल गावीत, उपविभागीय अधिकारी दिपक कारंडे, तहसिलदार संदीप पुंडेकर, नायब तहसिलदार अतुल रासपायले, सहा. महसूल अधिकारी सचिन हटवार यांचे आभार व्यक्त केले.

# बिस्कीटच्या वाहनाला आग मोठे नुकसान जीवितहानी टळली

**हिंगणघाट जनमाध्यम -** बिस्कीटं घेऊन जाणाऱ्या आयशर ट्रकला हिंगणघाट नजीकच्या कडाजना शिवारातील पारले कंपनीच्या गोडाऊन जवळ आग लागल्याने ट्रक आणि बिस्कीट जळून खाक झाले. ही घटना आज ४ जुलैच्या पहाटे ४.३० च्या सुमारास घडली. मिळालेल्या माहितीनुसार नंदोरी मार्गावरील कडाजना शिवारातील पारले गोडाऊन मधून पारले कंपनीचे बिस्किटांचा माल घेऊन आयशर कंपनीचा एम.एच. ४० एके १५३६ क्रमांकाचा ट्रक निघाला. दरम्यान, नंदोरी मार्गावर ट्रकला अचानक आग लागली. सुदैवाने यात कोणतीही जीवितहानी झाली नाही. परंतु ट्रक व बिस्कीटाचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. आगीची माहिती कळताच हिंगणघाट नगरपालिकेचे अग्निशमन दल आपल्या पथकासह घटनास्थळी पोहोचले व आग आटोक्यात आणली.




## जाहिर नोटिस

सर्व आम जनतेस सुचित करण्यात येते कि माझे पक्षकार प्रभाकर किसनराव डाहाके यांच्या मालकी व कब्जातील खालिल नमुद मालमत्ता आहे.

मालमत्तेचे वर्णन येणे प्रमाणे: मौजा बोरगांव मेघे, मौजा नं. १००, त. सा. क.१९ ता. जि. वर्धा येथील ग्राम पंचायत बोरगांव मेघे च्या हद्दीतील घर/ मालमत्ता कं. १६२ शेत सर्वे कं. १००/४ जुना व ९४ नविन मधील प्लॉट क्रं. ६ ज्याची एकूण आराजी १७०.०० चौ. मी म्हणजेच १८२९.०० चौ. फुट इतकी असुन त्याची चतुःर्सिमा :-

पुर्वेसः प्लॉट कं. ७
पश्चिमेसः प्लॉट कं. ५,
उत्तरेसः रोड,
दक्षिणेसः दुसरे लेआऊट,

वर नमुद मालमत्ता माझे पक्षकार ईक्वीटास स्माल फायनान्स बँक यांचेकडे गहाण ठेवून त्यावर रक्कम रू. ६,५०,०००/- चे कर्ज घेत आहे. वर नमुद मालमत्ता कोणत्याही बँकेकडे, कंपनीकडे अथवा संस्थेकडे गहाण असल्यास अथवा इतर कोणत्याही स्वरूपाचा बोझा असल्यास तसेच कोणाचाही हक्क वा अधिकार असल्यास वा इतर काही भानगड असल्यास खालिल नमुद पत्यावर लेखी दस्तऐवजासह सदर नोटिस प्रकाशित झाल्यापासून तीन दिवसाच्या आत लेखी उजर नोंदवावा. त्यानंतर कोणाचाही आक्षेप ग्राहय धरल्या जाणार नाही.

ॲड. सचिन एस. कुरझडकर
साई नगर वर्धा
मो. नं. ९८६००४१३६१



## नगर परिषद कार्यालय, पुलगांव,जिल्हा वर्धा
## निविदा सुचना (प्रथम वेळ)

क्रं./न.प.पु./वि.वि./२८६/२०२५ दिनांक : ०४/०७/२०२५


पुलगाव नगर परिषदेला विद्युत विभागाचे खालील काम करण्याकरिता कंत्राटदाराची नियुक्ती करावयाची आहे. तरी सार्वजनिक बांधकाम विद्युत विभागामध्ये योग्य वर्गातील नोंदणीकृत कंत्राटदार व महाराष्ट्र शासनाकडे नोंदणीकृत कंत्राटदार यांनी आपली निविदा व्दिलिफाफा पध्दतीने सादर करावी.

| अ.क्र. | कामाचे/साहित्याचे स्वरुप | निविदा अनामत | निविदा प्रपत्र किंमत | कामाची मुदत |
|---|---|---|---|---|
| १ | न.प.पुलगांव प्रशासकीय इमारतीमध्ये असलेल्या सभागृह येथे साउंड सिस्टमची व्यवस्था करणे. | ३०००/- | १५००/- | २ महिने |

| | | |
|---|---|---|
| १ | निविदा प्रपत्र खरेदी व निविदा सादर करणे | दि.०५.०७.२०२५ ते दि.११/०७/२०२५ दु.३.०० पर्यत |
| २. | निविदा उघडणे (तांत्रिक लिफाफा) | दि.११.०७.२०२५सायं.०५.०० वाजता (शक्य झाल्यास) |

टीप - कामासंबंधी उर्वरित अटी व शर्ती न.प.पुलगाव विद्युत विभागात पहावयास मिळेल.

मुख्याधिकारी
नगर परिषद,
पुलगांव



# मुंबई उच्च न्यायालय, बॉम्बे बार असोसिएशनने मला घडवले - सरन्यायाधीश भूषण गवई

## बॉम्बे बार असोसिएशनतर्फे सरन्यायाधीश भूषण गवई यांचा सत्कार





**मुंबई/प्रतिनिधी :** मुंबई उच्च न्यायालयाची ही इमारत, बॉम्बे बार असोसिएशन आणि इथल्या माझ्या सहका-यांनी मला घडवलं. आज जे काही आहे ते या संस्थांमुळेच. बॉम्बे बार असोसिएशन ही संस्था माझी कुटुंबासारखी आहे. या संस्थेच्या पाठिंब्याशिवाय मी आज या पदावर असू शकलो नसतो. ही वकिल संघटना म्हणजे न्यायव्यवस्थेला विचारवंत देणारी मातृसंस्था आहे, अशा शब्दांत भारताचे सरन्यायाधीश भूषण गवई यांनी भावना व्यक्त केल्या.

न्यायमूर्ती श्री. भूषण गवई यांची भारताच्या सरन्यायाधीशपदी नियुक्ती झाल्याबद्दल बॉम्बे बार असोसिएशनच्या वतीने सत्कार करण्यात आला. त्यावेळी श्री. गवई बोलत होते. यावेळी सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती दीपांकर दत्ता, मुंबई उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश आलोक आराधे, श्री. गवई यांच्या सुविद्य पत्नी डॉ.तेजस्विनी गवई, भारताचे अतिरिक्त सॉलिसिटर जनरल अनिल सिंग, महाराष्ट्र गोवा बार असोसिएशनचे अध्यक्ष विठ्ठल देशमुख, राज्याचे महाधिवक्ता वीरेंद्र सराफ, ॲडव्होकेट असोसिएशन ऑफ वेस्टर्न महाराष्ट्राचे अध्यक्ष प्रशांत रेळेकर, बॉम्बे बार असोसिएशनचे अध्यक्ष नितीन ठक्कर, उपाध्यक्ष व्ही आर धोंड, सचिव फरहान दुभाष आदी उपस्थित होते.

आज सत्कार होत असलेल्या कोर्टरु मध्येच लोकमान्य बाळ गंगाधर टिळकांनी केलेली 'स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे,' ही गर्जना आजही आपल्याला प्रेरणा देते, असे सांगून न्यायमूर्ती श्री. गवई यांनी आजपर्यंतचा प्रवास उलगडला. न्यायमूर्ती गवई यांनी आपल्या कारकिर्दीत मुंबई, नागपूर, छत्रपती संभाजी नगर व गोवा खंडपीठांवर काम करतानाचे अनुभव सांगितले आणि हे सर्व अनुभव त्यांच्या न्यायिक दृष्टिकोनाच्या जडणघडणीत कसे उपयुक्त ठरले, हेही स्पष्ट केले.सरन्यायाधीश श्री. गवई म्हणाले की, 'संविधान हेच आमचे अंतिम मार्गदर्शक तत्त्व आहे आणि न्यायाधीश म्हणून आमची जबाबदारी केवळ अधिकार वापरण्याची नाही, तर कर्तव्य बजावण्याचीही आहे. रिक्त न्यायाधीश पदं भरली गेली तर प्रलंबित खटल्यांवर नियंत्रण येईल. आम्ही नियुक्ती प्रक्रियेत पारदर्शकता आणत आहोत. गेल्या काही दिवसांत अनेक नवीन नियुक्त्या करण्यात आल्या आहेत.

त्यांनी बार असोसिएशनने सुरू केलेल्या 'पॉडकास्ट सिरीज', व 'बीबीए ॲप'चे कौतुक केले.

कार्यक्रमात न्यायमूर्ती दीपांकर दत्ता न्यायमूर्ती गवई यांचे विशेष कौतुक करताना म्हणाले की, न्यायमूर्ती श्री. गवई यांची विधी आणि संविधानातील जाण, विनम्रता आणि कायद्याचा अभ्यास यांचे उदाहरण देशभरातील न्यायाधीशांसाठी आदर्श आहे. नागपूरमधील न्यायालयातून सुरू झालेली न्यायमूर्ती गवई यांची कारकीर्द ही मेहनत, प्रामाणिकपणा आणि मूल्यनिष्ठा यांचे प्रतिक आहे. न्यायमूर्ती श्री. गवई यांचा मुंबई उच्च न्यायालयातील काळ केवळ त्यांच्या ऐतिहासिक निर्णयांसाठीच नव्हे, तर त्यांच्या शांत संयमी, प्रखर कायदेशीर बुध्दिमत्ता आणि सौम्य विनोदबुद्धीसाठीही लक्षात राहतो. त्यांची भारताचे सरन्यायाधीश म्हणून निवड हा फक्त मुंबई बारच नव्हे, तर संपूर्ण मुंबई उच्च न्यायालयाच्या न्यायाधीशांसाठीही गौरवाचा क्षण आहे. मुंबई उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायमूर्ती श्री. आराधे यांनी मनोगतात श्री. गवई यांच्या कामाचा गौरवपूर्ण उल्लेख केला. ते म्हणाले की, लोकसेवा व न्यायव्यवस्था हीच खरी सेवा हे श्री. गवई यांचे तत्वज्ञान आहे. त्यांनी आतापर्यंत दिलेले निर्णय न्यायव्यवस्थेतील संवेदनशीलता आणि संविधान निष्ठा दर्शवतात. ते दूरदर्शी आहेत. त्यांच्या निर्णयांमुळे जनतेचा न्यायव्यवस्थेवरील विश्वास अधिक दृढ झाला. यावेळी महाधिवक्ता श्री. सराफ, भारताचे अतिरिक्त सॉलिसिटर जनरल श्री. सिंह यांनीही मनोगत व्यक्त केले. बार असोसिएशनचे अध्यक्ष श्री. नितीन ठक्कर यांनी प्रास्ताविक केले. सचिव फरहान दुभाष यांनी सूत्रसंचालन केले.

## प्रामाणिक मेहनत आणि जिंकण्याच्या इच्छाशक्तीतून ध्येयप्राप्ती शक्य-सरन्यायाधीश गवई

**मुंबई/प्रतिनिधी :** व्यक्तीच्या जडणघडणीत चांगले संस्कार आणि सकस मुल्यांची जोपसना या गोष्टी जास्त महत्वाच्या असतात, कोणत्याही यशाचा मार्ग हा खडतर असतो. मात्र प्रामाणिक मेहनत आणि जिंकण्याच्या इच्छाशक्तीतून ध्येयप्राप्ती शक्य असते, असे प्रतिपादन सरन्यायाधीश भूषण गवई यांनी केले.

कुलाबा येथील होली नेम हायस्कूलमध्ये आयोजित विशेष कार्यक्रमात विद्यार्थ्यांसोबत संवाद साधताना सरन्यायाधीश भूषण गवई बोलत होते. यावेळी आर्च बिशप जॉन रॉडरिक्स, बिशप डॉमनिक्स फर्नांडिस, व्यवस्थापक फादर कॉनस्टॉन्सीयो नोरोना, प्रिन्सिपॉल सिस्टर लॉरेन्सीया परेरा यांच्यासह संबंधित मान्यवर उपस्थित होते.सरन्यायाधीश भूषण गवई म्हणाले की, प्रत्येकाच्या वाटचालीत शालेय जीवनाचा काळ हा सर्वात महत्वाचा असतो. शालेय जीवनातील अनेक आठवणी होली नेम हायस्कुलमधील आहेत, त्याच शाळेत आज विशेष सत्कार होत असल्याचा क्षण निश्चितच खूप आनंदाचा आणि अभिमानाचाही आहे. आईवडिलांसोबतच या शाळेने आपल्यावर धर्मनिरपेक्षता, एकात्मता, बंधुभावाचे संस्कार केले. या शाळेत वेगवेगळ्या समुहाच्या मित्र-परिवारासोबत एका उत्तम वातावरणात शालेय जीवन जगता आले. भारतीय संविधानाचे समतेचे तत्वही शालेय जीवनात या ठिकाणी शिकायला आणि अनुभवायला मिळाले. आपल्या आजपर्यंतच्या वाटचालीत होली नेम शाळेच्या शिकवणुकीचे, येथील शिस्त, संस्काराचे मोठे योगदान असल्याचे सांगून श्री.गवई म्हणाले की, यशाचा मार्ग हा खडतर असला तरी कोणत्याही क्षेत्रात करियर करण्याचे ठरवत असताना विद्यार्थ्यांनी त्यासाठी कष्ट घेण्याची, प्रामाणिक मेहनत करण्याची तयारी ठेवणे आवश्यक आहे. जिंकण्याच्या इच्छाशक्तीमुळेच ध्येय प्राप्त करणे शक्य होत असते. आपल्या वडिलांच्या इच्छेमुळे आपण वकिली क्षेत्रात करियर करण्याचे ठरवले असेही श्री.गवई यांनी यावेळी सांगितले. आपल्या शाळेचा माजी विद्यार्थी देशाच्या न्यायव्यवस्थेतील सर्वोच्च पद असलेल्या सरन्यायाधीश पदी विराजमान होत असल्याचा सार्थ अभिमान आणि आनंद शाळा व्यवस्थापनाला असून प्रत्येक विद्यार्थ्यासाठी आपण एक प्रेरणा असल्याच्या भावना आर्च बिशप जॉन रॉडरिक्स यांनी यावेळी व्यक्त केल्या.

## वन क्षेत्रातील निर्धारित जागांवर मेंढ्यांना चराई करण्यास परवानगी-वन मंत्री गणेश नाईक

**मुंबई/प्रतिनिधी :** वनांमध्ये विशिष्ट वयापर्यंत वाढलेल्या झाडांच्या परिसरात मेढ्यांना चरण्यासाठी परवानगी देण्यात आली असून अशा ठिकाणी मेंढपाळांना अडवू नये, असे निर्देश वनमंत्री गणेश नाईक यांनी दिले. तसेच अशा प्रकरणी कोणत्याही मेंढपाळांवर चुकीच्या पद्धतीने कारवाई न करण्याच्या सूचनाही त्यांनी यावेळी दिल्या. मेंढपाळांना वनांमध्ये चराईसाठी परवानगी देण्यासंदर्भात विधानभवनात महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या अध्यक्षतेखाली बैठक झाली. त्यावेळी श्री. नाईक यांनी वरील सूचना केल्या. यावेळी सहकार मंत्री बाबासाहेब पाटील, वन विभागाचे अपर मुख्य सचिव मिलिंद म्हैसकर, प्रहार संघटनेचे नेते बच्चू कडू आदी यावेळी उपस्थित होते. वनमंत्री श्री. नाईक म्हणाले की, पावसाळ्याच्या चार महिन्यात वन क्षेत्रात लहान झाडे असलेल्या ठिकाणी मेंढ्यांना चारण्यास बंदी आहे. मात्र, मेंढपाळांची मागणी लक्षात घेउन नियमांनुसार विशिष्ट वयाची वाढलेली झाडे असलेल्या क्षेत्रात मेंढ्या चारण्यासाठी परवानगी देण्यात आली असून यासंबंधीच्या सूचना सर्व वन अधिका-यांना देण्यात येतील. तसेच वन क्षेत्रात मेंढ्या चराईप्रकरणी कोणाविरूद्धही चुकीच्या पद्धतीने कारवाई होउ नये, याची दक्षता घेण्याच्या सूचनाही देण्यात येतील. पावसाळ्याच्या कालावधीत शेळ्या मेंढ्यांना चराईसाठी फिरावे लागू नये, यासाठी शासकीय जागा, गायरान जमिनी तसेच जमिनी उपलब्ध करून देण्यासंदर्भात सकारात्मक विचार करण्यात येईल.

## प्रधानमंत्री सुर्य घर- मोफत वीज योजनेची प्रभावी अंमलबजावणी करा-मंत्री संजय शिरसाट

**मुंबई/प्रतिनिधी :** प्रत्येक घरात मोफत वीज पोहोचविण्यासाठी प्रधानमंत्री सुर्य घर- मोफत वीज योजना राबविण्यात येत आहे. शासनामार्फत सुरू असलेल्या या योजनेची अंमलबजावणी प्रभावीपणे करण्यासाठी उर्जा विभागाशी समन्वय साधून, सकारात्मक कार्यवाही करण्याचे निर्देश सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट यांनी दिले.सामाजिक न्याय विभागांतर्गत विविध योजना राबविण्यात येतात. प्रधानमंत्री सुर्य घर- मोफत वीज योजनेच्या अंमलबजावणीसंदर्भात विधानभवन येथे बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी राज्यमंत्री आशिष जयस्वाल, प्रधान सचिव हर्षदिप कांबळे, आयुक्त सुरेंद्र पवार आदिसह अधिकारी उपस्थित होते.मंत्री श्री. शिरसाट म्हणाले की, सामाजिक न्याय विभागामार्फत सुरू असलेल्या वैयक्तिक लाभाच्या योजनांची प्रभावी अंमलबजावणी करावी. उर्जा विभागाशी समन्वय साधून प्रधानमंत्री सुर्य घर- मोफत वीज योजना राबवावी. तसेच, पात्र लाभार्थ्यांना या योजनेचा लाभ मिळत असल्याची खात्री करण्यासाठी आयुक्तालयामार्फत यंत्रणा राबवावी. प्रत्येक लाभार्थ्याच्या घरावर सौर पॅनल उभारल्यास त्यांना ३०० मेगावॅट वीज मोफत मिळणार असून, वीजेची बचतही होणार आहे. याचा लाभ त्यांच्या सामाजिक आणि आर्थिक उन्नतीसाठी होणार असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.

## बोगस शिक्षक भरतीसंदर्भात विशेष चौकशी समिती नेमणार

**मुंबई :** राज्यात शिक्षक व शिक्षकेतर कर्मचा-यांचा शालार्थ प्रणालीमध्ये नियमबाह्य समावेश करुन वेतन अदा केले जात असल्याचे प्राथमिक चौकशीमध्ये निदर्शनास आले आहे. या प्रकरणाची व्याप्ती लक्षात घेता मुख्यमंत्र्यांची मान्यता घेउन अधिवेशन संपल्यानंतर एका महिन्यात आयएएस, आयपीएस, आणि न्याय व्यवस्थेतील वरिष्ठ अधिका-यांची विशेष चौकशी समिती नेमली जाईल. तसेच या समितीच्या चौकशीमध्ये दोषी आढळणा-यांवर निश्चित कारवाई केली जाईल, असे शालेय शिक्षण राज्यमंत्री पंकज भोयर यांनी विधान परिषदेत सांगितले. सदस्य सुधाकर अडबाले यांनी याबाबतचा प्रश्न उपस्थित केला होता. या अनुषंगाने झालेल्या चर्चेत सदस्य सर्वश्री प्रवीण दरेकर, एकनाथ खडसे, संदीप जोशी, परिणय फुके, मनीषा कायंदे यांनी सहभाग घेतला.राज्यमंत्री भोयर म्हणाले, शिक्षकांची भरती प्रक्रिया ही नियमाप्रमाणेच होते. त्यास शासन नियमाप्रमाणेच मान्यता देते. तथापि भरतीमध्ये आर्थिक व्यवहार होउन नियमबाह्य भरती झाल्याचे निदर्शनास आल्यास त्यावर निश्चित कारवाई केली जाईल. तसेच असे प्रकरण मंत्रालयातील अधिका-यांनी प्रलंबित ठेवले असल्याचे निदर्शनास आल्यास त्यावर देखील कारवाई करण्यात येईल असेही त्यांनी याबाबतच्या उपप्रश्नाच्या उत्तरात सांगितले.

## अधिवेशनातून

### सरन्यायाधीश भूषण गवई यांचा 8 जुलै रोजी महाराष्ट्र विधानमंडळातर्फे सत्कार



**मुंबई :** महाराष्ट्राचे सुपुत्र आणि देशाचे सरन्यायाधीश न्यायमूर्ती भूषण रामकृष्ण गवई यांचा सत्कार महाराष्ट्र विधानमंडळातर्फे करण्यात येणार आहे. हा गौरव सोहळा मंगळवार, ८ जुलै २०२५ रोजी दुपारी २ वाजता, विधान भवन, मुंबई येथील मध्यवर्ती सभागृहात पार पडणार आहे, अशी घोषणा विधान परिषद सभापती प्रा. राम शिंदे यांनी सभागृहात केली.सत्कारानंतर सरन्यायाधीश भूषण गवई हे 'भारताची राज्यघटना' या विषयावर दोन्ही सभागृहांतील सन्माननीय सदस्यांना संबोधित करणार आहेत.

### आश्रमशाळेतील विद्यार्थी गणवेश खरेदी प्रकरणी कोणतीही अनियमितता नाही

**मुंबई :** शासकीय आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांसाठी खरेदी करण्यात आलेल्या गणवेश प्रक्रियेमध्ये कोणत्याही प्रकारची अनियमितता आढळून आलेली नसल्याचे आदिवासी विकास मंत्री अशोक वुईके यांनी विधानसभेत सांगितले.सदस्य भास्कर जाधव यांनी यासंदर्भातील प्रश्न विधानसभेत उपस्थित केला होता. या प्रश्नाच्या उत्तरात अधिक माहिती देताना आदिवासी विकास मंत्री वुईके यांनी सांगितले, शासकीय आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांसाठी सन २०२४- २०२५ या शैक्षणिक वर्षात शालेय गणवेश, पी. टी. ड्रेस, नाईट ड्रेस हे साहित्य उद्योग, उर्जा व कामगार विभागाचे खरेदी धोरण, तसेच उर्जा व कामगार विभागाने दिलेल्या अभिप्रायाच्या आधारे खरेदी करण्यात आले. या गणवेश खरेदी प्रकरणाची चौकशी करण्यात आली असून या खरेदीमध्ये कोणतीही अनियमितता आढळली नसल्याचे. मंत्री वुईके यांनी सांगितले.

### पवन उर्जा कंपन्यांकडून शेतक-यांना होणा-या त्रासासंदर्भात उच्चस्तरीय चौकशी करणार

**मुंबई :** धाराशिव जिल्ह्यात २२ पवन उर्जा कंपन्यांकडून ८४३ पवनस्तंभाचे काम सुरू आहे. या कंपन्यांकडून स्थानिक शेतक-यांना होणा-या त्रासासंदर्भात तक्रारी प्राप्त झाल्या आहेत. याची गांभीर्याने दखल घेउन या प्रकरणाची पोलिस महानिरीक्षक यांच्यामार्फत उच्चस्तरीय चौकशी करण्यात येईल असे कृषी राज्यमंत्री पंकज भोयर यांनी विधानसभेत सांगितले.तांदुळवाडी येथील शेतक-यांना कंपन्यांकडून मारहाण प्रकरणावर विधानसभा सदस्य कैलास घाडगे पाटील यांनी लक्षवेधी सूचना मांडली होती.राज्यमंत्री भोयर म्हणाले की, कंपन्यांनी जमीन भाडेपट्टीने घेण्याच्या दस्तामध्ये शेतक-यांच्या बनावट सह्या वापरून खोटी शपथपत्रे सादर केली, काही प्रकरणांत शेतक-यांना खोटे धनादेश देउन फसवले अशा तक्रारी प्राप्त झाल्या आहेत. या प्रकाराबाबत पोलीस चौकशी सुरू असून कायदेशीर कारवाई केली जाईल. तसेच धाराशिव जिल्ह्यात पवन उर्जा तसेच सौर उर्जा प्रकल्पांशी संबंधित जिल्हास्तरीय समितीकडे ११३ तक्रारी प्राप्त झाल्या असून, उपविभागीय सनियंत्रण समितीकडे २०० तक्रारी प्राप्त झाल्या आहेत या तक्रारींपैकी २१० तक्रारी निकाली काढल्या असून उर्वरित १०३ तक्रारीवर कार्यवाही सुरू आहे. या संपूर्ण प्रकरणाची लवकरच चौकशी केली जाईल. शेतक-यांना त्रास होणार नाही यांची खबरदारी घेतली जाईल. या प्रकरणाची चौकशी अधिका-यांमार्फत केली जाईल असेही राज्यमंत्री भोयर यांनी स्पष्ट केले.या लक्षवेधी सूचनेच्या चर्चेत सदस्य अमित देशमुख यांनी सहभाग घेतला.

### खरेदी-विक्रीवेळी भरले जाणारे मुद्रांक शुल्क स्थानिक विकासासाठी

**मुंबई :** राज्यातील मालमत्ता खरेदी-विक्रीच्या व्यवहारांवेळी भरले जाणारे मुद्रांक शुल्क स्थानिक विकासासाठी वापरण्याबाबत मुख्यमंत्री व वित्तमंत्री यांच्या समवेत बैठक घेण्यात येणार असल्याची माहिती महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी विधानसभेत लक्षवेधी सूचनेच्या उत्तरात दिली.सदस्य रणधीर सावरकर यांनी याबाबत लक्षवेधी सूचना उपस्थित केली होती. यावेळी सदस्य भास्कर जाधव यांनी चर्चेत सहभाग घेतला.महसूल मंत्री श्री. बावनकुळे म्हणाले, सद्य?स्थितीत मालमत्ता नोंदणीदरम्यान वसूल होणा-या मुद्रांक शुल्कातून एक टक्का रक्कम शासनाच्या एकत्रित निधीत जमा केली जाते. ही रक्कम थेट संबंधित महापालिका, नगरपालिका किंवा ग्रामपंचायतींना तत्काळ वितरित व्हावी यासाठी कार्यपद्धती तयार करण्यात येईल.

### तळेगाव दाभाडे कट प्रकरणात विशेष तपास पथकाची स्थापना- योगेश कदम

**मुंबई :** तळेगाव-दाभाडे येथे पिंपरी चिंचवड पोलिसांनी दोन जणांना पिस्तुल व जिवंत काडतुसांसह पकडले. चौकशीनंतर या आरोपींनी लोकप्रतिनिधींना जीवे मारण्याचा कट रचल्याचे समोर आले. याबाबतची चौकशी करण्यासाठी विशेष तपास पथक (एसआयटी) स्थापन करण्यात येईल असे गृहराज्यमंत्री योगेश कदम यांनी विधानसभेत लक्षवेधी सूचनेच्या उत्तरात दिली. सदस्य सुनिल शेळके यांनी याबाबत लक्षवेधी सूचना उपस्थित केली होती. राज्यमंत्री श्री. कदम म्हणाले, तळेगाव दाभाडे (ता. मावळ, जि. पुणे) एस.टी. स्टॅण्ड परिसरात दोन आरोपींकडून गावठी पिस्तुल व जिवंत काडतुसे बाळगल्याचे आढळल्यामुळे याबाबत गुन्हा नोंदविण्यात आला आहे. महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण अधिनियम अंतर्गत कारवाई करण्यात आली आहे. या गुन्ह्यातील आरोपींना जामीन मंजूर झाल्यावर तडीपार करण्यात आले आहे.

### आदिवासी विभागाच्या वसतिगृहांतील विद्यार्थ्यांच्या भत्त्यांमध्ये वाढ

**मुंबई :** अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना मिळणा-या विविध भत्त्यांमध्ये मोठी वाढ केली असल्याची माहिती आदिवासी विकास मंत्री अशोक वुईके यांनी विधानसभेत निवेदनाद्वारे दिली.मंत्री वुईके म्हणाले, अनुसूचित जमातीच्या मुला-मुलींना त्यांच्या गावी राहून उच्च शिक्षण घेणे सुकर व्हावे, याकरिता आदिवासी विकास विभागामार्फत शासकीय वसतिगृहे कार्यान्वित आहेत. या वसतिगृहांमध्ये इयत्ता ८ वी पासून पुढील अभ्यासक्रमासाठी प्रवेश देण्यात येतो. सध्या एकूण ४९० वसतिगृहे कार्यान्वित आहेत.आदिवासी शासकीय वसतिगृहांमध्ये प्रवेशित विद्यार्थ्यांना निवास भत्ता, वेडिंग साहित्य, शालेय स्टेशनरी, क्रमिक पुस्तके इ. साहित्य खरेदी भत्ता, आहार भत्ता याकरिता एकरकमी रक्कम विद्यार्थ्याच्या बँक खात्यामध्ये थेट डीबीटीद्वारे हस्तांतरित केली जाते. दि २४ जून २०२५ रोजीच्या मंत्रिमंडळ बैठकीत मान्यतेनुसार आदिवासी शासकीय वसतिगृहांमध्ये प्रवेशित विद्यार्थ्यांना दरवाढ करण्यात येत आहे.


दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर, अमरावती
वि.श्री.एस.एस.बिंगरदेव ८ वे सह दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर, अमरावती यांचे न्यायालयात

**जाहीरनामा/सायटेशन**

किरकोळ अर्ज - १२४४/२०२५
श्रीमती सुनिता अधिक तीन विरुध्द निरंक
पुढील तारीख ०७.०८.२०२५

अर्जदार :
1) Smt. Sunita Ramesh Sonone, **Age 50 yrs., Occu.- Household work R/o. Ganesh Mandir, Priya Township, Vidarbha Mahavidyalaya, Amravati, Tq. & Dist. Amravati**
2) Prathamesh Rameshrao Sonone, **Age 24 yrs., Occu.- Education R/o. Ganesh Mandir, Priya Township, Shivaji Nagar, Amravati, Tq. & Dist. Amravati**
3) Anshika Ramesh Sonone, **Age 21 yrs., Occu.- Education R/o. Near Ganesh Mandir, Priya Township, Shegaon Naka Vidarbha Mahavidyalaya, Amravati, Tq. & Dist. Amravati**
4) Kasabai Champatrao Sonone, **Age 77 yrs., Occu.- Nil R/o. Malkhed Railway,Tq. Chandur Railway, Dist. Amravati**

-- विरुध्द --

गैरअर्जदार - निरंक

**सर्वत्र लोकास सुचित करण्यात येते की,** मयत रमेश चंपत सोनोने **हे** दि.०५.०४.२०२५ **रोजी अमरावती, ता.जि.अमरावती येथे मयत झाले.** अर्जदार सुनिता अधिक तिन विरुध्द निरंक **यांनी वरीलप्रमाणे यांनी ह्या कोर्टात सदरहू मयत यांचे वारसांचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत** APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE **प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.**

त्यापेक्षा **श्रीमती सुनिता अधिक तिन विरुध्द निरंक** वरीलप्रमाणे सदरहू मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजविण्याचे असेल तर ह्या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने ह्या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि ह्या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास तर सदरहू कोर्ट सदरहू अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबित दिसल्यास त्यांना सदरहू मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज **दिनांक ०१.०७.२०२५** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
**आदेशान्वये,**
सहायक अधीक्षक,
**दिवाणी न्यायालय (व-स्तर), अमरावती**



दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर, अमरावती
वि.श्रीमती एन.सी.सोरटे ७ वे सह दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर, अमरावती यांचे न्यायालयात

**जाहीरनामा/सायटेशन**

किरकोळ अर्ज - ११२५/२०२५
श्री राजेश विरुध्द निरंक
पुढील तारीख २१.०७.२०२५

अर्जदार :- १. राजेश अशोकराव पाखरे, **वय ४७ वर्षे, धंदा -नोकरी रा.विलास कॉलनी, विमवि, अमरावती, ता.जि.अमरावती**

-- विरुध्द --

गैरअर्जदार :- निरंक

**सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की,** मयत अशोक राजाराम पाखरे हे दि.१२/१०/२०२२ **रोजी** अमरावती **येथे मयत झाले.** अर्जदार राजेश विरुध्द निरंक **यांनी वरीलप्रमाणे यांनी ह्या कोर्टात सदरहू मयत यांचे वारसांचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत** APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE **प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.**

त्यापेक्षा **श्री राजेश विरुध्द निरंक** वरीलप्रमाणे सदरहू मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजविण्याचे असेल तर ह्या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने ह्या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि ह्या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास तर सदरहू कोर्ट सदरहू अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबित दिसल्यास त्यांना सदरहू मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज **दिनांक २५.०६.२०२५** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
**आदेशान्वये,**
सहायक अधीक्षक,
**दिवाणी न्यायालय (व-स्तर), अमरावती**



दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर, अमरावती
वि.श्रीमती एन.सी.सोरटे ७ सह दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर, अमरावती यांचे न्यायालयात

**जाहीरनामा/सायटेशन**

किरकोळ अर्ज - ११४३/२०२५
श्री गौरव अधिक एक विरुध्द निरंक
पुढील तारीख २५.०७.२०२५

अर्जदार :
1) Gaurav Vikas Jade, **Age 38 yrs., Occu.- Service R/o. Near Hanuman Mandir, Patvipura, Amravati**
2) Vaishali Vikas Jade, **Age 70 yrs., Occu.- Household B-303, Daya Sadan, Navghar Road, Near Hanuman Mandir, Bhaidar East, Thane**
3) Kavita Vinay Yadav, **Age 43 yrs., Occu.- Household R/o. Room No.1, Kalyan Compound Rc Marg Near Bank of India, Chembur, Mumbai**

-- विरुध्द --

गैरअर्जदार - निरंक

**सर्वत्र लोकास सुचित करण्यात येते की,** मयत विकास गोंविदराव जडे **हे** दि.१३.०७.२०२० **रोजी ठाणे, ता.जि. ठाणे येथे मयत झाले.** अर्जदार गौरव अधिक दोन विरुध्द निरंक **यांनी वरीलप्रमाणे यांनी ह्या कोर्टात सदरहू मयत यांचे वारसांचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत** APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE **प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.**

त्यापेक्षा **श्री गौरव अधिक दोन विरुध्द निरंक** वरीलप्रमाणे सदरहू मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजविण्याचे असेल तर ह्या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने ह्या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि ह्या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास तर सदरहू कोर्ट सदरहू अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबित दिसल्यास त्यांना सदरहू **मयत** यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज **दिनांक २७.०६.२०२५** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
**आदेशान्वये,**
सहायक अधीक्षक,
**दिवाणी न्यायालय (व-स्तर), अमरावती**



दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर, अमरावती
श्री.एस.बी.कळदाते २ रे सह दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर, अमरावती यांचे न्यायालयात

**जाहीरनामा/सायटेशन**

किरकोळ अर्ज - १२५२/२०२५
शोभा व इतर वि निरंक
पुढील तारीख २०.०८.२०२५

अर्जदार :-
१. शोभा गोपालजी दुबे, **वय ६८ वर्षे, धंदा - घरकाम**
२. महेश गोपालजी दुबे, **वय ४४ वर्षे, धंदा - घरकाम**
३. योगेशकुमार गोपालजी दुबे, **वय ४० वर्षे, धंदा - नोकरी**
४. निलीमा पवन दुबे, **वय ४३ वर्षे, धंदा - घरकाम**
५. उदय पवन दुबे, **(नाबालक), वय १५ वर्षे, धंदा - शिक्षण**
**सर्व रा. सितारामबाबा मंदिर बालाजी प्लाट, अमरावती, ता.जि.अमरावती**

-- विरुध्द --

गैरअर्जदार :- निरंक

**सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की,** मयत गोपाल शंकरलालजी दुबे हे दि.३०/१०/२०२४ **रोजी** अमरावती **येथे मयत झाल्या.** अर्जदार शोभा गोपालजी दुबे व इतर **यांनी वरीलप्रमाणे यांनी ह्या कोर्टात सदरहू मयत यांचे वारसांचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत** APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE **प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.**

त्यापेक्षा **शोभा गोपालजी दुबे व इतर** वरीलप्रमाणे सदरहू मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजविण्याचे असेल तर ह्या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने ह्या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि ह्या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास तर सदरहू कोर्ट सदरहू अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबित दिसल्यास त्यांना सदरहू मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज **दिनांक ०३.०७.२०२५** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
**आदेशान्वये,**
सहायक अधीक्षक,
**दिवाणी न्यायालय (व-स्तर), अमरावती**



दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर, अमरावती
वि.श्री.पी.के.धोंडगे ६ वे सह दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर, अमरावती यांचे न्यायालयात

**जाहीरनामा/सायटेशन**

किरकोळ अर्ज - १२१२/२०२५
श्री ज्ञानेश्वर अधिक दोन विरुध्द निरंक
पुढील तारीख ०२.०८.२०२५

अर्जदार :
1) Dnyaneshwar Sudhakarrao Tayalkar **Age 52 yrs., Occu.- Labour, R/o. Plot No. 1-AB, Mangaldham Colony, Shimla Vihar, Rukhamini Nagar, Amravati**
2) Dewanand Sudhakarrao Tayalkar, **Age 50 yrs., Occu.- Labour R/o. House No. 390/E, Galli No. 1, Mayur Kirana, Uttam Nagar, Amravati, Tq. & Dist. Amravati**
3) Pratibha Rajesh Kshisagar, **Age 52 yrs., Occu.- Household, All R/o. Sunny pales, Gokhale Chal, Khamgaon, Tq. Khamgaon, Dist. Buldhana**

-- विरुध्द --

गैरअर्जदार - निरंक

**सर्वत्र लोकास सुचित करण्यात येते की,** मयत कांता सुधाकरराव तायलकर **हया** दि.०९.०४.२०२३ **रोजी अमरावती,ता.जि.अमरावती येथे मयत झाले.** अर्जदार ज्ञानेश्वर अधिक दोन विरुध्द निरंक **यांनी वरीलप्रमाणे यांनी ह्या कोर्टात सदरहू मयत यांचे वारसांचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत** APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE **प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.**

त्यापेक्षा **श्री.ज्ञानेश्वर अधिक दोन विरुध्द निरंक** वरीलप्रमाणे सदरहू मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजविण्याचे असेल तर ह्या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने ह्या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि ह्या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास तर सदरहू कोर्ट सदरहू अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबित दिसल्यास त्यांना सदरहू मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज **दिनांक २६.०६.२०२५** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
**आदेशान्वये,**
सहायक अधीक्षक,
**दिवाणी न्यायालय (व-स्तर), अमरावती**



दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर, अमरावती
श्री.एस.बी.कळदाते २ रे सह दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर, अमरावती यांचे न्यायालयात

**जाहीरनामा/सायटेशन**

किरकोळ अर्ज - १२३३/२०२५
अनिल व इतर वि निरंक
पुढील तारीख १९.०८.२०२५

अर्जदार :-
१. अनिल बळीरामजी इंगोले, **वय ३५ वर्षे, धंदा - मजुरी**
२. सुनिल बळीरामजी इंगोले, **वय ३७ वर्षे, धंदा - मजुरी दोघे रा.भिम टेकडीच्या जवळ बेनोडा जहागिर, अमरावती**
३. अनिता शंकर सोनोने, **वय ४० वर्षे, धंदा - घरकाम रा.गल्ली नं.१ भारत गवळी हाउस जवळ, चावरे नगर, अमरावती ता.जि.अमरावती**
४. किरण दिपक महाजन, **वय ४१ वर्षे, धंदा - घरकाम रा. गजानन महाराज मंदिराजवळ, महादेव खोरी, अमरावती, ता.जि.अमरावती**

-- विरुध्द --

गैरअर्जदार :- निरंक

**सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की,** मयत रमाबाई बळीरामजी इंगोले हे दि.०३/०१/२०२५ **रोजी** अमरावती **येथे मयत झाल्या.** अर्जदार अनिल बळीरामजी इंगोले व इतर **यांनी वरीलप्रमाणे यांनी ह्या कोर्टात सदरहू मयत यांचे वारसांचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत** APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE **प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.**

त्यापेक्षा **अनिल बळीरामजी इंगोले व इतर** वरीलप्रमाणे सदरहू मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजविण्याचे असेल तर ह्या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने ह्या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि ह्या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास तर सदरहू कोर्ट सदरहू अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबित दिसल्यास त्यांना सदरहू मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज **दिनांक ०२.०७.२०२५** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
**आदेशान्वये,**
सहायक अधीक्षक,
**दिवाणी न्यायालय (व-स्तर), अमरावती**

## संपादकीय


प्रबंध संपादक : प्रदीप देशपांडे

# चीनवर नामुष्की

दलाई लामा हे पद यापुढेही सुरूच राहणार असून, 'गेडन फोड्रंग ट्रस्ट' कडेच आपला उत्तराधिकारी ठरवण्याचा अधिकार आहे. यात कोणालाही हस्तक्षेप करता येणार नाही, असे तिबेटचे आध्यात्मिक धर्मगुरू दलाई लामा यांनी स्पष्ट केलेच. भारतानेही त्यांची पाठराखण केल्याने या विषयात नाक खुपसणाऱ्या चीनला मोठी चपराक बसली आहे. हा विषय बौद्ध समुदाय, तिबेटी परंपरा आणि दलाई लामा यांच्या अधिकारातील आहे. त्यात कोणालाही हस्तक्षेप करता येणार नाही, असे भारताने स्पष्ट केले आहे. दलाई लामांच्या भूमिकेमुळे यासंबंधीचा वाद थांबतो की त्यावर पडदा पडतो, हे पाहावे लागेल. लामांच्या मृत्यूनंतर त्यांचा उत्तराधिकारी असेल की नाही, यावरील अनिश्चितता तूर्त संपली आहे. दहा वर्षांपूर्वी दलाई लामा यांनी या ट्रस्टची स्थापना केली होती. सध्याचे चौदावे दलाई लामा - तेंझिन ग्यात्सो यांना 'ल्हामा थोंडुप' म्हणूनही ओळखले जाते. गेल्या वर्षी त्यांनी तिबेटची सर्वात पवित्र परंपरा रद्द केली जाऊ शकते किंवा त्यांचा उत्तराधिकारी ही महिला किंवा चीनबाहेर जन्मलेली व्यक्ती असू शकते, असे वक्तव्य केले होते.दलाई लामा पद यापुढेही सुरू ठेवावे, असे आवाहन करणारे संदेश जगभरातील तिबेटी बौद्धांकडून आले. पुनर्जन्म ओळखण्याची जबाबदारी ट्रस्टच्या सदस्यांवर आहे, असे उद्गार दलाई लामा यांनी काढले होते. तिबेटला चीनकडून अधिकाधिक स्वायत्तता लाभावी, यासाठी तिबेटचे राज्यप्रमुखही असलेल्या दलाई लामा यांचे प्रयत्न सुरू असतानाच, १९५८ मध्ये तेथील खम्पा जमातीने उठाव केला. या उठावाला लामांचे प्रोत्साहन असावे, असा संशय निर्माण झाला व त्यामुळे चीन शासनाकडून त्यांना अटक होईल, असे संकेत मिळाले होते. त्यानंतर १७ मार्च १९५९ रोजी दलाई लामा यांनी तिबेटमधून पलायन केले आणि ३१ मार्च १९५९ रोजी त्यांना भारतात आश्रय मिळाला. माओंच्या नेतृत्वाखाली चीनमध्ये कम्युनिस्ट क्रांती घडवून, १ ऑक्टोबर १९४९ रोजी स्थापन झालेल्या नव्या कम्युनिस्ट सरकारने ऑक्टोबर १९५० मध्ये लष्करी आक्रमणाद्वारे तिबेटचा ताबा घेतला.तिबेट आपला सार्वभौम हिस्सा असल्याचा चीन सरकारचा दावा होता. तिबेटवर चिनी राजघराण्याचे आधिपत्य चालत आलेले असले, तरी राज्यकारभार स्वायत्त होता. तिबेटी बौद्ध परंपरेनुसार, दलाई लामा प्रमुख धर्मगुरू मानले जात व लामा राज्यकारभार चालवत असत. चिनी राजघराण्यांनी हीच परंपरा कायम राखली होती, असा तिबेटी बौद्धांचा दावा होता. तिबेट स्वतंत्र राष्ट्र असल्याचा तिबेटी राज्यकर्त्यांचा दावा असला, तरी चिनी सत्ताधाऱ्यांना तो मान्य नव्हता. चीनने आक्रमण करून तिबेटचा ताबा घेतला, तेव्हा तिबेटने संयुक्त राष्ट्र संघाकडे दाद मागितली. परंतु तिथे प्रतिसाद मिळाला नव्हता. त्यावेळी भारताची तिबेटच्या प्रश्नावरून चीनबरोबर संघर्ष करण्याची तयारी नव्हती. एप्रिल १९५१ मध्ये तिबेटच्या शिष्टमंडळाने चीनबरोबर वाटाघाटी करून समझोता केला. चीनने तिबेटला अंतर्गत स्वायत्तता देण्याचे मान्य केले. मात्र प्रत्यक्षात ढवळाढवळ करण्यास सुरुवात केली.बौद्ध परंपरेत दलाई लामांप्रमाणे पंचेन लामांनाही महत्त्वाचे स्थान आहे. दलाई लामा यांचे तिबेटवरील प्रभुत्व कमी करण्यासाठी चीनने १९५१ मध्ये तिबेटशी केलेल्या करारानंतर पंचेन लामा यांना बळ दिले. त्यांनी शिंगात्से येथे वेगळे सरकार स्थापन केले. मग चीनने बौद्ध मठाच्या अधिकारांचे खच्चीकरण सुरू केले. त्यामुळे दलाई लामा यांच्या सरकारची स्वायत्तता नावापुरतीच उरली. १९५६ मध्ये चीनचे पंतप्रधान चौ एन लाय आणि पंचेन लामा यांच्या समवेत दलाई लामा भारतात आले असताना, त्यांनी गुपचुपपणे तिबेटमधील परिस्थिती नेहरूंना कथन करून भारतात आश्रय देण्याची विनंती केली होती आणि त्याप्रमाणे शेवटी भारतातच त्यांना आसरा मिळाला. हा इतिहास जाणून घेतल्याविना दलाई लामांचे महत्त्व समजणार नाही.चौदाव्या दलाई लामांचा उत्तराधिकारी कोण, हा मुद्दा मध्यंतरी चर्चेचा झाला होता. ९ मार्च रोजी दलाई लामा यांच्या 'व्हॉईस फॉर व्हॉईसलेस : ओव्हर सेव्हन डिकेड्स ऑफ स्ट्रगल विथ चायना फॉर माय लँड अँड माय पीपल' या पुस्तकाचे प्रकाशन झाल्यानंतर चीनकडून तीव्र प्रतिक्रिया उमटली होती. पुढील दलाई लामा म्हणजेच चौदाव्या दलाई लामांचा पुनरावतार हा मुक्त जगात जन्माला येईल, असे या पुस्तकात स्वतः दलाई लामा यांनीच म्हटले आहे. म्हणजेच दलाई लामा नावाची पंरपरा सुरू राहील, हेच त्यांनी अधोरेखित केले आहे. परंतु त्यांच्या मते, चीनमधील जग हे बंदिस्त असल्याने, त्यांच्या पुनरावतारात बीजिंगची कोणतीही भूमिका राहणार नाही आणि राहूदेखील नये, हेच त्यांनी म्हटले होते.भारतात मोठ्या संख्येने राहणाऱ्या आणि जगभरात विखुरलेल्या तिबेटी समुदायातील अनेकांना चौदाव्या दलाई लामांच्या वार्धक्याची जाणीव आहे. परंतु त्यांचा उत्तराधिकारी सुरळीतपणे निवडला जाईल की नाही, याबद्दल लोक साशंक आहेत. तो ठरवण्याचा अधिकार ट्रस्टला असला, तरी चीनमधील शी जिनपिंग सरकार अत्यंत कठोर असल्यामुळे ते प्रत्यक्षात काय करील, याचा भरवसा नाही. दोन वर्षांपूर्वी दलाई लामांनी अमेरिकी मंगोलियाई मुलाला तिबेटी बौद्ध धर्माचा तिसरा महत्त्वाचा आध्यात्मिक नेता म्हणून निवडले. त्या मुलाचे वय आठ वर्षे होते आणि स्थानिक बातम्यांनुसार, हा मुलगा जुळ्या मुलांपैकी एक असून, त्याच्या रूपात 'शून्याव्या खलखा जेत्सून धम्पा रिनपो' यांचा पुनर्जन्म झाल्याचे दलाई लामा यांनीच म्हटले आहे. मात्र २००४ सालीच चीन सरकारने कायद्यात बदल करून, सरकारच्या परवानगीविना दलाई लामा यांचा उत्तराधिकारी शोधता येणार नाही, असे जाहीर केले. दहा वर्षांपूर्वी पीपल्स काँग्रेस ऑफ तिबेटच्या स्थायी समितीवरील एका सदस्यानेही उत्तराधिकारी स्वीकारण्याच्या प्रक्रियेत हस्तक्षेप करण्याचा अधिकार चीन सरकारला आहेच, असे म्हटले होते. त्यामुळे चीन आणि तिबेट संबंधातील गुंतागुंत सुरूच राहण्याची दाट शक्यता आहे.

# दलाई लामा विरुद्ध चीन

**दलाई लामा यांनी लवकरच आपला उत्तराधिकारी नेमणार असल्याचं म्हटलं असलं, तरी चीनच्या म्हणण्यानुसार उत्तराधिकाऱ्याला चिनी सरकारची परवानगी आवश्यक असेल. चीनने कायदा करून धर्मगुरू शोधण्याच्या प्रक्रियेत आपला अधिकार असल्याची तरतूद केली आहे.**



जगभरात विखुरलेल्या तिबेटी लोकांसाठी सहा जुलै हा महत्त्वाचा दिवस असतो. तिबेटी लोकांचे आध्यात्मिक आणि सर्वोच्च नेते दलाई लामा यादिवशी ९० वर्षांचे होतील. त्यादिवशी दलाई लामा काय बोलणार, याकडे साऱ्या जगाचे लक्ष आहे. त्यादिवशी ते आपला उत्तराधिकारी जाहीर करतील, अशी जगभर चर्चा होती. आता यासंबंधीच्या चर्चेला पूर्णविराम मिळाला आहे. बुधवारी दलाई लामा यांनी ६०० वर्षं जुनी 'दलाई लामा' या संस्थेची परंपरा कायम ठेवून लवकरच उत्तराधिकारी नेमणार असल्याचं म्हटलं आहे.

२०११ मध्ये दलाई लामा यांनी स्थापन केलेल्या ' गादेन फोड्रंग ट्रस्ट आपला उत्तराधिकारी ठरवेल. पुढचे दलाई लामा ठरविण्याचा अधिकार चीनला नाही,' असंही त्यांनी सांगितलंय. यावर चीनने तीव्र प्रतिक्रिया व्यक्त केली आहे. हिमाचल प्रदेशातील धर्मशाला आणि आजूबाजूच्या परिसरात उत्साहाचे वातावरण आहे. १९६०च्या मे महिन्यापासून धर्मशाला हेच दलाई लामा यांच घर आणि शहर झालं आहे. मार्च महिन्यात प्रसिद्ध झालेल्या आपल्या आत्मचरित्रात दलाई लामा यांनी म्हटलं होतं, 'आपला उत्तराधिकारी चीनच्या बाहेर जन्मलेला असेल.' दलाई लामांची ही घोषणाही चीनच्या सत्ताधाऱ्यांना आवडली नव्हती. तिबेटी संस्कृती संपवून तिथे चिनी संस्कृती लादण्याचा चीनचा प्रयत्न आहे, असं तिबेटी निर्वासित सरकारचं म्हणणं आहे, पण चीनच्या म्हणण्यानुसार दलाई लामा यांच्या उत्तराधिकाऱ्याला चिनी सरकारची परवानगी आवश्यक असेल. २००७ मध्ये चीनने एक कायदा करून दलाई लामा यांच्यासह अन्य तिबेटी बौद्ध धर्मगुरू शोधण्याच्या प्रक्रियेत आपला अधिकार असल्याची तरतूद केली आहे.

दलाई लामा यांचे अनुयायी भारत, युरोप आणि अमेरिकेसह जगभरात पसरलेले आहेत. त्यांच्या अहिंसेच्या विचाराने हॉलिवूड अभिनेता रिचर्ड गिअरसह अनेक महत्त्वाच्या व्यक्ती प्रभावित झाल्या आहेत. दलाई लामा खूप व्यवहारी आहेत. एके काळी 'स्वतंत्र' तिबेटची मागणी करणारे दलाई लामा आता तिबेटला 'अधिक स्वायत्तता' देण्याची मागणी करतात. दलाई लामा आणि तिबेटी लोकांसाठी तिबेटी संस्कृती आणि बौद्ध धर्माचे तिबेटी स्वरूप अधिक महत्त्वाचे आहे.

दलाई लामा यांचा उत्तराधिकारी शोधण्याची एक वेगळी तिबेटी परंपरा आहे. या परंपरेप्रमाणे दलाई लामा यांच्या मृत्यूनंतर त्यांच्या उत्तराधिकाऱ्याचा शोध सुरू करण्यात येतो. त्याला पुनर्जन्म म्हणतात. ही प्रक्रिया खूप कठीण, गुंतागुंतीची आणि लांबलचक असते. वेगवेगळ्या निकषांवर एक लहान मुलगा शोधला जातो. नंतर त्याला प्रशिक्षण दिलं जातं आणि दलाई लामा म्हणून तयार केलं जातं. हे प्रशिक्षणदेखील खूप कठीण असतं, कारण पुढच्या दलाई लामासमोर अनेक आव्हानं असतात. चीनकडून तिबेटला अधिक स्वायत्तता कशी मिळेल, यासाठी प्रयत्न करायचे असतात. १५ वा दलाई लामा 'स्वतंत्र जगात जन्मलेला असेल, असं आताच्या १४ व्या दलाई लामा यांनी सांगितलं होतं, म्हणजे चीनमध्ये जन्मलेला नसणार; अर्थात हे चीनला रुचणारं नाही. २०११ ला दलाई लामा यांनी, ते जेव्हा ९० वर्षांचे होतील तेव्हा पुढच्या दलाई लामांबद्दल महत्त्वाची घोषणा करतील, असे म्हटले होते.

जगभर जवळपास दीड लाख तिबेटी निर्वासित आहेत. त्यातील ९० हजार भारतात आहेत. सुमारे १६ हजार नेपाळमध्ये, भूतानमध्ये दोन हजार आणि उर्वरित अमेरिका, कॅनडा, ऑस्ट्रेलिया व अन्य देशांत राहतात. सर्वाधिक निर्वासित भारतात राहत असल्याने पुढचे दलाई लामा कदाचित भारतात जन्मलेले असू शकतात. चीनचा तिबेटमध्ये हस्तक्षेप वाढत आहे. तिबेटीयन लोकांची संख्या कमी करण्याच्या दृष्टीने चीनचे प्रयत्न सुरू आहेत. चीनमध्ये तिबेट व इतर चार स्वायत्त प्रदेश आहेत. खरं तर ते नावापुरतेच स्वायत्त आहेत. पूर्वीचा तिबेट खूप मोठा होता. जुन्या तिबेटमध्ये सतत येत असलेल्या हान चिनी लोकांमुळे तिबेटी अल्पसंख्याक झाले आहेत. हान चिनी लोकांना तिथे पाठविण्याचे सरकारचं धोरण राहिलं आहे. ते व्यापार, उद्योगात आहेत. दलाई लामा यांचा वाढदिवस तिबेटमध्ये साजरा करणं गुन्हा ठरतं. असं करणाऱ्यांना अटक केली जाते.

६ जूनला ११ वे पंचेन लामा चीनचे अध्यक्ष शी जिनपिंग यांना भेटले होते. चीनही दलाई लामा यांचा उत्तराधिकारी शोधण्याच्या प्रयत्नांत आहे. बौद्ध धर्माच्या तिबेटियन स्वरूपाला चिनी बौद्ध धर्माचे स्वरूप देण्याचा आपला प्रयत्न असल्याचं पंचेन लामा यांनी शी जिनपिंग यांना सांगितलं. तिबेटमध्ये दलाई लामांनंतर पंचेन लामा सर्वात मोठे आध्यात्मिक नेते आहेत, मात्र सध्याचे पंचेन लामा वादग्रस्त आहेत. १९९५ मध्ये दलाई लामा यांनी सहा वर्षांच्या एका मुलाला पंचेन लामा म्हणून निवडलं होतं, पण चीनने स्वतः वेगळा मुलगा पंचेन लामा म्हणून निवडला. दलाई लामा यांनी निवडलेला सहा वर्षांचा मुलगा त्यानंतर गायब झाला. आश्चर्य म्हणजे ब्राझील, रशिया, भारत, चीन, दक्षिण आफ्रिका व अन्य काही देशांच्या 'ब्रिक्स' परिषदेची सुरुवात सहा जुलै याच दिवशी ब्राझीलच्या रिओ-दी-जेनेरो येथे होणार आहे. त्यात चीनचे अध्यक्ष शी जिनपिंग उपस्थित राहणार नसून, पंतप्रधान ली कियांग उपस्थित राहणार आहेत. पंतप्रधान नरेंद्र मोदी त्यात सहभागी होणार आहेत. तिबेट हा चीनचा अविभाज्य भाग असल्याची चीनची भूमिका आहे.

चीनने ७ ऑक्टोबर १९५० ला तिबेटवर आक्रमण केलं होतं. २६ ऑक्टोबर १९५१ ला पीपल्स लिबरेशन आर्मीचे (पीएलए) तीन हजार जवान तिबेटची राजधानी ल्हासा येथे घुसले. ल्हासाची वस्ती तेव्हा ३० हजार होती. १९५१ ते १९५९ दलाई लामा यांच्यासाठी खूप कठीण काळ होता. १९५२ मध्ये दलाई लामा यांच्या दोन पंतप्रधानांना राजीनामा देण्यास चीनने भाग पाडले. १९५४ मध्ये चीनने दलाई लामा यांना चर्चेसाठी बीजिंग इथे बोलावले होते. ४ सप्टेंबर १९५४ला बीजिंग रेल्वे स्टेशनवर पंतप्रधान चौ-एन-लाय यांनी त्यांचे स्वागत केले. दलाई लामा तेव्हा ६१ वर्षांच्या माओ-त्से-तुंग यांना भेटलेले. १९५९ च्या मार्च महिन्यात तिबेटी जनतेने चीनविरोधात उठाव केला. घोषणा दिल्या गेल्या. माओ, चौ-एन-लाय इत्यादींचे पुतळे जाळले. गुरतेंग कुनसांगसारख्या महिलांना पकडून गोळ्या घालून ठार मारले. दलाई लामा यांच्यावर ल्हासा सोडून सुरक्षित ठिकाणी जाण्याचा दबाव वाढत होता. शेवटी १७ मार्चच्या रात्री त्यांनी नोरबुलिंका पॅलेस सोडला. ३१ मार्च १९५९ च्या दुपारी दलाई लामा आणि त्यांचे सहकारी भारतात तवांगजवळच्या केन्झामेन येथे पोहचले. तिथे त्यांचे स्वागत करण्यात आले. पंतप्रधान जवाहरलाल नेहरू यांनी टेलिग्राम पाठवून त्यांचे स्वागत केले. दलाई लामा दोन वर्षांचे असताना त्यांना १४ वे दलाई लामा म्हणून निवडण्यात आले. माओ यांना भेटले तेव्हा ते १९ वर्षांचे होते आणि ल्हासा सोडण्याची वेळ आली तेव्हा २५ वर्षांचे!

काबीज केलेला प्रदेश परत न करण्याचे चीनचे धोरण असल्याने दलाई लामा यांनी 'स्वातंत्र्या'ऐवजी अधिक स्वायत्तता देण्याची योग्य मागणी केली. तिबेटी संस्कृती चीनपेक्षा पूर्णपणे वेगळी असल्याने किमान आपली संस्कृती, परंपरा अशा पद्धतीने कायम ठेवता येईल, असं त्यांना वाटतं. मात्र, चीनला हे मान्य नाही. पंचेन लामा मात्र चीनला मान्य होईल अशी भूमिका घेत असतात. आता आपल्याला हव्या त्याच व्यक्तीला दलाई लामा बनवण्याचा चीनचा प्रयत्न आहे, बलाढ्य चीन याबाबत काय करणार, हे लवकरच कळेल.(साभार म.टा)

जतिन देसाई

## गुरूचे महत्त्व..

गुरु शिष्य परंपरा हे भारत हे वैशिष्ट्य आहे शिष्याच्या जीवनातील अंधकाराचा नाश करून त्याला ईश्वरापर्यंत मिळण्याचे कार्य सुरू करत असतात पृथ्वीवरचे ईश्वराचे सगुण रूप म्हणजे गुरु असतात आणि गुरु हे ईश्वराचे निर्गुण रूप असतात. त्याचप्रमाणे शिष्याचे अज्ञान घालवून त्याची अध्यात्मिक प्रगती व्हावी यासाठी त्याला ते साधना सांगतात तसेच ती त्याच्याकडून करून घेतात आणि त्याला अनुभूती देतात त्यांना गुरु असे म्हणतात गुरु शिष्याच्या व्यवहारिक जीवनातील सुखाकडे लक्ष देत नाहीत कारण ते त्याच्या प्रारब्धानुसार असते गुरु फक्त शिष्याची अध्यात्मिक उन्नती कशी होईल एवढेच पाहतात ईश्वर निर्गुण असल्याने तो प्रत्यक्षपणे आपल्याशी बोलू शकत नाही यासाठीच तो आपली गुरूंची गाठ घालून देतो आपल्यामध्ये गुरुप्राप्ती व्हावी अशी तीव्र तळमळ असेल तर त्याचा गुणामुळे सुद्धा आपल्याला गुरु प्राप्ती होते आणि आपल्यावर गुरूंची कृपा होते असे गुरूंचे महत्त्व आहे.

संगिता भोसले.

## विठुरायाच्या चरणी अंतर्मनाची वारी...

आषाढी एकादशी म्हटली की, डोळ्यांसमोर येते ती पंढरपूरची वारी!वारकरी आपले तन, मन आणि धन सर्वकाही विठुरायाच्या चरणी अर्पण करून, पदोपदी भगवंताचे स्मरण करीत वारी करतात. काशीच्या पाच यात्रा आणि द्वारकेला तीन वेळा जाणे , या दोन्ही यात्रांनी जेवढे पुण्य मिळते, तेवढेच पुण्य एका पंढरपूरच्या वारीने मिळते, असे मानले जाते. त्यामुळे भक्तांच्या मनात वारी करून भक्तीच्या अथांग सागरात डुंबण्याची तीव्र इच्छा निर्माण होते.

मात्र, बरेचदा वैयक्तिक अडचणींमुळे किंवा इतर कारणांमुळे प्रत्यक्ष वारी करणे शक्य होत नाही. अशावेळी 'अंतर्मनाची वारी', म्हणजेच आपले मन, श्रद्धा आणि साधनेच्या माध्यमातून मानस रूपाने वारी करणे सहज शक्य आहे. ज्याप्रमाणे वारीत शेकडो किलोमीटरचा प्रवास करताना वारकरी नामस्मरण करतात, त्याचप्रमाणे आपणही घरी राहून, चालताना, काम करताना भगवंताचा नामजप करू शकतो.विठुरायाच्या चरणी आर्ततेने प्रार्थना करू या,'हे विठुराया, तू भक्तीचा भुकेला आहेस. तुझ्या चरणांशी येण्यासाठी तुझी भक्ती तळमळीने कशी करायची, हे तूच आम्हाला शिकव.

प्रिया बागडदेव

## शिवसेना उबाठा, मनसे....

शिवसेना उद्धव आणि महाराष्ट्र नवनिर्माण सेना या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहे. महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने सुद्धा वीस पंचवीस वर्षाच्या राज्याच्या राजकारणात सातत्याने कोल्यांट्या उड्या मारल्या आहेत. लोकसभा २०१९ निवडणूक प्रचार दरम्यान मनसे प्रमुख राज ठाकरेंनी विशेषतः नरेंद्र मोदी विरुद्ध सातत्याने आग ओकली होती. आज शिवसेना उद्धव आणि मनसे या पक्षाचा अस्तित्वाचा प्रश्न आहे. बृहन्मुंबई महापालिका यांच्या हातून निसटली की यांच्या राजकारणाला घरघर लागणार आहे . आदित्य ठाकरे आणि अमित ठाकरेंना राजकारणात मर्यादा आहेत. आजच्या मराठी कुटुंबातील नवीन पिढीला मराठी भाषेशी तसेच मराठी विरुद्ध अभाषिक वाद याच्याशी काही देणे घेणे नाही. मराठी मुलांना प्रामुख्याने विकास पाहिजे आहे.आज शिवसेना उबाठा आणि महाराष्ट्र नवनिर्माण सेनेला बृहन्मुंबई महानगरपालिकेची सत्ता पाहिजे.

विधानसभा निवडणूक २०१९ निकाला नंतर शिवसेना उबाठाचा भाजपला आलेला अनुभव लक्षात घेता आता तरी महाराष्ट्र नवनिर्माण सेना प्रमुख राज ठाकरे बाबत जपून पाहून पावले टाकली पाहिजे. कारण राज ठाकरे सुद्धा काम साधून घेण्या पुरते सलगी करतात. कारण त्यांना ना हिंदुत्व विषयी आस्था ना धर्मनिरपेक्ष बाबत अनास्था त्याच्या मागील राज्यातील राजकारणातून दिसून पडले आहे.

अविनाश देशपांडे

जनमाध्यम संवाद

## ठाकरे बंधु आणि विजयी मेळावा

महाराष्ट्राच्या राजकारणात बऱ्याच वर्षानंतर महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे आणि ठाकरे शिवसेनेचे प्रमुख उद्धव ठाकरे हे दोन बंधु वरळीच्या डोम येथील विजयी मेळाव्याच्या निमित्ताने ५ जुलै रोजी एकाच मंचावर दिसणार आहेत त्यामुळे या मेळाव्याकडे संपुर्ण महाराष्ट्राचे लक्ष लागून राहिले आहे. आगामी काळात होवू घातलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांसह जिल्हा व पंचायत समितीच्या निवडणुका होणार आहेत त्याच पार्श्वभुमीवर हे दोन्ही ठाकरे बंधु जनतेसमोर दिसणार असल्याने ते या विजयी मेळाव्याच्या अनुषंगाने महाराष्ट्राला काय संदेश देणार? याकडे महाराष्ट्रवासियांचे लक्ष लागून राहिले आहे.

राज आणि उद्धव ठाकरे या दोन भावांचे हे ऐक्य विशेषतः हिंदी सक्तिविरोधातील संघर्षाच्या निमित्ताने घडते आहे. सरकारने हिंदी सक्तीचा शासन निर्णय मागे घेतल्यानंतर मनसे आणि ठाकरे गटाने मराठी जनतेचा विजय म्हणून विजयी मेळावा साजरा करण्याचा निर्णय घेतला आहे.त्यामुळे हा मेळावा आगामी काळातील निवडणुकांसाठी मनसे आणि ठाकरे शिवसेना गटाला उभारी देण्यासाठी पोषक ठरणार असल्याचे बोलले जात असले तरी आगामी निवडणूकीसाठी युती होणार की नाही याचे अद्याप खुलासे झालेले नाहीत. मात्र या मेळाव्याद्वारे ठाकरे बंधु काय संदेश देणार हे पहाणे औत्सुक्याचे ठरणार आहे.

राजू जाधव

# विधिमंडळ:गोंधळ नको, कामकाज व्हावे



विधिमंडळ हे चर्चेचे सर्वोच्च व्यासपीठ.संसदीय राजकारणात विविध विचारसरणीला व त्याअनुषंगाने होणाऱ्या चर्चेला महत्त्व आहे. हे विचार सभागृहाच्या माध्यमाने जनतेपर्यंत जावेत, हा उद्देश असतो आणि अशाच प्रकारे प्रबोधनाचे कार्य कोणत्याही संस्थेने केले, तर त्याचा निश्चितच उपयोग होतो.सभागृहातील आयुधे, तेथे होणारी चर्चा, त्या चर्चेच्या अनुषंगाने पक्षाचे जाहीरनामे व त्याची कार्यक्रमपत्रिका, विविध आयुधांच्या माध्यमाने होणारी धोरणात्मक चर्चा ही महत्त्वाची असते. राज्याची विधानसभा असो, विधान परिषद असो किंवा संसद असो, तेथे अशा चर्चा या झाल्याच पाहिजेत. मात्र खासदार असो की आमदार एखाद्या मुद्द्याचे राजकारण करत सभागृहात गोंधळ घालतात.

राज्यात अनेक प्रश्न उभे ठाकले आहेत.शेतकऱ्यांच्या आत्महत्येचा, अवर्षणाचा, शिक्षण क्षेत्रातील घोटाळ्यांचा,रोजगाराचा,सिंचनाचा,असे कितीतरी प्रश्न असताना या प्रश्नांवर सभागृहात चर्चा व्हायला पाहिजे.मात्र सदस्यांच्या गोंधळात जनतेच्या प्रश्नांना बगल मिळते.प्रशासकीय कामकाजाला गती देण्याचे काम विधिमंडळाच्या अधिवेशनाच्या माध्यमातून होते. जनतेतून निवडून आलेल्या लोकप्रतिनिधींना सन्मान असला तरी, ज्या जनतेतून तो निवडून येतो, त्याचे प्रश्न, समस्या सरकारच्या माध्यमातून लवकर मार्गी लागाव्यात यासाठी वर्षातून तीन वेळा विधिमंडळाचे अधिवेशन होत असते. विधिमंडळ सदस्यांनी संसदीय कामकाजाला अनुसरून सरकारला प्रश्न विचारायला पाहिजे.लोकप्रतिनिधी जनतेला जबाबदार असतात,याचे भान सदस्यांनी ठेवायला पाहिजे.मात्र संसद सदस्य असो की विधिमंडळ सदस्य सभागृहात गोंधळ घालतात.यामुळे सभागृहाचा किमती वेळ वाया जातो.अधिवेशन सुरू होण्याआधी तारांकित प्रश्नांच्या माध्यमातून ४५ दिवस आधी जे प्रश्न विचारले जातात, त्याची उत्तरे संबंधित मंत्र्यांला लेखी स्वरूपात द्यावी लागतात. लक्षवेधी प्रश्न, हरकतीचा मुद्दा, औचित्यांचा मुद्दा, विशेष चर्चा आदींबाबत आमदारांना असलेल्या अधिकारांतून जास्तीत जास्त जनतेच्या प्रश्नांवर आवाज उठवला जाईल, अशी अपेक्षा असते. सर्वसाधारणपणे सभागृहात एखाद्या लोकप्रतिनिधीने मत मांडले ते खरे आहे असे मानून मंत्र्यांकडून त्यावर उत्तर दिले जाते; परंतु अलीकडच्या काळातील अधिवेशनातील कामकाज पाहता, जनतेच्या प्रश्नांवर सभागृहात चर्चा घडवून आणण्यापेक्षा किंवा या चर्चेत सहभागी होण्यापेक्षा विधिमंडळाच्या पायऱ्यांवर आंदोलन करण्यात आमदारांना अधिक रस असल्याचे दिसून येते.

पायऱ्यांवर केलेल्या आंदोलनाला इलेक्ट्रॉनिक्स माध्यमातून प्रसिद्धी मिळत असल्याने, आपला चेहरा त्यात दिसावा अशी धडपड त्यात अनेकांची पाहायला मिळते; परंतु विधिमंडळाच्या आवारात केलेले आंदोलन हे रेकॉर्डवर नसते. ते दिवसभरातील एक प्रकारे मनोरंजन होते.

विधिमंडळ हे कायदे मंडळ आहे. राज्याच्या जनतेच्या हिताचे निर्णय विधेयक बहुमताने पारित करून केले जातात. त्यामुळे विधानसभा अध्यक्ष पदावर बसलेल्या व्यक्तीचा मान मोठा आहे. मुंबई उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश आणि विधानसभा अध्यक्ष यांचा दर्जा हा सारखा असतो. त्यामुळे, नाना पटोले यांच्यासारख्या विधानसभा अध्यक्षपद आधी भूषविलेल्या लोकप्रतिनिधींनी पदाचा मान राखायला हवा होता. पटोले यांनी काँग्रेस पक्षासारख्या राष्ट्रीय पक्षाची राज्याची धुराही सांभाळलेली आहे. तरीही त्यांचा संयम सुटला. पटोले यांच्यावरील कारवाईनंतर, विरोधी पक्षाच्या सदस्यांनी कामकाजावर बहिष्कार टाकण्याचा जो निर्णय घेतला, त्यातून जनतेच्या प्रश्नांवर विरोधक संवेदनशील नाहीत, हे पुन्हा एकदा दिसून आले.

सभागृहात आमदारांनी मांडलेला मुद्दा हा रेकॉर्डवर घेतला जातो. त्यामुळे एखाद्या आमदारांने अभ्यासपूर्ण केलेले भाषण हा पुढील काळात संदर्भ म्हणून वापरला जाऊ शकतो, याचे भान प्रत्येक आमदारांनी ठेवायला हवे.

प्रा. डॉ. सुधीर अग्रवाल,
वर्धा
९५६१५९४३०६

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

# बँकांनी पिककर्ज वाटप वाढविण्यासाठी विशेष प्रयत्न करावे : जिल्हाधिकारी



जनमाध्यम प्रतिनिधी

यवतमाळ : प्रत्येक पात्र शेतकऱ्यांना पिककर्ज उपलब्ध होणे आवश्यक आहे. एकही शेतकरी यापासून वंचित राहू नये. त्यामुळे बँकांनी आपल्या कर्ज वाटपाची गती वाढवावी. ज्या बँकांचे वाटप कमी आहे, त्यांनी विशेष प्रयत्न करावे, अशा सूचना जिल्हाधिकारी विकास मीना यांनी केल्या.

महसूल भवन येथे जिल्हाधिकाऱ्यांनी सर्व बँकांकडून पिककर्ज वाटपाचा आढावा घेतला. त्यावेळी ते बोलत होते. यावेळी जिल्हा अग्रणी प्रबंधक ज्ञानेश्वर टापरे, सहकारी संस्थेचे जिल्हा उपनिबंधक नानासाहेब चव्हाण, नाबार्डचे जिल्हा विकास अधिकारी अतुल इंगळे तसेच सर्व बँकांचे जिल्हास्तरीय समन्वयक उपस्थित होते. जिल्हाधिकाऱ्यांनी यावेळी बँक निहाय पिककर्ज वाटपाचा आढावा घेतला. काही बँका वाटपात मागे असल्याने त्यांना विशेष प्रयत्नाने कर्ज वाटप वाढविण्याच्या सूचना केल्या. शाखा स्तरावर बँकांनी प्रयत्न करावे. एकही पात्र शेतकरी कर्जापासून वंचित राहू नये. कर्ज वाटपाबाबत शेतकऱ्यांच्या असलेल्या तक्रारींचे तातडीने निराकरण केले जावे, असे जिल्हाधिकाऱ्यांनी सांगितले.

शेतकरी किंवा विविध योजनांच्या लाभार्थ्यांच्या खात्यात अनुदानाची रक्कम जमा होते. ही रक्कम बँका परस्पर कपात करतात. ही रक्कम कपात न करता लाभार्थ्यांना परत देण्यात यावी. याबाबत शेतकरी, लाभार्थ्यांच्या तक्रारी येता कामा नये, असे जिल्हाधिकारी म्हणाले.

एकमुस्त रक्कम भरणाऱ्यांना तातडीने कर्ज द्या : बरेच शेतकरी आपल्याकडील थकित कर्जाची रक्कम एकमुस्त भरून कर्ज खाते निल करतात. अशा शेतकऱ्यांना काही बँका नव्याने पिककर्ज देण्यास टाळाटाळ करीत असल्याच्या तक्रारी येतात. ज्यांनी पुर्णपणे कर्जाचा भरणा केला आहे, अशा शेतकऱ्यांना तातडीने नव्याने पिककर्ज बँकांनी दिले पाहिजे.

९८ हजार शेतकऱ्यांना १ हजार १८ कोटीचे वाटप : जिल्ह्यात आतापर्यंत सर्व बँकांनी मिळून एकून 98 हजार शेतकऱ्यांना 1 हजार 18 कोटी रुपयांचे पिककर्ज वाटप करण्यात आले आहे. सर्वाधिक जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकने 50 हजार शेतकऱ्यांना 447 कोटीचे वाटप केले आहे. त्यानंतर स्टेट बँक ऑफ इंडियाने 12 हजार शेतकऱ्यांना 131 कोटी, विदर्भ कोकण ग्रामीण बँकेने 8 हजार 700 शेतकऱ्यांना 119 कोटी, सेंट्रल बँक ऑफ इंडियाने 8 हजार 700 शेतकऱ्यांना 72 कोटीचे वाटप केले आहे. ज्या बँकांनी चांगले वाटप केले त्यांना अभिनंदनाचे तर ज्यांचे वाटप कमी आहे, त्याने गती वाढविण्याच्या सक्त सूचना देणारे पत्र देण्याचे निर्देश जिल्हाधिकाऱ्यांनी दिले.

# दारव्हा पोलीस ठाण्यात शिवसेना महिला आघाडीची धडक, अयोध्या पौळ प्रकरण



जनमाध्यम प्रतिनिधी

दारव्हा : मृद व जलसंधारण मंत्री तथा यवतमाळ जिल्ह्याचे पालकमंत्री संजय राठोड यांच्या बद्दल एका महिलेने ऑडिओ क्लिप व्हायरल केल्याने शिवसेना पदाधिकाऱ्यांच्या भावना दुखावल्या; त्यामुळे संबंधित महिलेवर तात्काळ गंभीर स्वरूपाचे गुन्हे दाखल करून कारवाई करण्यात यावी या मागणीसाठीआज शिवसेना महिला आघाडीच्या वतीने दारव्हा पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली.

शिवसेना उद्धव ठाकरे गटाच्या कार्यकर्ते अयोध्या पोळ यांनी एका कार्यकर्त्यासोबत फोनवर बोलताना मृद व जलसंधारण मंत्री संजय राठोड यांच्या विरोधात एक ऑडिओ क्लिप केली आहे. या व्हायरल क्लिपमुळे मंत्री राठोड यांचा अपमान होत आहे. त्यामुळे संबंधित महिलेच्या अशा वक्तव्यमुळे शिवसैनिकांच्या भावना दुखावल्या असून कायदा व सुव्यवस्थेचे प्रश्न निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही. हा प्रकार थांबविण्याकरिता अयोध्या पोळ यांच्यावर गंभीर स्वरूपाचे गुन्हे दाखल करून कारवाई करण्यात यावी अशी मागणी यावेळी दारव्हा पोलीस स्टेशनच्या पोलिस निरीक्षकाकडे निवेदनातून केली आहे. यावेळी महिलाआघाडी तालुकाप्रमुख पुष्पा ससाने, महिला आघाडी शहर प्रमुख आशाताई डोंगरे, सुरेखा राठोड, मंगला निंबेकर, रुजाता राऊत, चंद्रप्रिया चव्हाण, शितल राठोड, शोभाताई राठोड, अश्विनी कुरसिंगे, जया लाभसेटवार, वैशाली खाटीक, जयश्री दुधे, दीपा सिंगी, शांता जाधव, पुष्पा बेलपत्रे, मीराबाई टेकाम, जिल्हाप्रमुख यशवंत पवार, तालुका प्रमुख मनोज सिंगी, शहर प्रमुख राजू दुधे, गणेश दुधे, बिनोद वांडरस्वार, प्रकाश दुधे, मुकुंद चिरडे, रोहिदास पवार, दीपक जाधव, विवेक जाधव, योगेश गवळी, विनोद आडे, धिरज मनवर व इतर शिवसैनिक उपस्थित होते.

# घाटंजी नगर परिषदेमधील भ्रष्टाचाराविरोधात यवतमाळमध्ये मुंडण आंदोलन

## आठ दिवसांत कारवाई न झाल्यास तीव्र संघर्षाचा इशारा



जनमाध्यम प्रतिनिधी

यवतमाळ : घाटंजी नगर परिषदेमधील वाढत्या भ्रष्टाचाराचा निषेध करण्यासाठी आज शेकडो नागरिकांनी यवतमाळ जिल्हाधिकारी कार्यालयासमोर धडक देत मुंडण आंदोलन केले. विविध विकासकामांतील गंभीर भ्रष्टाचार, नियमबाह्य निविदा प्रक्रिया, दर्जाहीन बांधकामे आणि आर्थिक अपहार याविरोधात आंदोलकांनी आवाज उठवला. घाटंजी शहरातील कार्यकर्ते, सामाजिक संघटना आणि नागरिक मोठ्या संख्येने यवतमाळ येथे एकत्रित झाले होते. आंदोलनादरम्यान निषेध नोंदवत अनेकांनी केस कापून संताप व्यक्त केला. नंतर आंदोलकांनी पत्रकार परिषद घेत संपूर्ण प्रकरण उघडकीस आणले.

यावेळी निखील राजेंद्र देठे यांनी पत्रकार परिषदेत मुख्याधिकारी राजू घोडके यांच्यावर गंभीर आरोप करीत घोडके हे पूर्वी घाटंजी नगर परिषदेत अभियंता पदावर कार्यरत असताना ठराविक ठेकेदारांना कामांचे ठेके दिले जात होते. मुख्याधिकारी म्हणून परतल्यानंतर पुन्हा त्याच ठेकेदारांना कामे देण्यात येत असून ते घाटांजी शहराचे जावई असल्याचा आरोप करण्यात आला आहे. निविदा प्रक्रियेतील अपारदर्शकता असून ७३ पैकी केवळ ११ निविदा ऑनलाईन करण्यात आल्या असून उर्वरित निविदा ऑफलाइन पद्धतीने मंजूर झाल्या आहेत. सर्व निविदा १% पेक्षा कमी दराने मंजूर होतात, जे अत्यंत संशयास्पद आहे. अलीकडे बसवलेले सोलर पोल पहिल्याच पावसात कोसळले असून त्या बांधकामातील फाउंडेशनमध्ये दगड टाकल्याचे पुरावे समोर आले आहेत. तसेच अर्धवट मोजमाप करून चुकीच्या पद्धतीने बिलं काढली गेली असल्याची माहिती दिली. पाणीपुरवठा, आरोग्य आणि विद्युत विभागांच्या करारनाम्यांवर नगर परिषद अधिकाऱ्यांनी अनधिकृत सह्या घेतली असून, दस्तऐवजांमध्ये तारखा फेरफार केल्याचे उघड झाले आहे. २४ डिसेंबर २०२४ रोजी स्टॅम्प घेण्यात आला असताना करारनाम्यावर १३ डिसेंबर २०२४ तारीख दाखवली आहे. बांधकाम विभागातील वर्क ऑर्डरमध्ये दर नमूद आहेत, मात्र इतर विभागातील आदेशांमध्ये कामाची किंमत व दर मुद्दामहून लपवण्यात आले आहेत. रस्ते व गटारी घोटाळा झाला असून गरज नसलेल्या, निर्जन भागात रस्ते व गटारी बनवण्यात आल्या असून जिथे लोकवस्तीच नाही तिथे ही कामं करण्यात आली असल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. या आंदोलनामुळे घाटंजी व यवतमाळ परिसरात मोठी खळबळ उडाली आहे. आंदोलनकर्त्यांनी न्याय मिळेपर्यंत संघर्ष सुरूच राहील, असा निर्धार व्यक्त केला. आंदोलकांनी जिल्हाधिकारी यवतमाळ यांच्याकडे संपूर्ण पुरावे, करारनामे, वर्क ऑर्डर, फोटो व दस्तऐवजांसह सविस्तर निवेदन सादर केले आहे. जिल्हाधिकारी यांनी प्रकरणाची गंभीर दखल घेत उच्चस्तरीय चौकशीचे आश्वासन दिले. मात्र आठ दिवसांत कारवाई न झाल्यास तीव्र आंदोलनाचा इशारा आंदोलकांनी दिला आहे. "आठ दिवसांच्या आत दोषींवर कारवाई झाली नाही, तर पुढील टप्प्यात मुख्याधिकाऱ्यांच्या फोटोला काळं फासून घाटंजीत निषेध रॅली काढण्यात येईल."

# जि.प. मालकीच्या आठवडी बाजाराचा हर्रास कसा केला

## बाभुळगावच्या न.प. मुख्याधिकारी यांना खुलासा पत्र

जनमाध्यम प्रतिनिधी

बाभुळगाव : येथील आठवडी बाजार हा जिल्हा परिषद यवतमाळ यांच्या मालकीचा असताना कोणत्या अधिकाऱ्याने जिल्हा परिषद जागेचा लिलाव केला व बाजाराची हर्रासाची मिळालेली रक्कम ही नगरपंचायतने का ठेवली याबाबत उपमुख्य कार्यकारी अधिकारी पंचायत पंकज भोयर यांनी बाभुळगाव येथील न.प.मुख्याधिकारी यांना तीन दिवसात खुलासा पत्र सादर करण्याचे पत्र दिल्याने गावात चर्चेचा विषय झाला आहे.

धरमचंद छल्लाणी यांनी बाभुळगाव आठवडीबाजार लिलाव प्रकरणी माहितीचा अधिकार 2005 अंतर्गत माहिती न.प. ला मागितली होती. मात्र नगर पंचायतकडून प्रतिसाद न मिळाल्याने त्यांनी मुदतीनंतर राज्य माहिती आयुक्त खंडपीठ अमरावती यांच्याकडे द्वितीय अपील दाखल केली. राज्य माहिती आयुक्तांनी त्याबाबत आदेश पारीत केला. मात्र बाभुळगावच्या मुख्याधिकारी डॉ. सोटे यांनी माहिती दिली नाही. त्यामुळे अर्जदारांनी पुन्हा राज्य माहिती आयुक्तांकडे दाद मागितल्यानंतर नव्याने माहिती देण्यासाठी आदेश पारित केला. तरी देखील मुख्याधिकाऱ्यांनी माहिती दिली नाही. आजपर्यंत आठवडी बाजाराचा केलेला लिलाव नियमबाह्य असल्याचे या घटनांवरून दिसून येत आहे. माहिती दिल्यास हा प्रकार उजेडात येऊ शकतो, या भीतीपोटी मुख्याधिकाऱ्यांनी माहिती देण्यास टाळाटाळ केल्याचा आरोपही त्यांनी केला. जिल्हा परिषद यवतमाळ यांच्या मालकीच्या आठवडी बाजाराच्या जागेवर नगर पंचायत बाभुळगांव यांनी डल्ला मारून बाजाराचा हर्रास करून शासनाच्या पैशाची लूट केली. सदर प्रकाराची सखोल चौकशी करण्यात यावी व माहिती अभावे माहिती न देणा-या मुख्याधिकारी यांचेवर कठोर कार्यवाही करण्यात यावी अशी तक्रार धरमचंद छल्लाणी केली होती.

# पुसदमध्ये आषाढी एकादशीनिमित्य ज्ञानेश्वर संस्थानतर्फे विठुरायाच्या स्वागताची जय्यत तयारी



जनमाध्यम प्रतिनिधी

पुसद - श्री ज्ञानेश्वर संस्थान समिती पुसदचे अध्यक्ष विपिन चिद्दरवार यांनी आषाढी एकादशी निमित्त विठुरायाच्या भव्य स्वागताच्या सोहळ्याच्या नियोजन बाबत पत्रकार परिषदेमध्ये विविध कार्यक्रमाबाबत माहिती दिली पुसद नगरीत विठुरायाच्या स्वागत सोहळ्यामध्ये १४०० सेवाधारी सज्ज राहणार आहेत. तसेच पोलीस प्रशासन, नगरपालिका, विद्युत महामंडळ यांचे मोलाचे सहकार्य मिळणार आहे. तसेच साबुदाणा उपवासाची उसळ राजगिऱ्याचे लड्डू सुद्धा भाविकांना प्रसाद म्हणून देण्यात येणार आहे तसेच सर्वत्र सीसीटीव्ही कॅमेरे लावण्यात येणार आहे तरी आषाढी एकादशी विठुरायाचे दर्शन सर्व भाविक भक्तांनी घ्यावे असे समितीच्या वतीने आव्हान केले आहे.

याबरोबरच संस्थानाद्वारे धार्मिक कार्यासोबतच सामाजिक कार्याची जोड देण्याचा प्रयत्न करण्यात येत असतो, या अनुषंगाने ह्या मोठ्या धार्मिक सोहळ्यामध्ये मंदिर व भोवतालच्या परिसरामध्ये सामाजिक विविध उपक्रमाचे जसे रक्तदान आणि झाडे लावा झाडे जगवा स्वच्छ भारतअभियान, स्त्रीभ्रूणहत्या, बेटी बचाव बेटी पढाओ, नशा दोन रहा निरोग, पाणी अडवा पाणी जिरवा इत्यादी बाबतचे सामाजिक जनजागरण व्हावे यासाठी बॅनर लावण्यात येत आहे. यासोबतच रक्तदान व देहदानाच्या मोहिमेला चालना देण्यासाठी आषाढी एकादशीच्या दिवशी रक्तदान व देहदान करणाऱ्या दात्यांना विठुरायाच्या थेट दर्शनाची सोय करण्यात आली आहे. रक्तदान शिबिराचे आयोजन मेडिकेअर ब्लड बँक तर्फे करण्यात येणार आहे. तसेच लॉयन्स क्लब च्या वतीने देहदानाचे संकल्प पत्र भरून देण्यासाठी स्टॉल लावण्यात येणार आहे. देहदान करणाऱ्या दात्यांनी आपल्या सोबत कुटुंबातील कमीत कमी दोन व्यक्तींना संमतीसाठी सोबत आणावे व दात्याचे आधार कार्ड झेरॉक्स प्रत आणि दोन रंगीत पासपोर्ट फोटो आणणे आवश्यक आहे.या देहदानाच्या शिबिरात नाव नोंदणी करणाऱ्या दात्यांसोबत कुटुंबातील दोन व्यक्तींना थेट दर्शनाची सोय उपलब्ध करून देण्यात येणार आहे. दिव्यांग भाविकांना व्हीलचेअरवर बसून तसेच वयोवृद्ध भाविकांना विठुरायाच्या थेट दर्शनाची व्यवस्था करण्यासाठी सकाळी ८ ते १२ आणि सायंकाळी ६ ते ९ यावेळी मध्ये ठेवण्यात आली आहे.

### वाहन व पार्किंगची व्यवस्था

या सोहळ्याच्या निमित्ताने बस स्टॅन्ड ते गुजरी चौक ते बस स्टॅन्ड भाविकांना मोफत ने आन करण्याची व्यवस्था करण्यात आली, चार चाकी वाहनांची पार्किंग व्यवस्था जुना सरकारी दवाखाना परिसर. तसेच दोन चाकी वाहनांची पार्किंग व्यवस्था, संतोषी माता मंदिर समोर, बालाजी मंदिर परिसर तसेच कमलशेठ यांच्या गोदामा सभोवतालचा परिसर, मेढ्या मारुती भोवतालचा परिसर आणि मारुती कन्या शाळेचे पटांगण, गोल्ड प्लाझा मार्केटचे (जुनी सुभाष टॉकिज) खालील वाहनतळ या ठिकाणी करण्यात आली आहे.

### निशुल्क आरोग्य तपासणी

बी पी, शुगर चेकअप कॅम्प, विशेष अग्नी कर्म, विद्धकर्म, आयुर्वेद चिकित्साचे मोफत भव्य आरोग्य शिबिराचे आयोजन आषाढी एकादशीचे दिवशी बालाजी ट्रेडर्स गुजरी चौक येथे करण्यात येणार आहे. यासाठी डॉ. चंद्रकुमार देशमुख पुणे यांचे मार्गदर्शनातील डॉक्टरांच्या माध्यमाने उपचार करण्यात येणार आहे.यामध्ये भाविकांना खालील विकारावर लाभ मिळणार आहे.सर्व प्रकारचे वातविकार, गुडघे कंबर, डोके, मान दुखी, संधिवात, पित्त त्वचेचे विकार या संबंधी मोफत तपासणी आणि उपचार व औषधी देण्यात येणार आहे.

## वेचक

### भांबोरा येथे पुराच्या पाण्यात म्हैस वाहून गेल्याने शेतकऱ्यांचे मोठे नुकसान



घाटंजी : मागील अनेक दिवसापासून तालुक्यात सततधार पाऊस सुरु असून त्या पावसामुळे तालुक्यातील शेतकऱ्यांच्या शेतीची कामे खोळंबली आहे. परंतु काल घाटंजी तालुक्यातील भांबोरा येथे ढगफुटी सदृश्य पाऊस झाल्याने नाल्याला मोठा पूर आला या पुरामध्ये दत्ताजी महादेव खोपाडे आपले जनावर, चराई करीता नेले असता म्हैस पुराच्या पाण्यात वाहून गेली. पूर ओसरल्यानंतर गावातील नागरिकांच्या मदतीने म्हैसची शोधाशोध सुरु केली असता परिसरातील नाल्याच्या पुला खालील बंधामध्ये म्हैस मृतअवस्तेत अडकून असल्याचे निदर्शनास आले. त्याच वेळी गावकऱ्यांच्या मदतीने मृतअवस्तेत पडलेल्या म्हशीला बाहेर काढण्यात आले त्यामुळे अशा निसर्गाच्या लहरीपणामुळे दुधाळ जनावर दगावल्याने शेतकऱ्यांची मोठ्या प्रमाणात आर्थिक नुकसान झाले आहे.त्या शेतकऱ्याला नुकसान भरपाई देण्यात यावी अशी मागणी सहदेव राठोड माजी पंचायत समिती सदस्य घाटंजी यांनी केली आहे.

### सहयोग मल्टीस्टेट क्रेडिट को-ऑप सोसायटी लि. शाखा महागावतर्फे शैक्षणीक साहित्य वाटप



महागाव - सहयोग मल्टीस्टेट क्रेडिट को-ऑप सोसायटी लि. गोंदिया शाखा महागाव सहयोगच्या उडान ग्रुप मार्फत जिल्हा परिषद प्राथमिक मराठी शाळा इंदिरा नगर महागाव येथे सर्व गरजू विद्यार्थी यांना स्कुल बॅग चा वाटप करण्यात आला. महागाव शाखेचे ABM श्री मनोज सुकळकर शाखेचे कर्मचारी व उत्कृष्ट ग्राहक जयश्रीताई नरवाडे, रेखा राठोड, सौ शीतलताई कावळे, शिक्षिका शारदा दामधर, संजय नरवाडे, सुनील कोळपे, राजू राठोड, चित्तरंज सिनकर यांच्या प्रमुख उपस्तीथी मध्ये हा सामाजिक उपक्रम राबवण्यात आला सर्व गरजू विद्यार्थी यांना शिक्षणात कोणतीही कमतरता भासू नये व त्यांची शिक्षणाची आर्थिक बाजू बळकट करण्यासाठी हा उपक्रम घेण्यात आला.


### तीन सराईत गुन्हेगार यवतमाळ जिल्ह्यातून हद्दपार

यवतमाळ - शहरातील गुन्हेगारी प्रवृत्तीवर नियंत्रण ठेवण्यासाठी यवतमाळ पोलीस विभागाने मोठी कारवाई केली असून तीन सराईत गुन्हेगारांना यवतमाळ जिल्ह्यातून हद्दपार करण्यात आले आहे. पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, शहर पोलीस स्टेशन हद्दीतील इसम प्रज्वल उर्फ चिक्या किशोर मेश्राम (वय २०, रा. आकृती पार्क, पिंपळगाव), सिध्दार्थ उर्फ बिट्टू संजय वानखडे (वय २३, रा. बांगरनगर), आणि करण राजेंद्र तिहीले (वय २५, रा. पाटीपुरा) हे तिघेही शरीराविरुद्धचे गंभीर गुन्हे करणारे सक्रिय गुन्हेगार आहेत. सदर तिघांविरुद्ध वारंवार गुन्ह्यांची नोंद असून यवतमाळ शहरातील नागरिकांच्या सुरक्षिततेच्या दृष्टिकोनातून त्यांना हद्दपार करण्यासाठी पोलीस निरीक्षक रामकृष्ण जाधव यांनी प्रस्ताव उपविभागीय दंडाधिकारी यांच्याकडे सादर केला होता. चौकशीनंतर उपविभागीय दंडाधिकारी यांनी तिघांनाही यवतमाळ जिल्ह्यातून पुढील एक वर्षासाठी हद्दपार करण्याचे आदेश दिले.

### विविध परीक्षांतील गुणवंतांचा व भाजपचे नवनिर्वाचित जिल्हाध्यक्ष ॲड प्रफुल चव्हाण यांचा शनिवारी सत्कार

वणी : या उन्हाळी सत्रात दहावी आणि बारावीतील विद्यार्थ्यांनी आपल्या गुणवत्तेची चमक दाखवली. त्यातील गुणवंतांचा सत्कार तसेच भाजपचे नवनिर्वाचित जिल्हाध्यक्ष ॲड प्रफुल चव्हाण यांचा सुद्धा सत्कार समारंभ भारतीय जनता पार्टीचे जिल्हा उपाध्यक्ष ॲड कुणाल विजय चोरडिया यांच्या वतीने आयोजित केला आहे. शनिवार दिनांक 5 जुलै रोजी दुपारी 4.00 वाजता मुकुटबन रोडवरील श्री विनायक मंगल कार्यालयात हा सोहळा होईल. या कार्यक्रमाला राष्ट्रीय मागासवर्ग आयोगाचे अध्यक्ष हंसराज अहिर, यवतमाळ जिल्ह्याचे नवनिर्वाचित अध्यक्ष प्रफुल्ल चव्हाण, भारतीय जनता पार्टीचे यवतमाळ व पुसदचे समन्वयक नितीन भुतडा आणि संघटन सरचिटणीस राजू पडगीलवार तसेच राज्य कार्यकारिणी सदस्य विजय चोरडिया प्रामुख्याने उपस्थित राहतील. शैक्षणिक गुणवत्तेस प्रोत्साहन देणारा हा प्रेरणादायी उपक्रम असल्याचे आयोजक तथा भारतीय जनता पार्टीचे यवतमाळ जिल्हा उपाध्यक्ष एडवोकेट कुणाल चोरडिया यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे कळविले आहे.

# पुरग्रस्त नाल्या शेजारी असलेले रोहित्र तात्काळ हटवा डूब्बेवार लेआऊट मधील नागरिकांची मागणी



जनमाध्यम प्रतिनिधी

पुसद - दरवर्षी पावसाळ्यात शहरातील डूब्बेवार ले आऊट शेजारून वाहणाऱ्या नाल्याला पूर येत असतो. नाल्या च्या पूर प्रवण भागात विज वितरण कंपनीचे रोहित्र (डीपी) बसविले आहे. अत्यंत धोकादायक ठरू शकणाऱ्या या रोहित्राची जागा बदलण्याची मागणी लेखी तक्रारी द्वारे मागील वर्षी या परिसरातील नागरिकांनी विज वितरण विभाग कार्यालयात केली होती. मात्र अद्याप यावर कोणतीही कार्यवाही झाली नाही.

त्यामुळे पावसाळ्यात पुराचा रोहित्राला धोका कायम आहे. नागरिकांनी कार्यकारी अभियंता, शाखा अभियंता, पुसद शहर यांच्याकडे वारंवार वरील प्रकरणी तक्रार करूनही तक्रारींकडे दुर्लक्ष केल्या गेल्याचा नागरिकांचा आरोप आहे. सदर (रोहित्र क्र. डिटीजी ४३२१०४८) हे वाहत्या नाल्याच्या कडेला असल्यामुळे पुराचे पाणी रोहित्राच्या डिस्ट्रिब्युशन बॉक्स पर्यंत येत असते. प्रत्येक पावसाळ्यामध्ये उद्भवणाऱ्या गंभीर प्रसंगाचे छायाचित्र तक्रारी सोबत जोडून देण्यात आले. अनेकदा नाल्यातील पुराच्या पाण्यामध्ये लिकेज करंट मुळे साप, मासे मृत अवस्थेत येत आहे. तसेच विद्युत पुरवठा बिघाड आल्यानंतर जन्मित्रास जीव धोक्यात घालून कंबरेपर्यंत पाण्यामध्ये जाऊन विद्युत बिघाड दुरुस्त करण्याची वेळ येते. त्यामुळे नाल्याच्या काठाला असलेली डी. पी. ची जागा ५० ते ६० फुटावर डांबरी रोड समाप्त होतो त्या ठिकाणी रिकाम्या जागेत स्थानांतर केल्यास सुरक्षित राहील. वरिल कामं पूर्ण होण्यासाठी वेळोवेळी स्थानिक उपविभागीय अभियंता, शाखा अभियंत्यास प्रत्यक्ष भेट, दूरध्वनी, व्हाट्सअप मेसेजवरून संपर्क साधला असुन आजपर्यंत त्यावर कोणतीही कार्यवाही झालेली नाही. त्यामुळे एखादा मोठा अपघात झाल्यानंतर कार्यवाही होईल का? असा प्रश्न उपस्थित होत आहे.

# भांबोरा येथे गरजू विद्यार्थ्यांना मोफत पाठ्यपुस्तकाचे वाटप गावातील कर्मचारी वर्गाचा स्तुत्य उपक्रम



जनमाध्यम प्रतिनिधी

घाटंजी - तालुक्यातील भांबोरा सारखेगाव येथिल विद्यार्थ्यांचे आपण काही देणे लागतो. येथिल विद्यार्थ्यांमध्ये वाचन संस्कृतीचे प्रसार व्हावे, त्यांना वाचनाची सवय जडावी, परिस्थितीने तो खचून जाऊ नये, तो स्पर्धेत टिकून उंच भरारी घेत आपल्या पावलावर पाऊल टाकून गावाचे नाव झळकवावे अश्या एक नव्हे अनेक उदात्त हेतूने येथिल कर्मचारी ग्रुप एकत्र येऊन इयत्ता ९ वी व दहावीच्या ५१ विद्यार्थ्यांना पाठ्यपुस्तकाचा संच व शालेय साहित्याचे वाटप नुकतेच एका कार्यक्रमाचे आयोजन करून स्तुत्य उपक्रम राबवून करण्यात आले.

भांबोरा गावातील गावासह बाहेर जाऊन कार्य करणारे कर्मचारी वर्ग गेली पाच वर्षांपासून अविरत परिश्रम घेऊन शैक्षणिक सत्र सुरु होताच सर्व एकत्र येऊन या स्तुत्य उपक्रमाचे आयोजन करीत असतात. गावात गरजवंत विद्यार्थ्यांचा शोध घेऊन पाठ्यपुस्तकं, शालेय साहित्याचे वाटप करण्याचा वसा अंगीकारला आहे. एवढेच नव्हे तर गरजवंत विद्यार्थ्यांची जातीने लक्ष घालून शैक्षणिक क्षेत्रात येणाऱ्या अडचणी जाणून घेतल्या जाते. असाच एका सोहळ्याचे आयोजन करून पाठ्यपुस्तकासह रजिस्टर, कंपास पेटी, पेन असे साहित्याचे वाटप करण्यात आले. या सोहळ्याच्या अध्यक्षस्थानी प्रा. प्रेम राठोड सर हे होते तर प्रमुख पाहुणे म्हणून विलास राठोड, अरुण जाधव, मनोज चव्हाण, बबुलाल राठोड, पत्रकार विठ्ठल राठोड, यांची विशेष उपस्थिती होती.

# यवतमाळ जिल्हा वृत्तपत्र विक्रेता संस्थांतर्फे रेनकोट वाटप



जनमाध्यम प्रतिनिधी

यवतमाळ : आज ४ जूलैला स्व. वसंतराव नाईक शेतकरी स्वावलंबन मीशनच्या वाहनतळ येथे वृत्तपत्र विक्रेता बांधवाना मोफत रेनकोट वाटप करण्यात आले आहे. संस्था नेहमी सामाजिक बांधिलकी समजून प्रवास करत आहे.

वृत्तपत्र विक्रेता हा पावसाचे सुद्धा तमा न बाळगता वाचकांना सतत सेवा देत आहे. आपल्या संघटनेच्या सदस्यांना संघटनेतर्फे रेनकोट वाटप करण्यात आले.याकरिता सर्व वृत्तपत्र विक्रेता बांधव उपस्थित होते. यावेळी संस्थेचे अध्यक्ष अशोक शिंदे, सचिव किरण कोरडे, उपाध्यक्ष राजु हनवते, राजु भलावी, कोषाध्यक्ष श्रीराम खत्री, सहसचिव तुषार गुजलवार, प्रसिद्धि प्रमुख सचिन कदम, सल्लागार मदनभाऊ केळापुरे, सदस्य सुनिल बोरकर, प्रविण आगलावे, रविंद्र चव्हाण तसेच महाराष्ट्र राज्य संघटनेचे उपाध्यक्ष संतोष शिरभाते, सदस्य किशोर भेंडरकर आणि असंख्य विक्रेता बांधव या सर्वांनी कार्यक्रम यशस्वी करण्याकरता हातभार लागला.

# साहेब आमच काम कधी होईल हो... कित्तेक लाभार्थी लाभाच्या प्रतीक्षेत



जनमाध्यम प्रतिनिधी

आर्णी - ग्रामीण भागातील नागरिकांचे जीवन समृद्ध व सोयीचे व्हावे यासाठी विविध योजनांची माहिती प्रामुख्याने गरजू, पात्र, ग्रामीण भागातील नागरिकांना देणे व राबवणे असे अनेक विषय शासन पंचायत समितीकडे देतात परंतु आर्णी पंचायत समितीत त्याच पात्र लाभार्थ्यांना योजनेसाठी अर्ज केल्यास मिळते ती फक्त प्रतीक्षा.वर्षोव्यावर दिवस होऊनसुद्धा काहींची कागदपत्रे कार्यालयांच्या कोपऱ्यात धूळ खात आहे.शासनाच्या योजनांची अंमलबजावणीफक्त कागदावरच पाहायला मिळते.अर्जदाराने जाब विचारला तर उडवाउडवीची उत्तरेही नवीन नाही आणि गटविकासअधिकारी अधिकारी यांना भेटायचे म्हटल तर तिथेही प्रतिक्षाच रोजचे परिसरात फिरते असलेले व लर्गेबाचे असलेले भेटून आले. तेव्हा ग्रामिण भागातील लाभार्थ्यांच्या नंबर लागतो त्यातही कोणत्या ना कोणत्या कारणाने भेट अपूर्ण राहते. नेमकी आर्णी पंचायत समिती हक्काने न्याय मांगण्यासाठी उरली की नाही असा प्रथम प्रश्न पडतो कमी शिक्षित किंवा अशिक्षित असलेल्या भोळ्या भाबड्याना दलालीची भूमिका घेणाऱ्यांना वाव दिल्याशिवाय मग पर्याय नाही नेमक तेच आर्णी पंचायत समितीला हवं आहे का असा प्रश्न उपस्थित होतो गावातील राजकारणात होरपळलेल्या जनतेला पात्र लाभार्थी असूनही वंचित राहण्याची वेळ आणून पडली तर त्यांना न्याय देणार कोण चिरीमिरी शिवाय कामालाही हात लावण्याची मानसिकता नसलेल्या कार्यालयाच्या उंबरठ्यावर न्याय मागावा तरी कोणाला असा प्रश्न सामान्यांना पडतो आहे.जिल्यातील वरीष्ठ अधिकाऱ्यांनी लक्ष घालावे असा आशावाद केला जात आहे.

# घाटंजीमध्ये 'जिव्हाळ्याची भिंत' - ९ वर्षांपासून अविरत सेवा, उपाशी कुणीही नाही!



जनमाध्यम प्रतिनिधी

घाटंजी - 'घाटंजी शहरात एकही निराधार, वयोवृद्ध, मनोरुग्ण किंवा गरजू व्यक्ती उपाशी झोपायला नको," या उदात्त संकल्पाने सुरू झालेल्या 'जिव्हाळ्याची भिंत चॅरिटेबल ट्रस्ट' ने ५ जुलै रोजी आपल्या अविरत सेवेची ९ वर्षे पूर्ण केली आहेत. घाटंजी शहरातील विलासजी पवार यांच्या अध्यक्षतेखाली आणि सूरज हेमके यांच्या सचिव पदाखाली, ही संस्था गेल्या ९ वर्षांपासून समाजातील गरजू घटकांना आधार देत आहे.

५ जुलै २०१६ पासून सुरू झालेली ही अन्नदानाची सेवा दररोज न चुकता सुरू आहे. ऊन असो, वारा असो किंवा कोणतीही परिस्थिती असो, ट्रस्टचे स्वयंसेवक मनोरुग्ण, गरजू आणि निराधारांच्या ठिकाणी जाऊन त्यांना अन्नदान करतात. या 'अन्नदान छत्रामुळे' दररोज सुमारे ६० लोकांना आधार मिळत आहे.

केवळ अन्नच नाही, तर मायेची साथ! 'जिव्हाळ्याची भिंत' ट्रस्ट केवळ अन्नदानातच सीमित नाही, तर ते गरजूंना अनेक प्रकारे मदत करतात: वस्त्रदान: वर्षातून तीन वेळा नवीन कपड्यांचे वाटप केले जाते. थंडीपासून बचाव: थंडीच्या दिवसांत ब्लँकेटचे वाटप केले जाते.

# शिक्षकांच्या प्रलंबित प्रश्नी आयुक्तांच्या दालनात खल

## तत्काळ समस्या मार्गी लावण्याचे आदेश

**अमरावती/का.प्र.**

प्रहार शिक्षक संघटनेच्या वतीने अमरावती विभागातील पाचही जिल्ह्यातील शिक्षकांच्या प्रलंबित समस्यांबाबत विभागीय आयुक्तांच्या दालनात खल करण्यात आला.शिक्षकांच्या प्रलंबित समस्या तत्काळ मार्गी लावण्याचे आदेश याप्रसंगी विभागीय आयुक्त श्वेता सिंघल यांनी सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी यांना दिले.तसेच याबाबत संघटनेच्या स्वतंत्र बैठका घेण्याचे निर्देश सुद्धा अधिकाऱ्यांना देण्यात आले.

प्रहार शिक्षक संघटनेची विभागीय बैठक आयुक्तालयात आयोजित करण्यात आली होती. विभागीय आयुक्त श्वेता सिंघल यांचे अध्यक्षतेखाली शिक्षकांच्या प्रलंबित समस्यांवर चर्चा करण्यात आली.समस्या तत्काळ मार्गी लावण्याचे आदेश विभागीय आयुक्तांनी याप्रसंगी विभागातील मुख्य कार्यकारी अधिकारी यांना दिले.संघटनेचे राज्याध्यक्ष महेश ठाकरे यांनी विभागातील शिक्षकांचे प्रलंबित प्रश्न यावेळी बैठकी प्रसंगी मांडले.

यात ग्रामीण शिक्षण व्यवस्था मोडीत काढणारा व शिक्षण हक्क कायद्याची पायमल्ली करणारा संच मान्यता १५ मार्च २०२४ चा शासन निर्णय तत्काळ प्रभावाने रद्द करण्यात यावा या प्रमुख मागणीसह इतर प्रमुख मागण्यांवर चर्चा करण्यात आली.बैठकीला पाचही जिल्ह्यातील मुख्य कार्यकारी अधिकारी, शिक्षणाधिकारी , शिक्षण उपसंचालक व विभाग प्रमुख यांचेसह प्रहार शिक्षक संघटनेचे राज्य अध्यक्ष महेश ठाकरे ,विभागीय सचिव अमोल आगे ,राज्य प्रवक्ते कुलदीप डंभारे,अकोला अध्यक्ष मंगेश टिकार जिल्हा कार्याध्यक्ष अमर भागवत ,साचिव प्रमोद करणाकार ,अमरावती जिल्हाध्यक्ष शरद काळे, सचिव अमोल व-हेकर ,यवतमाळ जिल्हाध्यक्ष अमोल गोपाळ सुधीर भुस्कुटे,संदीप बरडे, बुलढाणा जिल्हाध्यक्ष महेंद्र रोठे सचिव देवीदास बडगे, वाशिम जिल्हाध्यक्ष महादेव ठाकरे आदी सह मोठ्या संख्येने पदाधिकारी व शिक्षक उपस्थित होते.



### निवडणूक विषयक नियमित चालणाऱ्या कामातून

## राज्यातील प्राथमिक शिक्षकांना मोकळे करा

### राज्य निवडणूक अधिकारी यांना निवेदन

**अमरावती/का.प्र.**

शैक्षणिक-अशैक्षणिक कामांच्या वर्गीकरणाचा शासन निर्णय २३ ऑगस्ट २०२४ मधील परिशिष्ट -२ 'अशैक्षणिक कामे' अ.क्र.२ ला अनुसरून BLO कामातून शिक्षकांना मोकळे करण्याबाबत निवेदन महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समितीचे राज्याध्यक्ष विजय कोंबे, राज्य सरचिटणीस राजन कोरगावकर यांनी मुख्य निवडणूक अधिकारी, महाराष्ट्र,मंत्री (शालेय शिक्षण), राज्यमंत्री (शालेय शिक्षण),प्रधान सचिव (शालेय शिक्षण), आयुक्त (शिक्षण), उपसचिव (शालेय शिक्षण), शिक्षण संचालक (प्राथमिक) यांनाही पाठविण्यात आले आहे.

मतदार नोंदणी व मतदार यादी पुर्नरिक्षण विषयक कामासाठी मागील कित्येक वर्षापासून सातत्याने प्राथमिक शिक्षकांना नियुक्त केले जात आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या प्राथमिक शाळांत पुरेसे शिक्षक नाहीत. ९० टक्के पेक्षा अधिक प्राथमिक शाळांत स्वतंत्र मुख्याध्यापक नसून शिक्षकालाच मुख्याध्यापक म्हणून जबाबदारी पार पाडावी लागते.एकाच शिक्षकाकडे २-३ इयत्तांच्या अध्यापनाची जबाबदारी आहे. अशातच सतत वर्षभर नियमित चालणाऱ्या मतदार नोंदणी व मतदार यादी पुनरीक्षणाच्या कामासाठी BLO म्हणून स्थानिक स्वराज्य संस्थांच्या प्राथमिक शाळांतील शिक्षकांना नियुक्त केले जात आहे.

शिक्षकांकडे अनेक प्रकारची अशैक्षणिक कामे दिल्याने दैनंदिन अध्यापन कार्यावर विपरीत परिणाम होत आहे. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गुणवत्तेवर दुष्परिणाम होत असल्याने राज्य शासनाने शासन निर्णय २३ ऑगस्ट २०२४ रोजी निर्गत केला आहे. त्यातील परिशिष्ट व अशैक्षणिक कामे -(२) प्रत्यक्ष निवडणुकीच्या वेळी आवश्यक कामाव्यतिरिक्त निवडणूक विषयक नियमित चालणारी कामे करणे, BLO चे मतदार नोंदणी आणि मतदार यादी पुनरिक्षण, ओळख पत्र तपासणी, वितरण इत्यादी कामे प्रत्यक्ष निवडणूक संबंधित नाही. त्यामुळे BLO म्हणून शिक्षकांना दिले जाणारे मतदार यादी पुनरीक्षण हे प्रत्यक्ष निवडणुकीच्या वेळेचे काम नसल्याने सदर काम अशैक्षणिक स्वरूपाचे असल्याने या कामासाठीप्राथमिक शाळांतील शिक्षकांना नियुक्ती देऊ नये हे शासन निर्णयानुसार स्पष्ट होते.तरीसुद्धा अजूनही प्राथमिक शिक्षकांची BLO म्हणून नियुक्ती रद्द झालेली नाही; उलट नव्याने पुन्हा नियुक्ती करण्यात येत आहे. याबाबत महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समितीने मुख्य निवडणूक अधिकारी यांना BLO म्हणून नियुक्ती रद्द होण्यासाठी निवेदन पाठविले आहे.प्राथमिक शिक्षक समितीने राज्याचे शिलेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे,प्रधान सचिव तथा मुख्य निवडणूक अधिकारी एस चोक्कलिंगम व उपसचिव तथा सह मुख्य निवडणूक अधिकारी मनोहर पारकर यांना केले आहे.

### पावसाळी अधिवेशनात तालिका सभाअध्यक्ष म्हणून

## आ.सुलभा खोडके यांनी सांभाळले कामकाज



**अमरावती/का.प्र.**

राज्यविधीमंडळाच्या पावसाळी अधिवेशन २०२५ ला ३० जुनपासून मुंबई येथे सुरुवात झाली आहे. पहिल्याच दिवशी विधानसभेचे अध्यक्ष ॲड. राहुल नार्वेकर यांनी विधानसभेच्या तालिका सभाअध्यक्ष म्हणून जेष्ठ विधानसभा सदस्य आ.सुलभा खोडके यांच्या नावाची घोषणा केली. अशातच आजच्या ३ जुलै २०२५ रोजीच्या कामकाजा दरम्यान विद्यमान अध्यक्षाच्या अनुपस्थितीत आ.खोडके यांनी विधानसभेचे तालिका सभाध्यक्ष म्हणून कामकाज पहिले व सभागृह यशस्वीरित्या चालविले.

महाराष्ट्र विधानसभेत नियम २९३ नुसार महत्त्वाच्या सार्वजनिक मुद्द्यांवर चर्चेचा प्रस्ताव मांडण्यात आला. यावेळी सभागृहातील सदस्यांनी शेतकरी विकासाबरोबरच सुखी, समृद्ध, प्रगत, पुरोगामी, सुधारणावादी महाराष्ट्र घडवण्यासाठीच्या विविध मुद्द्यांवर चर्चा करण्यात आली. ही चर्चा अत्यंत महत्वपूर्ण असतांना तालिका सभाध्यक्ष म्हणून विराजमान आ. सुलभा खोडके यांनी चांगल्या त-हेंने सभागृह चालविले. त्यांनी नियोजित वेळेत प्रत्येक सदस्यांना बोलण्याची संधी दिली. तसेच सत्ताधारी सदस्यांबरोबरच विरोधी बाकावर बसलेल्या आमदारांचे सुद्धा म्हणणे ऐकून घेतले.

सभागृहाचे कामकाज चालवीत असतांना तालिका सभाध्यक्ष आ.खोडके यांनी आपल्या प्रदीर्घ संसदीय कामकाजाचा परिचय देऊन अनुभव, शिस्त, संयम व सद्विवेक बुद्धीचा देखील प्रत्यय घडवून दिला. अमरावतीच्या आ.खोडके या विधानसभेत पीठासीन तालिका सभाध्यक्ष म्हणून विराजित होताच अमरावतीकरांना मोठा अभिमान वाटला.

## उर्ध्व वर्धातून खरीप सिंचनासाठी ३ पाणी पाळ्या प्रस्तावित

### शेतकऱ्यांना अर्ज करण्याचे आवाहन

**अमरावती/का.प्र.**

उर्ध्व वर्धा प्रकल्पातून खरीप हंगामासाठी पाणी साठा उपलब्ध असुन ३ पाणी पाळ्या देण्याचे प्रस्तावित आहे. यासाठी लाभ क्षेत्रातील शेतकऱ्यांनी ३१ जुलै २०२५ पर्यंत संबंधित शाखा कार्यालयास अर्ज सादर करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

उजवा मुख्य कालवा ० ते ९५.५० कि.मी. पर्यंत व डावा मुख्य कालव्याच्या ० ते ४२.४० कि.मी. पर्यंतच्या लाभक्षेत्रातील सर्व वितरीका, जलाशयावरील अधिसूचित नदी- नाल्यांवरील लाभधारकांना खरीप हंगामासाठी पाणी देण्यात येईल.

वितरण व्यवस्थेद्वारे जिथे सुलभपणे पाणी जाऊ शकते तेथपर्यंत कालवा संचलन कार्यक्रमानुसार पुच्छ भागाकडून ते मुखाकडे (टेल टू हेड) या तत्त्वानुसार सिंचन होणे आवश्यक आहे. कालव्याचे प्रवाही किंवा कालव्यावरील, नदी-नाल्यांवरील मंजुर उपसा सिंचन योजनांद्वारे सिंचनासाठी पाणी घ्यावयाचे असल्यास पाणी मागणी अर्ज नमुना क्रमांक ७ संबंधित शाखा कार्यालयात विनामुल्य उपलब्ध आहे. ते भरून दि. ३१ जुलै पर्यंत तेथे सादर करावेत, असे आवाहन उर्ध्व वर्धा पाटबंधारे विभागाचे कार्यकारी अभियंता यांनी केले आहे.

## शासकीय ज्वारी खरेदीकरिता मुदतवाढ द्या

### आ. प्रवीण तायडे यांची विधानसभेत लक्षवेधी

**अचलपूर/वार्ताहर**

विधानभवन, मुंबई येथे सुरू असलेल्या महाराष्ट्र विधानसभेच्या पावसाळी अधिवेशनात अचलपूर विधानसभा मतदारसंघातील ज्वारी उत्पादक शेतकऱ्यांच्या नोंदणीकरिता मुदतवाढ द्यावी, तसे चक्रीवादळाने शेतकऱ्यांचे प्रचंड नुकसान झाल्याच्या मुद्यावर शासनाचे लक्ष वेधण्यासाठी आ. प्रवीण तायडे यांनी लक्षवेधी सूचना मांडत तत्काळ दखल घेण्याची मागणी केली.



रबी हंगामात अचलपूर, चांदुर बाजार तालुक्यात मोठ्या प्रमाणात ज्वारी पिकाची लागवड करण्यात आली होती. ज्वारी खरेदीसाठी ऑनलाईन पोर्टलच्या माध्यमातून नोंदणी केली जात असताना अनेक शेतकरी तांत्रिक अडचणी व जागरूकतेअभावी नोंदणीपासून वंचित राहिले आहेत. त्यामुळे नोंदणीसाठीची मुदत वाढवावी, अशी मागणी लक्षवेधी मांडताना आ.प्रवीण तायडे यांनी शासनाकडे केली.तसेच अवकाळी पावसामुळे अचलपुर तालुक्यात व परिसरात केळी, कांदा व संत्रा या पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. त्यामुळे या नुकसानीचे तातडीने सरकारी पंचनामे करून नुकसान भरपाई द्यावी, अशी ठाम मागणी सभागृहात केली.

अचलपूर व चांदूर बाजार तालुक्यात ३ हजारावर शेतक-यांनी रब्बी हंगामात ज्वारी पिकाची लागवड केली होती. त्यापैकी विहीत मुदतीत फक्त १४ दिवसच नोंदणी पोर्टल सुरू होते. त्यातही काही दिवस नेटवर्क नसणे, सुट्टीचे दिवस आल्याने मोजक्याच शेतकऱ्यांची नोंदणी होऊ शकली. अनेक दिवसापासून पोर्टल पुन्हा सुरू करण्याची मागणी शेतकऱ्यांकडून होत होती. शासकीय खरेदी ही ३२०० रुपयांनी होत आहे तर व्यापारी मात्र १००० ते १२०० रुपये दराने खुल्या बाजारात ज्वारी खरेदी करीत असल्याने शेतकऱ्यांची प्रचंड लुट होत असल्याचेही आ. तायडे यांनी सभागृहाच्या निदर्शनास आणून दिले.

## संक्षिप्त

### कृषी पुरस्कारांसाठी अर्ज करण्याचे आवाहन

**अमरावती-** महाराष्ट्र शासन कृषी विभाग, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी कार्यालय, अमरावती यांच्या वतीने सन २०२४ साठी कृषी क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी केलेल्या शेतकरी आणि संस्थांना विविध पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहेत. यासाठी पात्र शेतकरी आणि संस्थांकडून विहित नमुन्यात प्रस्ताव मागविण्यात येत आहेत.

पुरस्कार आणि त्याचे स्वरूप:यामध्ये 'डॉ. पंजाबराव देशमुख कृषिरत्न पुरस्कार- ३ लक्ष रुपये,'वसंतराव नाईक कृषिभूषण पुरस्कार','जिजामाता कृषिभूषण पुरस्कार','कृषिभूषण (सेंद्रिय शेती) पुरस्कार' प्रत्येकी २ लक्ष रुपये,'वसंतराव नाईक शेतीमित्र पुरस्कार' १ लक्ष २० हजार रुपये, 'उद्यान पंडित पुरस्कार' १ लक्ष रुपये,'वसंतराव नाईक शेतीनिष्ठ पुरस्कार' (सर्वसाधारण व आदिवासी गट) ४४ हजार रुपये तसेच 'युवा शेतकरी पुरस्कार' (वयोमर्यादा कमाल ४० वर्षे) १ लक्ष २० हजार रुपये असे पुरस्कारही प्रदान केले जातील. प्रत्येक पुरस्कारात रोख रकमेसोबत स्मृतीचिन्ह, सन्मानपत्र आणि सपत्नीक सत्कार करण्यात येईल.अर्जदारांकडे स्वतःच्या नावावर शेती असणे, शेती हा कुटुंबाचा मुख्य व्यवसाय असणे, कृषी क्षेत्रात अति-उल्लेखनीय कार्य करून अधिक नफा मिळवलेला असणे या मुख्य अटी आहेत.

सेंद्रिय शेतीसाठी पीजीएस प्रमाणीकरण आवश्यक आहे. तसेच, जिल्हा पोलीस अधीक्षकांकडून सन २०२४ चा चारित्र्य पडताळणीचा दाखला आणि ७/१२, ८-अ सादर करणे बंधनकारक आहे. अर्जाची अंतिम मुदत ३१ जुलै २०२५ पर्यंत आहे. इच्छुकांनी याची नोंद घेऊन संबंधित तालुका कृषी अधिकारी कार्यालयात तीन प्रतींमध्ये अर्ज सादर करावेत. अधिक माहितीसाठी तालुका कृषी अधिकारी, उपविभागीय कृषी अधिकारी किंवा जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी, अमरावती कार्यालयाशी संपर्क साधण्याचे आवाहन जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी राहुल सातपुते यांनी केले आहे.

### इम्प्लांट रिमूव्हल शस्त्रक्रिया शिबीर

**अमरावती-** जनकल्याण सेवा संस्था संचालित डॉ. हेडगेवार हॉस्पिटल येथे ५ जुलै ते ५ ऑगस्ट या संपूर्ण महिन्यात इम्प्लांट रिमूव्हल शस्त्रक्रिया शिबीर सवलतीच्या दरात आयोजित करण्यात आले आहे. या शिबिरात अस्थिरोग तज्ञ आणि सर्जन तज्ज्ञ डॉक्टर डॉ. अभिलाष पोहोकार व डॉ. मंगेश नवले हे रुग्णांची तपासणी करून मार्गदर्शन करतील. या शिबिरात रुग्णांना अस्थिरोग शस्त्रक्रियेसाठी तज्ज्ञांचा विनामूल्य वैद्यकीय सल्ला देण्यात येईल.

जॉइंट रिप्लेसमेंट व ट्रॉमा सर्जन डॉ. अभिलाष पोहोकार दुपारी १२ ते ३ व कन्सल्टंट ऑर्थोपेडिक सर्जन डॉ. मंगेश नवले हे संध्याकाळी ६ ते ९ या वेळेत रुग्ण तपासणी करतील. ज्या रुग्णांच्या हातात अथवा पायात रॉड, प्लेट, स्क्रू, के-वायर यासारखे इम्प्लांट्स बसवले गेले असून,त्यामुळे हालचालींमध्ये अडथळा, वेदना किंवा अन्य त्रास होत असेल अशा रुग्णांसाठी हे विशेष शिबीर आयोजित करण्यात आले आहे.शिबिरात तज्ज्ञांकडून विनामूल्य वैद्यकीय सल्ला दिला जाईल. तसेच शस्त्रक्रिया अत्यंत सवलतीच्या दरात करण्यात येईल. शस्त्रक्रियेपूर्वी आवश्यक त्या तपासण्या व एक्सरे केल्या जातील. रुग्णांनी आपल्या सर्व जुने वैद्यकीय अहवाल व कागदपत्रे सोबत आणावीत.बहुसंख्य रुग्णांनी डॉ.हेडगेवार हॉस्पिटलमध्ये आयोजित (मुधोळकर पेठ बगीचा जवळ) शिबिराचा लाभ घ्यावा आणि नोंदणी करावी, असे आवाहन डॉ. हेडगेवार हॉस्पिटलने केले आहे.

### विठुरायाच्या वारकऱ्यांसाठी १०८ रुग्णवाहिकेची आरोग्यसेवा

**अमरावती-** पंढरीच्या लक्षावधी वारकऱ्यांना कोणत्याही आपत्कालीन समस्येत तत्काळ आरोग्य सेवा उपलब्ध होण्यासाठी महाराष्ट्र आपत्कालीन वैद्यकीय सेवेच्या १२० रुग्णवाहिका २४ तास वारकऱ्यांना आरोग्य सेवा देत आहेत. राज्यात भारत विकास गृपद्वारे (बीव्हीजी) १०८ रुग्णवाहिका सेवेची अमंलबजावणी केली जाते. आजतागायत ८६४३ वारकऱ्यांनी आरोग्यसेवाचा लाभ घेतला आहे.वारकरी बांधवांना तत्काळ आरोग्यसेवा मिळावी यासाठी आपत्कालीन वैद्यकीय सेवेने पंढरपुर येथे नियंत्रण कक्ष तयार केला आहे. नियंत्रण कक्षाद्वारे पालखी सोहळ्याचे बारकाईने निरिक्षण करुन तत्काळ आरोग्यसेवा देण्याकडे विशेष लक्ष केंद्रीत केले आहे.रुग्णवाहिकेद्वारे १२० डॉक्टर व १२८ ड्रायवर वारकऱ्यांना २४ तास आरोग्यसेवा अर्पण करत आहेत. मानाच्या १० पालख्यांसाकरीता आपत्कालीन वैद्यकीय सेवेच्या १२० रुग्णवाहिका तैनात करण्यात आल्या आहेत. यात ९० बेसिक लाईफ सपोर्ट व ३०ॲडव्हांस लाईफ सपोर्ट या प्रकारातल्या रुग्णवाहिका आहेत.

## माजी विद्यार्थी स्नेहमिलन सोहळ्याने शिक्षक व विद्यार्थी भारावले

### विद्यानिकेतन प्राथमिक शाळेत आयोजन



**अमरावती/का.प्र.**

श्री विद्यानिकेतन शिक्षण संस्थेद्वारा संचालित, विद्यानिकेतन प्राथमिक शाळा,रामनगर, अमरावती येथे सन १९८६ माजी विद्यार्थ्यांचा स्नेहमिलन सोहळा शाळेच्या आनंददायी व चैतन्यमयी वास्तुत, थाटात संपन्न झाला.

प्रारंभीक शिक्षण घेत असतांना बालपणी शाळेत बाई बरोबर अनुभवलेले अविस्मरणीय क्षण, निरागस मनानी मित्र-मैत्रिणींसोबत, केलेल्या मस्त्या, गप्पा गोष्टी, सोबत घालवलेले दिवस, अनुभवलेली सहल, शाळेचे स्नेहसंमेलन, शाळेतील परिसरात, शिक्षकांसोबतचा प्रवास, मनामध्ये कायमस्वरूपी कोरल्या गेलेल्या प्रेमळ स्मृतींना उजाळा मिळाला. विद्यार्थ्यांचे, औक्षण करून व गुलाबपुष्प देऊन, शाळेच्या मुख्या.देशमुख, उपमुख्या. देशपांडे, जेष्ठ शिक्षिका जढाळे ,कुलकर्णी यांना उत्साहात स्वागत केले.नंतर थोड्याच वेळात पारिपाठकरिता शाळेची घंटा वाजली.माजी विद्यार्थ्यांनी शालेय परिपाठचा पुन्हा अनुभव घेतला. सेवानिवृत्त शिक्षिका आ. देशपांडे व कार्यरत शिक्षिका आरती यांनी, विद्यार्थ्यांची हजेरी घेतली.विद्यार्थी वर्ग १ली ते ७वी चे धडे गिरवत शालेय भावाविश्वात रममाण झाले. मधल्या सुटीची बेल होताच उपस्थित सर्व विद्यार्थ्यांनी सहभोजनाचा स्नेहपूर्वक आस्वाद घेतला. नंतर रंगला तो विद्यार्थी व शिक्षक यातील संवाद. शिक्षकांकडून मिळालेल्या संस्कारांची, ज्ञानाची, शिदोरी च्या आम्ही कायम ऋणात राहू असे उद्गार काढत कृतज्ञता व्यक्त केली.माजी शिक्षिका आ.देशपांडे मॅडम,आरती मॅडम व शाळेच्या मुख्या. देशमुख यांचा शाल, श्रीफळ, गुलाबपुष्प देवून आदरपूर्वक सत्कार केला. शाळेचा माजी विद्यार्थी दीपक लोखंडे यांनी लाडक्या बाईंचे, साडी देऊन आदरातिथ्य केले इतकेच नव्हे तर, सर्व विद्यार्थ्यांनी शाळेतील सध्या कार्यरत शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना देखील,आदराने भेटवस्तू दिली. गुरुदक्षिणा म्हणून विद्यार्थ्यांकडून विद्यार्थ्यांकरीता 'वॉटर कुलर' शाळेला भेट देऊन शाळेच्या इतिहासात एक नवा अध्याय जोडला. 'हसा व हसवत राहा' असे मार्गदर्शन मान्यवरांनी केले. देशपांडे यांनी,विद्यार्थ्यांना अर्थाजनातील काही देणगी, गरजवतांना देण्याचा व आई वडिलांना कधीही अंतर देऊ नका, असा मोलाचा सल्ला दिला.माजी विद्यार्थी मेळाव्यामुळे, शाळेच्या ऐतिहासिक सुवर्ण क्षणांचे, साक्षीदार ठरल्याचे समाधान व आनंद सर्व विद्यार्थ्यांनी व्यक्त केला.अशाप्रकारे माजी विद्यार्थ्यांच्या किलबिलिटा मुळे, विद्यानिकेतन प्राथमिक शाळा,रामनगर, अमरावती शाळेचा परिसरात नवीन चैतन्य परतले. कार्यक्रमाच्या यशस्वीते करिता, माजी विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी,यांचे सहकार्य लाभले.

## निव्वळ मनोरंजनाचे माध्यम नव्हे तर उद्योग-व्यवसाय आहे सिनेमा-पंकज धंदर

### 'सिनेमा सिनेमा खेळतांना' कार्यशाळेचे यशस्वी आयोजन

**अमरावती/का.प्र.**

सिनेमा किंवा मीडिया क्षेत्र हे केवळ मनोरंजनाचे साधन नसून रोजगाराचे आणि भविष्यातील करिअरची मजबूत दिशा आहे, असे मत अमरावती युवा स्पंदन सिनेमा प्रोडक्शनचे अध्यक्ष आणि कार्यशाळेचे मुख्य मार्गदर्शक फिल्म मेकर पंकज धंदर यांनी व्यक्त केले. स्थानिक अमरावती स्पंदन परिवार बहुउद्देशीय संस्था संचालित बीइंग आर्टिस्ट अकेडमी ऑफ फ़िल्म अँड थियेटर आर्ट्स, द्वारे आयोजित 'सिनेमा सिनेमा खेळताना ' या चित्रपट उद्योजकता व रोजगार संधी जागरूकता कार्यशाळा नुकतीच अमरावती येथे संपन्न झाली .

कार्यशाळेचे मुख्य आकर्षण म्हणजे बीइंग आर्टिस्ट अकॅडेमि ऑफ फिल्म अँड थिएटर आर्टस्चे माजी विद्यार्थी आणि मालिका दिग्दर्शक आणि अभिनेता योगेश डवरे आणि तुला शिकवीन चांगलाच धडा, सुंदरा मनामधे भरली मालिकांचे दिग्दर्शक आणि अभिनेता तेजल डहाणकर, तसेच रॅपर विपिन तातड यांनी आपले अनुभव व्यक्त करून माध्यम क्षेत्रामध्ये काम करण्यासाठी प्रोत्साहित केले.कार्यशाळेत चित्रपट, वेब सिरीज, टी वी मालिका व इतर माध्यमांची ओळख, कार्यप्रणाली, वेगवेगळे विभाग, त्यातील विविध व्यवसाय व रोजगार संधीची उपलब्धता, माध्यमांचे रीतसर शिक्षणाचे महत्व व आवश्यकता, आर्थिक सहाय्य , विविध खाजगी तसेच शासकिय विभागांमध्ये नोकरीची पदे व त्यांची प्रक्रिया या बद्दल मुद्देसूद रीतसर मार्गदर्शन करण्यात आले असून बीइंग आर्टिस्ट अकॅडमी ऑफ फिल्म अँड थिएटर आर्ट्सच्या विद्यार्थ्यांद्वारे तयार करण्यात आलेल्या शोर्ट फिल्म्स चे प्रदर्शन करून प्रश्न उत्तरांच्या माध्यमातून चर्चा करण्यात आले. ओळख परिचय-चर्चा-मार्गदर्शन-फ़िल्म स्क्रिनिंग-अनुभवांची देवाण घेवाण अश्या स्वरूपातील या कार्यशाळां ची गरज तसेच चित्रपट निर्मिती चे रीतसर प्रशिक्षण घेणे महत्वाचे आहे याची जाणीव झाल्याचे शेवटी प्रशिक्षणार्थींनी आपल्या प्रतिक्रियांमधुन व्यक्त केले .



कार्यशाळेच्या आयोजनाची महत्वपूर्ण जबाबदारी बीइंग आर्टिस्ट अकॅडमी ऑफ फ़िल्म अँड थिएटर आर्ट्सचे माजी विद्यार्थी अक्षय बकसरे, संदेश बायस्कर,विज्ञप्ति पर्वतकर, प्रविण वानखडे, राज इसळ,श्रुती दंदे यानी आपली जबाबदारी पार पाडली कार्यशाळेत सचिन गिरी, वैभव गूल्हाने, हृषीकेश लव्हारे, महेश नागले, समीक्षा आष्टीकर, वेदांत पेनोरे, विष्णु आवन्डे, प्रतिका तेलगोटे, अवंतिका ढवळे, हृषीकेश ठाकरे, राज पवार , योगेश लोंदे, यश कावरे, साक्षी जीभकाटे,ई. प्रशिक्षणार्थीनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला.

# निवडणुकीच्या प्रतीक्षेत असलेले लोक-नेते



**आगामी काळात होत असलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांची तयारी सर्वच पक्षांकडून, निवडणूक यंत्रणेकडून केली जात आहे. मात्र, निवडणुका नक्की कधी होणार, याबाबत तर्कवितर्क लढवण्याशिवाय लोकांच्या हातात काही उरलेले नाही. राज्य सरकारने अलीकडेच प्रभाग रचना तयार करण्यासाठी मुदतवाढ दिल्याने हा मुद्दा चांगलाच ऐरणीवर आला आहे.**

राज्यातील महानगरपालिका, नगरपालिका, जिल्हा परिषदा, पंचायत समिती आदींच्या निवडणुका कधी कोरोनाच्या संसर्गाचे कारण देत, तर कधी ओबीसी आरक्षणाचा मुद्दा समोर आणून घेतल्या गेल्या नाहीत. कोरोनाचा संसर्ग कमी झाल्यानंतर २०२० पासून राज्यात कुठे एकदा तर कुठे दोनदा, तीनदा स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांची तयारी करण्यात आली होती; पण या निवडणुका घेण्यात आलेल्या नाहीत. राज्य सरकारने अलीकडेच प्रभाग रचना तयार करण्यासाठी मुदतवाढ दिल्याने हा मुद्दा चांगलाच ऐरणीवर आला आहे.

दरम्यान, जिल्हा परिषद, महानगरपालिकेसारख्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांबाबत सुप्रीम कोर्टाने ६ मे रोजी निर्णय दिला. ओबीसींना २०२२ पूर्वी असलेले आरक्षण कायम ठेवून सुप्रीम कोर्टाने राज्य निवडणूक आयोगाला चार महिन्यांच्या आत निवडणुका घेण्याचे निर्देश दिले. त्यानुसार निवडणूक आयोगाने कामाला सुरुवात केली असून, प्रभाग रचना फेरबदलाचे कामही अंतिम टप्प्यात आले आहे. तथापि, या निवडणुका कधी होणार, याबाबत विविध अंदाज वर्तवण्यात येत आहेत. यातील एका अंदाजानुसार, ऑक्टोबरमध्ये चार टप्प्यांत या निवडणुका पार पडण्याची शक्यता आहे.

निवडणुकांचा कार्यक्रम कधी जाहीर होईल, याबाबतची संभ्रमावस्था दूर सारत राज्यातील प्रत्येक पक्षांनी आपापल्या परीने काम करण्यास सुरुवात केली आहे. योग्य वेळ आल्यावर योग्य निर्णय घेऊ, असे सर्वच पक्षांचे प्रमुख नेते कार्यकर्त्यांना संबोधित करताना सांगत आहेत. काही जागांवर मैत्रीपूर्ण लढण्याचीसुद्धा तयारी करणे अथवा स्वबळावर याबाबतचा निर्णय करावा लागेल, असेदेखील चर्चेत येऊ लागले आहे. कुणाचे काय ठरेल, निवडणुका कधी होणार? कोण कुठे जाणार, हे त्या त्यावेळी सांगितले जाईल, असे मार्गदर्शन काही नेते कार्यकर्त्यांना करीत आहेत.

सध्या महाराष्ट्राच्या राजकारणात शिवसेना (उबाठा) आणि मनसे या पक्षांच्या संभाव्य युतीसाठी पडद्यामागे जोरदार हालचाली सुरू आहेत. त्याचप्रमाणे सध्या राष्ट्रवादी काँग्रेसचे दोन्ही गट एकत्र येतील, याबाबतही अधूनमधून चर्चा सुरू असतात. नेते अलीकडे आपापल्या पक्षाच्या कार्यकर्त्यांना संबोधित करत असताना सांगतात की, स्थानिक नेतृत्व आणि कार्यकर्त्यांची इच्छा असेल तरच निवडणुकांमध्ये युती केली जाईल; अन्यथा त्यांच्या मतानुसार निवडणुकीला सामोरे जाऊ. त्यामुळे कार्यकर्ते निश्चितच संभ्रमात आहेत.

महाराष्ट्रातला राजकीय खेळ पूर्णपणे बदललेला आहे. एवढेच नव्हे, तर खेळाचे नियमही बदललेले आहेत, हे सर्व पक्षांच्या प्रमुखांच्या विचारधारेतून समजून येते. आपण बेरजेचे राजकारण करणारे लोक आहोत. त्यामुळेच लोकांच्या प्रश्नांची सोडवणूक होण्यासाठी सत्ताधारी पक्षासोबत जाण्याचा निर्णय घेतला गेला आहे आणि आपली पक्षीय विचारधारा ही शाहू, फुले, आंबेडकर यांच्या विचारांनी चालणारी आहे; सत्तेसाठी काही तडजोडी कराव्या लागतात; कारण शेवटी विरोधी पक्षात बसून आणि घोषणा देऊन चालत नाही, असे उपमुख्यमंत्री अजित पवार राष्ट्रवादीच्या कार्यकर्त्यांना चर्चासत्रांमधून सांगत आहेत. दुसरीकडे, याच मूळ पक्षाचे संस्थापक असणारे शरद पवार 'आपल्या पक्षात फूट पडेल, असे काही वाटत नव्हते; पण फूट पडली ती काही मूलभूत विचारांमध्ये फरक झाला आणि फूट पडली. जे राहिले आहेत ते विचारांनी राहिले आहेत. आगामी निवडणुका होतील तेव्हा वेगळे चित्र पाहायला मिळेल. कार्यकर्त्यांनी एकसंध राहून जनतेशी बांधिलकी कायम ठेवून काम करावे,' असे सांगताहेत. तसेच, जेव्हा तुमच्यासारखे कार्यकर्ते एकत्रित विचारांसह पुढे येतील तेव्हा सत्ता आपोआप येईल. महाराष्ट्रात आपण सत्तेत येऊ, अशी परिस्थिती दिसत असल्याची भविष्यवाणीही करताहेत; पण यादरम्यान माळेगाव साखर कारखान्याच्या निवडणुकीत अजित पवारांनी विजयी शह देऊन बाजी मारली आहे.

महायुती असो किंवा महाविकास आघाडी, एकसंधतेने निवडणुकीला सामोरे जाणार का, हा मूळ प्रश्न आहे. याबाबत नेत्यांच्या भूमिकेकडे कार्यकर्त्यांचे आणि राज्याचे लक्ष लागले आहे. गेली तीन वर्षे आणि स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये लोकप्रतिनिधीच नाहीत. त्यामुळे दुसऱ्या-तिसऱ्या फळीतील नेते, कार्यकर्ते यांच्यासाठी निवडणूक अत्यंत प्रतिष्ठेची असेल. आम्ही महायुती म्हणून लढणार आहोत असे राज्याचे प्रमुख आणि घटकपक्षाचे प्रमुख नेते म्हणत असले, तरी ठिकठिकाणची परिस्थिती याच्याशी विपरीत आहे. अनेक ठिकाणी सामंजस्याने तिकीटवाटप करणे महायुतीला अशक्य होणार आहे.

खेळाचे नियम खेळ चालू असताना बदलले जातात, असा निवडणुकीचा तमाशा आहे. निवडणुकीच्या ऐन धुमाळीत 'मला युतीत घ्या, आघाडीत घ्या आणि बरोबरीचा वाटा द्या,' अशी मागणी करणाऱ्यांची संख्या वाढते. अशा अवचित कार्यकर्त्यांची आणि पुढाऱ्यांची महाराष्ट्रात कमी नाही. राजकारणात कोण कोणाबरोबर जाईल हे सांगता येत नाही. विविध प्रकारच्या निवडणुकांमध्ये सर्वच राजकारण बदलून गेले आहे. जुन्या काळातील मूल्यव्यवस्था आणि निकष आता इतिहासजमा झाले आहेत. पूर्वीचे राजकीय प्रतिष्ठेचे मापदंड आता संपले आहेत. त्यामुळे महाराष्ट्रातील राजकारण खरोखरीच अनाकलनीय झालेले आहे.अशा वातावरणात निवडणुकांमधून कार्यक्षम लोकप्रतिनिधींची निवड करून स्थानिक स्वराज्य संस्था, ग्रामपंचायतींपासून तालुका पंचायत, जिल्हा परिषद, नगरपालिका महानगरपालिका या सर्व संस्थांचे बळकटीकरण करणे ही काळाची गरज आहे. सध्या मनपा निवडणुकीसाठी प्रभाग रचनेत मोठा बदल करण्यात आला आहे. हा बदल केवळ तांत्रिक नसून, त्याचे दूरगामी राजकीय परिणाम होणार आहेत. विशेषतः, सत्ताधारी पक्ष आणि विरोधी पक्षांच्या दृष्टीने मोठ्या प्रभागांचा विचार होत असताना लोकप्रतिनिधी आणि नागरिक यांच्यातील अंतर वाढणे, स्थानिक समस्यांकडे बऱ्यापैकी दुर्लक्ष होणे आणि वेळोवेळी सामाजिक ताण वाढणे हे याचे दुष्परिणाम ठरू शकतात.

प्रभाग रचना तयार करताना ती सत्ताधारी पक्षाला अनुकूल होईल अशी केली जाते, असा आरोप होतो. मात्र, यावेळी प्रभाग रचना करताना निवडणूक आयोगाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार नाले, ओढे, नैसर्गिक प्रवाह, मोठ्या रस्त्यांचा विचार केला जाणार आहे. पालिकेकडून प्रभाग रचना करताना यंदा माहिती-तंत्रज्ञानाचा वापर केला जाणार आहे. ही निश्चितच स्वागतार्ह बाब आहे. नवीन मतदारांना मतदारयादी, आरक्षणे आदी संदर्भात कुठलाही संभ्रम राहणार नाही, याबाबत यंत्रणांकडून आवश्यक ती कार्यवाही होणे अपेक्षित आहे.

इच्छुक कार्यकर्त्यांचा विचार करताना राज्याच्या सत्तासमीकरणात फुटलेले राजकीय पक्ष एकत्र येणार का, अशा काही प्रश्नार्थक राजकीय वातावरणाचा परिणाम निवडणुकीसाठी इच्छुक असलेल्या उमेदवारांवर प्रकर्षाने होताना दिसून येत आहे. उमेदवार निवडीत समसमान प्रतिनिधित्व आणि कार्यकर्त्यांचे समाधान राखणे हे स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीतील सर्वात मोठे आव्हान असते. आज राज्यातील एकाच पक्षाचे वेगवेगळे झालेले दोन गट, या गटांमध्ये असलेला सुप्तसंघर्ष, या गटांचा त्यांच्या आघाडीतील मित्रपक्षांसोबतचे शीतयुद्ध या सगळ्या पार्श्वभूमीवर निवडणुकांमध्ये सावळागोंधळ होण्याच्या शक्यता आहेत. पक्षप्रमुख काय निर्णय घेतील, याची ठाम कल्पना नसल्याने आपण कोणत्या पक्षाच्या जाहीर सभांमध्ये विरोधात भूमिका घ्यायची की अजून आधांतरी चाचपडत राहायचे, या संभ्रमावस्थेत कार्यकर्ते आहेत.

राजकारणात प्रवेश केल्यापासून सातत्याने सत्तेच्या सावलीत राहणाऱ्या, वावरणाऱ्या नेत्यांनी कार्यकर्त्यांचे दुखणे समजून घेणे आवश्यक आहे. कार्यकर्त्यांच्या मनातील ही भावना अनाठायी नाही. देशात किती तरी राजकीय पक्ष आहेत की, ज्यांना अद्यापपर्यंत सत्तेची सावली मिळालेली नाही; पण तरी त्यांनी आपली विचारधारा आणि संघर्ष सोडलेला नाही. याउलट काही पक्ष आणि त्यांचे प्रमुख नेते वारंवार कुठेही कोणाबरोबरही सत्तेसाठी तडजोडी करताना दिसतात. याला जनहिताचे नाव देतात; पण ही एकप्रकारची बनवेगिरीच असते.

सामान्य कार्यकर्त्याला आणि मतदारांना नेहमीच अडथळा ठरणारा, बोचणारा आणखी एक महत्त्वाचा मुद्दा म्हणजे, सर्वच निवडणुकांमधील वाढत चाललेली घराणेशाही. मुले, भाचे, पुतणे, नातवंडे या राजकारणातील नातलगशाहीला आवर घालणे गरजेचे असूनही ते कोणाही राजकीय पक्षाला शक्य होत नाही ही खेदाची बाब आहे. अशा या कौटुंबिक तमाशाला मतदार आणि स्वाभिमानी कार्यकर्ते स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमधून योग्य तो संदेश देणार का, हाही प्रश्नच आहे.

● **मोहन मते**

# रोजगाराचे खुले दालन






दारिद्र्य आणि बेरोजगारी या भारतापुढील कळीच्या समस्या आहेत. त्यामुळे दारिद्र्यमुक्त भारतासाठी प्रयत्न केले जात आहेत; पण आजही देशात बेरोजगारीचे प्रमाण मोठे असून, तो चिंतेचा विषय आहे; मात्र देशात गुंतवणुकीत प्रचंड वाढ होत असून, पायाभूत सुविधांचा विकास होत आहे. भारतातील उत्पादन क्षेत्राची वाढ जूनमध्ये गेल्या १४ महिन्यांतील सर्वाधिक असल्याची आकडेवारी प्रसिद्ध झाली आहे. जून महिन्यात जीएसटी संकलन १.८४ लाख कोटी रुपयांवर गेले असून, वार्षिक तुलनेत त्यात ६.२ टक्क्यांची वाढ झाली आहे. याचा अर्थ, देशात व्यवसाय-उद्योग जोमाने विस्तारत आहेत, तरीही उत्पादन क्षेत्राची प्रगती अधिक गतीने झाली, तरच युवावर्गाला नोकऱ्या मिळतील. या पार्श्वभूमीवर देशात रोजगारवाढीला चालना देण्यासाठी केंद्रीय मंत्रिमंडळाने रोजगाराशी निगडित १ लाख कोटींच्या प्रोत्साहन योजनेला मंजुरी दिली असून, त्याचे स्वागत केले पाहिजे. नव्या योजनेंतर्गत पहिल्यांदाच काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना १५ हजार रुपयांपर्यंतचे एक महिन्याचे वेतन मिळणार आहे. कंपनीच्या मालकांना अतिरिक्त रोजगार निर्माण करण्यासाठी दोन वर्षांपर्यंत प्रोत्साहन दिले जाणार आहे.उत्पादन क्षेत्रासाठी आणखी दोन वर्षे वाढीव लाभ दिले जाणार आहेत.

२०२४-२५च्या केंद्रीय अर्थसंकल्पात रोजगारनिर्मितीशी निगडित २ लाख कोटींची योजना घोषित केली होती. त्याद्वारे चार कोटी लोकांच्या हाताला काम मिळणे अपेक्षित होते. आता त्याअंतर्गतच ही १ लाख कोटींची योजना राबवली जाणार आहे. ज्यांना नोकऱ्या मिळणार आहेत, त्यापैकी १ कोटी ९२ लाख लाभार्थी प्रथमच कामगार क्षेत्रात प्रवेश करतील. गेल्यावर्षी महाराष्ट्र सरकारनेही पात्र तरुण-तरुणीला प्रत्येकी दरमहा १० हजार रुपये देणारी मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजना सुरू केली होती. केंद्राच्या योजनेंतर्गत पहिल्यांदाच नोकरी करणाऱ्या लाभार्थ्यांना दरमहा १५ हजार रुपयांचा निधी दिला जाईल. योजनेच्या दुसऱ्या भागात कंपनी मालकांना प्रोत्साहन निधी दिला जाणार आहे. किमान ६ महिने सातत्यपूर्ण रोजगार असलेल्या प्रत्येक अतिरिक्त कर्मचाऱ्यासाठी सरकार कंपनीला दोन वर्षांसाठी दरमहा ३ हजार रुपयांपर्यंत निधी देईल. उत्पादन क्षेत्रातील कंपनी असेल, तर तिसऱ्या आणि चौथ्या वर्षीही हा निधी दिला जाईल.कोणत्याही विकासोन्मुख अर्थव्यवस्थेच्या दृष्टीने उत्पादन क्षेत्राची भरभराट होणे, हे महत्त्वाचे असते. शिवाय संशोधन विकास आणि नवोन्मेष परिसंस्थेला मजबूत करण्यासाठी १ लाख कोटींच्या निधीला केंद्र सरकारने मंजुरी दिली आहे. त्यामुळे अद्ययावत तंत्रज्ञानाचा वापर करणाऱ्या स्टार्टअप्सना चालना मिळू शकेल. एनडीए सरकारने गेल्या १० वर्षांत संयुक्त पुरोगामी आघाडी सरकारच्या तुलनेत दीडपट अधिक नोकऱ्या दिल्या असल्याचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी गतवर्षी एका रोजगार मेळाव्यात सांगितले होते.भरतीचा अभ्यास पूर्ण करण्यासाठी अगोदरच्या सरकारने निष्कारण दीर्घकाळ दवडला आणि त्यामुळे लाचखोरीस उत्तेजन मिळाले, असा आरोप पंतप्रधानांनी तेव्हा केला होता.केंद्र सरकारने एक कोटी घरांसाठी छतावरील सौरऊर्जेची योजना सुरू केली असून, त्यातूनही रोजगारनिर्मिती होणार आहे. पायाभूत सुविधांमध्ये ११ लाख कोटी रुपयांची गुंतवणूक केल्यामुळेही रोजगार निर्माण होणार आहेत. तसेच देशात सव्वा लाखाहून अधिक स्टार्टअपसह भारताने या क्षेत्रात तिसरा क्रमांक मिळवला आहे. नव्या पिढीतील तरुण अगदी लहान क्षेत्रात नवनवीन कंपन्या सुरू करत असून, त्यामुळे लाखो तरुणांना नोकऱ्या उपलब्ध होत आहेत. केंद्रीय सशस्त्र पोलीस दलात भरतीसाठी तरुणांना नक्कीच संधी आहे. लष्करी भरती परीक्षा आता हिंदी आणि इंग्रजी व्यतिरिक्त १३ भारतीय भाषांत घेण्यास सुरुवात झाली आहे. त्यामुळे उमेदवारांना समान संधी मिळेल, तरीही दरवर्षी दोन कोटी रोजगार निर्माण होतील, असे जे आश्वासन देण्यात आले होते, ते पूर्ण झालेले नाही, हे वास्तव आहे.

२०१७-१८ मध्ये देशातील बेरोजगारी ४५ वर्षांतील सर्वाधिक प्रमाणात होती हे सर्वज्ञात आहे. त्या स्थितीत आजही लक्षणीय बदल झाला आहे, असे म्हणता येणार नाही. गेल्या पाच वर्षांत मनरेगावर अर्थसंकल्पातील तरतुदींपेक्षा अधिक खर्च होत आला आहे आणि त्यात वाईट असे काहीही नाही. भारतातील कोणत्याही गावात १८ वर्षांपेक्षा जास्त वय असलेल्या कोणत्याही व्यक्तीला मागितल्यावर काम देणे, ही प्रशासनाची जबाबदारी आहे, अशी मनरेगा कायद्याने हमी दिलेली आहे. एका अहवालानुसार, इस्रायल हा देश ७० हजार कामगार चीन, भारत आणि अन्य देशांमधून बांधकाम क्षेत्रात काम करण्यासाठी आणणार आहे. इस्रायलमध्ये कामगारांना महिन्याला दीड लाख रुपये पगाराच्या नोकऱ्या मिळत आहेत. भारतापेक्षा तेथे कामगारांना याप्रकारे अधिक पगार मिळतो. उत्तर प्रदेश, हरियाणा या राज्यांतून हजारो कामगार इस्रायलमध्ये नोकऱ्या मिळवू लागले आहेत. भारतात आज बेरोजगारीचे प्रमाण जे ६ टक्के होते, ते ४ टक्क्यांवर आले आहे. नवीन नोकऱ्या तयारच होत नाहीत, असे नाही; पण संघटित क्षेत्रातील नोकऱ्या वाढण्याचे प्रमाण अत्यल्प आहे. अझीम प्रेमजी विद्यापीठाच्या 'स्टेट ऑफ वर्किंग इंडिया' या अहवालानुसार, नियमित पगार किंवा मानधन असणाऱ्या लोकांची संख्या १९८० पर्यंत स्थिर होती. २००४ नंतर त्यात वाढ झाली. पुरुषांची संख्या १८ ते २५ टक्क्यांनी वाढली, तर नियमित पगार असणाऱ्या महिलांची संख्या १० ते २५ टक्क्यांनी वाढली. सरकारी नोकऱ्यांमध्ये आज विविध जाती-जमाती आरक्षणाची मागणी होत असली, तरी नोकरीच्या संधी घटत चालल्या आहेत. सार्वजनिक उपक्रमांचे खासगीकरण होत असल्यामुळे तेथेही नोकऱ्या कमी आहेत. कृत्रिम बुद्धिमत्तेमुळे आणि भांडवलसघन उद्योगामुळे भांडवलाच्या तुलनेत निर्माण होणाऱ्या नोकऱ्यांचे प्रमाण कमी आहे. म्हणूनच रोजगारप्रधान अशा उद्योग-धंद्यांवर भर देण्याची गरज आहे. त्यासाठी कृषी-आधारित उद्योग-धंदे, सूक्ष्म व लघू उद्योग यांना अधिक उत्तेजन दिले पाहिजे. रोजगार आणि विकास या प्रक्रिया हातात हात घालून चालल्या पाहिजेत.

# गणित विभागाची शैक्षणिक आणि संशोधन क्षेत्रात उल्लेखनीय वाटचाल




पदव्युत्तर शिक्षण व संशोधनाला चालना देण्याच्या दृष्टीने स्थापन झालेला संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातील गणित विभाग आपल्या उल्लेखनीय कार्यामुळे शैक्षणिक क्षेत्रात स्वतःचा ठसा उमटवत आहे. एम.एस्सी., पीएच.डी. अभ्यासक्रमांसह संशोधन क्षेत्रातही आघाडीवर आहे.

**संशोधन प्रकल्पामध्ये विभागाचे यश**

संशोधनाचे मुख्य क्षेत्र सापेक्षता आणि विश्वविज्ञान असून, विभागातील ४० पेक्षा अधिक विद्यार्थ्यांनी यशस्वीरित्या आचार्य पदवी प्राप्त केली आहे. विद्यापीठ अनुदान आयोगाच्या अर्थसहाय्याने विभागाने दोन संशोधन प्रकल्प यशस्वीरित्या पूर्ण केले आहेत. २००५ व २०१५ या वर्षात आइन्स्टाईनच्या विशेष व सामान्य सापेक्षता सिध्दांताच्या शताब्दी वर्षानिमित्त विभागाने आय.सी.आर.-२००५ आणि आय.सी.जी.आर.-२०१५ या दोन आंतरराष्ट्रीय परिषदांचे केलेले आयोजन शैक्षणिक क्षेत्रातील अत्यंत मानाची बाब मानल्या गेली.

**राष्ट्रीय परिषदांचे यशस्वी आयोजन**

रौप्य महोत्सवी वर्षाच्या पार्श्वभूमीवर विभागाने गणित विज्ञानातील अलिकडच्या प्रगतीवरील राष्ट्रीय परिषद आयोजित करून देशभरातील अभ्यासकांना एक व्यासपीठ उपलब्ध करून दिले. विभागातील २५ हून अधिक विद्यार्थ्यांनी नेट, सेट,गेट सारख्या राष्ट्रीय स्तरावरील परीक्षा उत्तीर्ण केल्या आहेत. विशेष उल्लेखनीय बाब म्हणजे विभागातील काही संशोधन विद्यार्थ्यांनी इन्स्पायर फेलोशिप अंतर्गत संशोधन केलेले आहे.

**अनेक विद्यार्थी मोठमोठ्या संस्थांमध्ये कार्यरत**

विभागाचे अनेक विद्यार्थी प्राध्यापक, शोध संस्थांमध्ये संशोधक, डेटा सायन्स आणि ॲनालिस्ट, ऑपरेशन रिसर्च, फायनान्स व बँकिंग अशा अनेक क्षेत्रांमध्ये कार्यरत आहेत. या व्यतिरिक्त एम.पी.एस.सी., यू.पी.एस.सी., एस.एस.सी., बँकिंग या परीक्षांमध्ये गणिताचा विशेष उपयोग होतो. जी.आर.ई., टी.ओ.ई.एफ.एल. यांसारख्या परीक्षा देऊन परदेशामधील विद्यापीठांमध्ये पुढील शिक्षणासाठी संधी उपलब्ध आहे. येणाऱ्या काळात इस्त्रो, डी.आर.डी.ओ., आर.बी.आय., सेबी आणि खाजगी बँकिंग क्षेत्रात वैज्ञानिक, विश्लेषक पदांची गरज निर्माण होणार आहे.

**विद्यार्थ्यांसाठी सुविधा**

गणिताच्या विद्यार्थ्यांना मशीन लर्निंग, आर्टिफिशियल इंटेलिजेंस यासारखे काही कोर्सेस करून अशा क्षेत्रात विशेष प्राध्यान्य मिळते. गेल्या तीन दशकांत विभागाने विद्यार्थ्यांना संधी, मार्गदर्शन आणि आंतरराष्ट्रीय दर्जाचे व्यासपीठ उपलब्ध करून देत उत्कृष्ट शैक्षणिक परंपरा जोपासली आहे. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाकरिता विभागामध्ये गणित दिवस, क्रीडा आणि सांस्कृतिक कार्यक्रम, माजी विद्यार्थी मेळावा असे अनेक कार्यक्रम राबविले जातात. याव्यतिरिक्त विद्यापीठामध्ये मुला - मुलींचे स्वतंत्र वसतिगृह, कमवा-शिकवा योजना, इनक्युबेशन सेंटर, सेंट्रल लायब्रारी, वेगवेगळ्या क्षेत्रातील मान्यवरांचे व्याख्याने, खेळ, क्रीडा मैदाने, स्वीमिंग पूल, आधुनिक जीम, पोस्ट ऑफिस, एटीएम, निसर्ग रम्य वातावरण इत्यादीचा विद्यार्थ्यांना व्यक्तिमत्व विकासासाठी उपयोग होतो. भविष्यातही गणिताच्या क्षेत्रात नवनवीन संशोधन घडवण्याचा विभागाचा निर्धार आहे. विद्यार्थ्यांनी पदव्युत्तर गणित विभागामध्ये आपले प्रवेश निश्चित करण्याकरिता व अधिक माहितीकरिता विभागप्रमुख यांच्याशी कार्यालयीन वेळेत संपर्क करावा, असे आवाहन करण्यात येत आहे.

## विद्यापीठातील वनस्पतीशास्त्र विभागाची प्रवेश प्रक्रिया सुरू

# तीस वर्षापासून संशोधन व अध्यापनात वनस्पतीशास्त्र विभाग अग्रेसर



अमरावती-संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातील वनस्पतीशास्त्र विभाग गेल्या तीस वर्षांपासून संशोधन आणि अध्यापनात अग्रेसर असून, विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण देण्यासाठी कटिबद्ध आहे. विभागाची प्रवेश प्रक्रिया सुरू झाली असून विद्यार्थ्यांनी अभ्यासक्रमाला प्रवेश घेवून आपले भविष्य घडवावे, असे आवाहन विद्यापीठाच्यावतीने करण्यात येत आहे.

अभ्यासक्रमाची वैशिष्ट-वनस्पतीशास्त्र विभागातील एम.एस्सी. बॉटनी अभ्यासक्रम विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाकडे अधिक लक्ष देतो. प्रामुख्याने 'प्लांट टिश्यू कल्चर' आणि 'मॉलेक्यूलर सिस्टीमॅटिक्स ऑफ प्लांट्स' या दोन प्रमुख विषयांचा यात समावेश आहे. सैध्दांतिक ज्ञानाबरोबरच विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष अनुभवासाठी व्यावहारिक प्रशिक्षण सुध्दा दिले जाते.

संशोधनात यश-विभागाने अनेक राष्ट्रीय संस्थांशी आणि यशस्वीपणे सामंजस्य करार केले आहेत. एन.ई.टी., सेट, गेट यांसारख्या स्पर्धा परीक्षांमध्ये विभागाने उत्कृष्ट निकाल दिले आहेत. अभ्यासक्रम पूर्ण करुन अनेक विद्यार्थी उच्च शिक्षण आणि संशोधन क्षेत्रात यशस्वी झाले आहेत. विभागात राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय परिषदांचे आयोजन केले जाते, त्यामुळे विद्यार्थ्यांना संशोधनाच्या नवीनतम प्रवृत्तींची माहिती मिळते.

पायाभूत सुविधा-विभागात सुसज्ज प्रयोगशाळा, आधुनिक उपकरणे, संग्रहालय, उद्यान, रेफरन्स लायब्रारी, संगणक प्रयोगशाळा तसेच डेटाबेस यांचा समावेश आहे.

विद्यार्थ्यांना संशोधन आणि शिक्षणासाठी आवश्यक ती सर्व साधने विभागामध्ये उपलब्ध आहेत.

विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास-विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास आणि करिअर घडविण्यासाठी विभागाव्दारे वर्षभर विविध उपक्रम राबविण्यात येतात. व्याख्याने, गट चर्चा, सेमिनार, कार्यशाळा, क्षेत्रभेटींच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाकडे लक्ष दिले जाते. त्याचबरोबर विद्यार्थ्यांना सुवर्ण पदके, रिसर्च स्कॉलरशिपसाठी प्रोत्साहित केले जाते.

वनस्पतीशास्त्रात करिअरच्या संधी-एम.एस्सी. बॉटनी पूर्ण केल्यानंतर विद्यार्थ्यांना संशोधन, शिक्षण, औषधनिर्माण, कृषी, पर्यावरण, जैव-पर्यटन, उद्योग आणि उद्योजकता यांसारख्या विविध क्षेत्रांमध्ये करिअरच्या उत्तम संधी उपलब्ध आहेत.

प्रवेशासाठी संपर्क-अभ्यासक्रमाला प्रवेश घेण्यासाठी इच्छूक विद्यार्थ्यांना विभागप्रमुख डॉ. वर्षा नाठार यांच्याशी कार्यालयीन वेळेत संपर्क साधता येईल.

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय
अकोला
जिल्हा विशेष

## सर्वपक्षीय नेत्यांची मागणी

# दर्शन पळसकार याच्या मारेक-यांना फाशीची शिक्षा द्यावी

■ प्रतिनिधी | अकोट ■

तालुक्यातील अल्पवयीन दर्शन वैभव पळसकार या बालकाच्या निर्घृण हत्येने संपूर्ण जिल्ह्यात खळबळ उडाली आहे. दि. ३ जुलै रोजी ही दुर्दैवी घटना घडली. दर्शन याचा सावत्र वडील आकाश साहेबराव कान्हेरकर याने गौरव वसंतराव गायगोले याच्या मदतीने कट रचून दर्शनची हत्या केल्याचे उघड झाले आहे.



या अमानुष घटनेचा तीव्र निषेध करत आज दि. ४ जुलै रोजी अकोट येथे सर्वपक्षीय पदाधिकाऱ्यांनी उपविभागीय अधिकारी मनोज लोणारकर, पोलीस उपविभागीय अधिकारी अनमोल मित्तल व ठाणेदार अमोल माळवे यांना निवेदन सादर करून मारेकऱ्यांना फाशीची शिक्षा देण्यात यावी, अशी ठाम मागणी केली. दर्शनच्या अपहरणाची बनावट तक्रार दाखल करून त्याचा सावत्र बाप आणि त्याचा साथीदार गौरवने त्याची हत्या केल्याचे पोलिस तपासात समोर आले. या प्रकरणात कोणताही वेळ न दवडता फास्टट्रॅक कोर्टात खटला चालवून आरोपींना कठोर शिक्षा देण्यात यावी, अशी एकमुखी मागणी करण्यात आली. या दुर्दैवी घटनेबरोबरच विश्व हिंदू परिषदेचे आणि बजरंग दलाचे नेते अनिलआप्पा गोंडागरे यांच्या दुःखद निधनाची बातमीही समाजमनाला सुन्न करणारी ठरली. यानिमित्ताने छत्रपती शिवाजी महाराज चौक, अकोट येथे दोघांना सामूहिक श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.

या वेळी अकोट शहरातील सर्वपक्षीय नेते, पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. उपस्थितांमध्ये राजेश नागमते, दिलीप बोचे, योगेश नाठे, पुरुषोत्तम चौखंडे, मायाताई म्हैसने, उषाताई गिरनाळे, मनिष कराळे, डॉ. गजानन महल्ले, अमोल पालेकर, हरीश टावरी, डॉ. विशाल इंगोले, शैलेश इंगोले, बाळासाहेब घावट, डॉ. दिनेश नागमते, अशोक वडी, अफजल शेख, राजेश भाळतिळक, आणि नाभिक समाजाचे विविध प्रतिनिधी उपस्थित होते. दर्शनच्या मृत्यूमुळे संतप्त झालेल्या जनतेने आरोपींना तत्काळ कठोर शासन व्हावे, अशी जोरदार मागणी लावून धरली असून, प्रशासनाने त्वरित कारवाई करावी अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

# अकोला-पंढरपूर साठी विशेष रेल्वे सेवा

## खासदार अनुप धोत्रे यांच्या प्रयत्नांना यश

■ प्रतिनिधी | अकोला ■

अकोला, वाशिम व बुलढाणा जिल्ह्यातील वारकऱ्यांसाठी एक दिलासादायक बातमी असून दक्षिण मध्य रेल्वेने खासदार अनुप धोत्रे यांच्या मागणीची दखल घेत अकोला ते पंढरपूर साठी विशेष रेल्वे सेवा सुरू करण्याचा निर्णय घेतला आहे. सलग दोन वर्षांच्या पाठपुराव्यानंतर ही सेवा सुरू होत असून आज शनिवार दिनांक ५ जुलै रोजी सकाळी १०.३० वाजता अकोला रेल्वे स्थानकाच्या प्लॅटफॉर्म क्रमांक ५ वरून गाडीला हिरवा झेंडा दाखवून शुभारंभ करण्यात येणार आहे.



या विशेष गाडीमुळे वारकऱ्यांना पंढरपूर यात्रा करण्यासाठी कमी दरात, सोयीची व सुरक्षित वाहतूक सुविधा उपलब्ध होणार आहे. उद्घाटन प्रसंगी भाजपा प्रदेश सरचिटणीस व आमदार रणधीर सावरकर, खासदार अनुप धोत्रे, आमदार प्रकाश भारसाकळे, आमदार हरीश पिंपळे, आमदार वसंत खंडेलवाल, आमदार जयंत मसने, संतोष शिवरकर, विजय अग्रवाल, किशोर पाटील, भाजप महिला आघाडीच्या नेत्या सौ. सुहासिनीताई धोत्रे, सौ. मंजुषाताई सावरकर, सौ. पुष्पाताई खंडेलवाल, चंदाताई शर्मा, विजय अग्रवाल, वसंत बाछूका, उमेश मालू, ॲड. सुभाष सिंग ठाकूर, अर्चनाताई शर्मा, अनिता चौधरी, नितीन राऊत, पवन महल्ले, आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

तसेच आज ( ५ जुलै ) रोजी दुपारी २ वाजता अनवी मिर्जापुरी येथील रेल्वे क्रॉसिंगसाठी अंडरपास बांधकामाचे भूमिपूजन देखील आमदार रणधीर सावरकर व खासदार अनुप धोत्रे यांच्या हस्ते संपन्न होणार आहे.

या दोन्ही कार्यक्रमासाठी सर्व वारकरी, सनातनप्रेमी, भाजप कार्यकर्ते व विविध आघाडीचे पदाधिकारी यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन माधव मानकर, गिरीश जोशी, अ?ड. देवाशीष काकड, संजय जोशी, सजय गोटफोडे, आम्रपाली उपरवट, रमेश अलकरी, हिरा कृपलानी यांनी केले आहे.


### जाहीर सुचना

याव्दारे सर्वत्र लोकांना कळवीण्यात येते की, मी नामे प्रमोद सुरेश शिरभाते रा. गुणवंत नगर मुर्तिजापूर जि. अकोला येथील रहीवाशी असुन मी दि. १/७/२०२५ रोजी कृषी उत्पन्न बाजार समीती येथून घरी जात असतांना माझ्या सोबत असलेली पिशवी ही वाटेतच पडली व हरवीली आहे. सर्वत्र शोधाशोध केली परंतू मिळाली नाही. सदर पिशवी मध्ये मी व माझा भाऊ विशाल सुरेश शिरभाले यांचे दस्तक्र. ११८२/२०१० दि. ३०/४/२०१० रोजी मौजा-हातगाव सर्व्हे नं. १५०/९ प्लॉट क्र.९९ क्षेत्रफळ १८५.८७ चौ.मी. २००० चौ. फुट ज्याची चर्तुसिमा पुर्वेस - कारंजा रस्ता पश्चीमेस - प्लॉट नं. १२, उत्तरेस- ले-आऊट मधील रस्ता, दक्षिणेस - प्लॉट नं. ३० वर्णनांकीत प्लॉटचे अस्सल खरेदी खत होते.

सदर खरेदी खत जर कोणास ही मिळुन आल्यास त्यांनी खालील मोबाईल नंबर ९२७३४३०१११ तथा वर नमुद पत्त्यावर संपर्क साधावा.

दि. ३/७/२०२५
ठिकाण-मुर्तिजापूर

**प्रमोद सुरेश शिरभाते**


# सेवानिवृत्त पोलीस अधिकारी व अंमलदारांचा भावनिक सत्कार सोहळा संपन्न

## पोलीस अधीक्षक अर्चित चांडक यांनी दिल्या पुढील वाटचालीस शुभेच्छा

■ प्रतिनिधी | अकोला ■

अकोला पोलीस दलातील जून २०२५ मध्ये सेवानिवृत्त झालेल्या पोलीस अधिकारी व अंमलदारांचा सत्कार सोहळा आज पोलीस अधीक्षक कार्यालयातील 'विजय हॉल' येथे संपन्न झाला. या कार्यक्रमाचे आयोजन मंगळवारी सकाळी १२ वाजता जिल्हा पोलीस अधीक्षक अर्चित चांडक (भा.पो.से.) यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले होते.

सदर सत्कार सोहळ्यात १६ सेवानिवृत्त पोलीस अधिकारी व अंमलदारांचा सत्कार करण्यात आला. यामध्ये पोउपनि जगदिश फुंडकर, सुभाष पहुरकर, प्रकाश पिंजरकर, देविदास ग्यारल, कैलास ताथोड, उमेश इंगळे, सुनिल जमुनाह, जितेंद्र कातखेडे, मोहनलाल चिचोंळकर, मोहम्मद रफिक शेख, प्रल्हाद कुरकुरे, वसंत खैरे, सुनिल मुजुमदार, अनिल डिवरे, पोहवा हशमत खान पठाण आणि पोशि रामेश्वर मांगुळकर यांचा समावेश होता.



या कार्यक्रमात सेवानिवृत्त पोलीस अधिकारी व त्यांच्या कुटुंबियांची उपस्थिती लक्षणीय होती. कार्यक्रमात सत्कारमूर्तींनी आपले अनुभव आणि भावना शेअर करतांना नोकरीतील कर्तव्याविषयी समाधान व्यक्त केले. पोलीस प्रशासनाकडून दिल्या जाणाऱ्या सन्मानामुळे सर्वांनी कृतज्ञता व्यक्त केली.

या वेळी पोलीस अधीक्षक अर्चित चांडक यांनी उपस्थित सेवानिवृत्त अधिकारी व त्यांच्या कुटुंबीयांची आस्थेने विचारपूस करत आरोग्याची काळजी घेण्याचा आणि निवृत्तीनंतरच्या आयुष्यात छंद जोपासण्याचा सल्ला देत पुढील वाटचालीस शुभेच्छाही दिल्या. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी राखीव पोलीस निरीक्षक गणेश जुमनाके व त्यांच्या पथकाने विशेष मेहनत घेतली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन पोहवा गोपाल मुकुंदे यांनी केले.

# अकोला महापालिकेला थकीत ३५ कोटींचा अधिभार तातडीने द्यावा

■ प्रतिनिधी | अकोला ■

अकोला महानगरपालिका क्षेत्रातील दस्तांची नोंदणी करताना वसूल करण्यात आलेल्या १ टक्का अतिरिक्त मुद्रांक अधिभाराचे तब्बल ३५, ४९, ००, ९०१ इतके थकीत शुल्क तातडीने अदा करावे, अशी जोरदार मागणी आ.रणधीर सावरकर यांनी महाराष्ट्र विधानसभेत लक्षवेधी सूचनेद्वारे केली.



## आ.रणधीर सावरकर यांची विधानसभेत जोरदार मागणी

विधानसभा नियम १०५ नुसार सावरकर यांनी सभागृहात हा मुद्दा उपस्थित केला. त्यांनी सांगितले की, डिसेंबर २०२४ पर्यंत ?३०.७९ कोटी व जानेवारी ते मार्च २०२५ दरम्यान ?४.६९ कोटी अशी एकूण ?३५.४९ कोटी रक्कम नोंदणी व मुद्रांक विभागाकडून अकोला महापालिकेला वितरित करण्यात आलेली नाही. यामुळे महापालिकेवर आर्थिक संकट कोसळले आहे.या अधिभाराच्या स्वरूपात २०२२-२३ मध्ये १३.८४ कोटी, २०२३-२४ मध्ये ?१३.६१ कोटी, आणि २०२४-२५ मध्ये ?१५.२१ कोटी अशी रक्कम राज्य सरकारने प्रत्यक्ष वसूल केली आहे, मात्र संबंधित महानगरपालिकांना ती रक्कम अद्याप वितरित करण्यात आलेली नाही, असे त्यांनी निदर्शनास आणले. सावरकर यांनी महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्याकडे ही रक्कम तातडीने वितरित करण्याचा आग्रह धरला. मागणीला प्रतिसाद देताना महसूल मंत्री बावनकुळे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासोबत यासंदर्भात बैठक घेऊन निश्चित धोरण ठरविण्यात येईल व डिसेंबर २०२५ पूर्वी थकीत रक्कम अदा करण्याची कार्यवाही केली जाईल,असे आश्वासन दिले.


### जाहीर नोटीस

**विद्यमान सह दिवाणी न्यायाधीश (कनिष्ठ स्तर), अकोट यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. २०३/२०२५ — प्रोसेस नं.२२१५/२०२५
चौ.ता. ०८/०८/२०२५ — दिनांक : ०१/०७/२०२५

**अर्जदार :** १. रेखा गजानन इंगळे वय ५० वर्ष रा. धोतर्डी, ता. जि. अकोला २. नवनाथ किसन वजीरे, वय - ४२ वर्ष, रा. सावरा, ता. अकोट, जि. अकोला

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** कोणीही नाही

सर्वत्र लोकांना सुचित करण्यात येते की, वरील अर्जदार यांनी बॉम्बे रेगुलेशन VIII १८२७ चे कलम २ अंतर्गत वि. सह दिवाणी न्यायाधीश (कनिष्ठ स्तर), अकोट, जिल्हा अकोला यांचे न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळणेकरीता अर्ज सादर केला आहे.

वरील अर्जदार हे वर दिलेल्या पत्त्यावर राहतात. अर्जदारांचा भाउ मयत नामे संजय किसनरावजी वजिरे हे दि. ०४/१२/२०१४ रोजी राहते घरी सावरा, ता. अकोट, जि. अकोला येथे अविवाहीत मरण पावले आहे. तसेच अर्जदाराचे वडिल मयत नामे किसनरव सुर्यभान बजिरे यांचा मृत्यू दि. ०५/०८/२०१२ रोजी मयत झाले आहेत. तसेच अर्जदारांची आई मयत नामे मामाकार्णाबाई किसनराव वजिरे यांचा मृत्यू दि. ०५/०२/२०१३ रोजी झाला आहे. असे की, अर्जदारांव्यतिरीक्त मयत नामे संजय किसनरावजी वजिरे यांना इतर कोणीही कायदेशीर वारस नाहीत.

त्याअर्थी सर्वत्र लोकांना सुचित करण्यात येते की, सदरचे अर्जासंबंधी इतर कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास किंवा ते स्वतः वारस असल्यास, सदरची नोटीस वृतपत्रात प्रसिध्द झाल्याच्या दिनांकापासून ३० दिवसाचे आंत, त्यांनी उपरोक्त न्यायायालयात स्वतः अथवा वकीलामार्फत हजर राहावे अन्यथा सदरचे प्रकरण नियमानुसार निकाली काढण्यात येईल. करीता आज दिनांक ०१/०७/२०२५ रोजी माझे सहीने व कोर्टाच्या शिक्यानिशी दिले.

शिक्का

**आदेशानुसार**
सहायक अधिक्षक (न्यायीक)
दिवाणी न्यायालय (व.स्तर), अकोट


# फळे पिकविण्यासाठी घातक रसायनांचा वापर करणाऱ्यांवर कठोर कारवाई करा

■ प्रतिनिधी | अकोला ■

अन्नसुरक्षेच्या दृष्टीने गंभीर ठरणाऱ्या कृत्रिमरीत्या फळे पिकविण्याच्या प्रकारांवर आमदार वसंत खंडेलवाल यांनी विधानसभेत आवाज उठवला. अकोल्यासह राज्यातील विविध भागांत आंब्यासह इतर फळे कॅल्शियम कार्बाईड, ?सिटिलीन गॅस, आर्सेनिक आणि फॉस्फरससारख्या घातक रसायनांच्या साहाय्याने पिकविली जात असल्याचे त्यांच्या निदर्शनास आल्याची माहिती त्यांनी यावेळी दिली.



## आ. खंडेलवाल यांची अधिवेशनात ठाम मागणी

विधानसभा अधिवेशनातील प्रश्नोत्तराच्या तासामध्ये आमदार खंडेलवाल यांनी या गंभीर प्रकारांविरोधात कठोर कारवाई करण्याची मागणी केली. 'या रसायनांमुळे नागरिकांना चक्कर येणे, वारंवार तहान लागणे, चिडचिड होणे, श्वास घेण्यात अडचण, यकृत निकामी होणे, कॅन्सरसारखे गंभीर आजार होण्याची शक्यता वाढते. त्यामुळे अशा प्रकारांवर तातडीने आणि कठोरपणे कारवाई होणे अत्यावश्यक आहे,' असे त्यांनी ठासून सांगितले. या मागणीला उत्तर देताना राज्याचे अन्न व औषध प्रशासन मंत्री ना. नरहरी झिरवाळ यांनी स्पष्टीकरण देताना सांगितले की, कृत्रिम पद्धतीने फळे पिकविण्यासाठी केवळ १०० पीपीएम इतक्या प्रमाणात इथिलिन गॅस वापरण्यास परवानगी आहे. कॅल्शियम कार्बाईड आणि तत्सम घातक रसायनांचा वापर अन्न सुरक्षा व मानके कायदा २००६ आणि नियमन २०११ च्या अंतर्गत गुन्हा मानला जातो.

या पार्श्वभूमीवर अन्न व औषध प्रशासनामार्फत विशेष मोहिमा राबवून तपासण्या करण्यात येत असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. अकोला जिल्ह्यातील सहा फळ विक्रेत्यांवर अशा प्रकारचे तपास करण्यात आले असून, राज्यातील इतर भागातही नमुने संकलित करून कारवाईची प्रक्रिया सुरू आहे, असे मंत्री झिरवाळ यांनी अधिवेशनात सांगितले.

# कोलविहीर-उमरा रस्ता काटेरी झुडपांच्या विळख्यात : अपघातांचा धोका वाढला

■ प्रतिनिधी | अकोट ■

तालुक्यातील कोलविहीर ते उमरा दरम्यानचा नव्याने तयार झालेला सुमारे दोन किलोमीटरचा रस्ता सध्या दोन्ही बाजूंनी वाढलेल्या काटेरी झुडपांच्या विळख्यात सापडला आहे. या रस्त्याने प्रवास करणाऱ्या शेतकरी, विद्यार्थी आणि सामान्य नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागत असून, अपघाताचा धोका दिवसेंदिवस वाढत चालला आहे.



संबंधित प्रशासन आणि लोकप्रतिनिधींना वारंवार निवेदन देऊन देखील झुडपांची सफाई करण्यात आलेली नाही, असा आरोप स्थानिक ग्रामस्थांनी केला आहे. या रस्त्याचा उपयोग परिसरातील उमरा, मक्रमपूर, बेलूरा, शहापूर, जितापूर आदी गावांचे नागरिक दैनंदिन कामकाजासाठी मोठ्या प्रमाणावर करतात. मात्र, रस्त्याच्या दोन्ही बाजूंनी वाढलेल्या काटेरी झुडपांमुळे रस्ता अत्यंत अरुंद झाला असून, एका वेळेस दोन वाहने जाणे कठीण झाले आहे. परिणामी वाहनधारकांना अपघाताचा सामना करावा लागतो आहे. गेल्या वर्षभरापासून या समस्येची दखल घेण्यासाठी पाठपुरावा सुरू असतानाही प्रशासनाने अद्याप कोणतीही कार्यवाही केली नसल्याचे शेतकऱ्यांचे म्हणणे आहे. स्थानिक नागरिकांनी याबाबत तातडीने काटेरी झुडपे हटवण्याची मागणी केली असून, अपघात टाळण्यासाठी योग्य ती कारवाई लवकरात लवकर व्हावी, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.


### जाहीर नोटीस

**वि.०३ रे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. १८३१/२०२४ — प्रोसेस नं.१६३६३/२०२४
चौ.ता. १७/०७/२०२५ — दिनांक : १९/१०/२०२४

**अर्जदार :** १) दिक्षा शुध्दोधन शीरसाट पत्ता - रा. सांगळुद बु. अकोला ता. जी. अकोला २) रमाताई शुध्दोधन शिरसाट रा. सांगळुद बु. अकोला ता. जी. अकाला ३) सिदधार्थ शुधोधन शीरसाट रा. सांगळुद बु. अकोला ता. जी. अकोला ४) वच्छंला महादेव शिरसाट रा. सांगळुद अकोला ता. जी. अकोला ५) सुजाता सुरेश वानखडे रा. सांगळुद बु. अकोला ता. जी. अकोला

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.

**मयताचा पत्ता :-** मयत : १. महादेव रूपाजी शिरसाट २. शुध्दोधन महादेव शिरसाट
**पत्ता :-** रा. सांगळुद बु., अकोला, ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत क. १. महादेव रूपाजी शिरसाट यांचे दि. १२/०१/२०२४ रोजी व मयत क. २. शुध्दोधन महादेव शिरसाट यांचे दि.१४/०८/२०२१ रोजी सांगळुद बु., अकोला, ता. जि. अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक १७/०७/२०२५ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दोष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक १९/१०/२०२४ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

**आदेशानुसार**
प्र. अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला



### जाहिरनामा

उपरोक्त विषयान्वये अर्जदार प्रमोद समाधान सांगाळे रा. जस्तगाव ता. तेल्हारा यांचा अर्ज या कार्यालयास प्राप्त असुन त्यानुसार मौजे जस्तगाव ता तेल्हारा येथील शेल स.क्र. १२९ क्षेत्र ०.९४ है. आर या शेताचे इतर अधिकार सदरी नमुद कुळाचा बोजा कमी करणेबाबत विनंती केली आहे.

त्याअनुषंगाने, अर्जदार प्रमोद समाधान सांगाळे रा. जस्तगाव ता. तेल्हारा यांचे अर्जानुसार अर्जदार यांचे मौजे जस्तगाव ता. तेल्हारा येथील शेल स.क्र. १२९ क्षेत्र ०.९४ हे. आर या शेतीचे ७/१२ अभिलेखामध्ये नमुद कुळाचा बोजा कमी करणेसंदर्भात तथापि, याबाबतीत कोणाचा काही आक्षेप अथवा हितसंबंध असल्यास त्यांनी दि. २२.०७.२०२५ चे आत आपले लेखी स्वरूपातील म्हणणे या कार्यालयास सादर करावे. उक्त नमुद कालावधीनंतर प्राप्त हरकती / आक्षेपांचा विचार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी.

स्थळः तेल्हारा
दिनांकः ०४/०७/२०२५

**तहसिलदार,**
**तेल्हारा**



### चौकशीची जाहिर नोटीस

**सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, अकोला विभाग अकोला**

अर्ज क्रमांक ६९/२०२५ कलम १९

**सार्वजनिक न्यासाचे नाव व नोंदणी क्रमांक :** श्री.शीव शक्ती मंदीर संस्थान, ट्रस्ट,ता. बार्शीटाकळी, जि अकोला

**अर्जदार :** श्री. चेतन प्रभाकर चव्हाण

सर्व संबंधित लोकांस या जाहिर नोटिसीने कळविण्यांत येते की, सहाय्यक धर्मादाय आयुक्त अकोला विभाग अकाला हे वर नमुद केलेल्याअर्ज यासंबंधी मुंबई सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था अधिनियम १९५० चे कलम २२/१९ अन्वये खालील मुद्यावर चौकशी करणार आहेत.

१) वर नमुद केलेला न्यास अस्तित्वात आहे काय ? आणि सदरचा न्यास सार्वजनिक स्वरुपाचा आहे काय? २) खाली निर्दिष्ट केलेली मिळकत सदरन्यासाच्या मालकीची आहे काय ?

अ) जंगम मिळकत (वर्णन) :- काही नाही

आ) स्थावर मिळकत (वर्णन ) :- काही नाही

सदरच्या चौकशी प्रकरणामध्ये कोणासकाही हरकत घ्यावयाची असेलअगर पुरावा देणेचा असेल त्यांनी त्यांची केलेली कैफियत ही नोटिस प्रसिध्द झाल्यातारखे पासून तीस दिवसाचे आत या कार्यालयाचे वरील पत्तयावर मिळेल अशा रितीने पाठविणे. नंतर आलेल्या कैफियतीचा विचार केला जाणार नाही. तसेच वरिल मुदतीत कैफियत न आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही असे समजून चौकशी पुरि केली जाईल व अर्जाचे निकालाबाबत योग्य ते आदेश दिले जातील. ही नोटिस माझे सही निशी व मा. सहाय्यक धर्मादाय आयुक्त - १, अकोला यांच्या शिक्कयानीशी आज दिनांक २६ / ०६ / २०२५ रोजी दिली.

शिक्का


**अधिक्षक**
सार्वजनिक न्यास नोंदणी
कार्यालय, अकोला विभाग अकोला


# जल जीवन मिशन योजनेचे काम अर्धवट!

## सावरगावच्या उपसरपंच, सदस्यांची तक्रार धुळखात

■ प्रतिनिधी | पातूर ■

तालुक्यातील अतिदुर्गम भागात असलेल्या सावरगाव येथे पाणीटंचाईवर मात करण्यासाठी शासनाच्या जल जीवन मिशन योजनेअंतर्गत कोट्यवधी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला. मात्र गेल्या अनेक महिन्यांपासून या योजनेतील पाण्याच्या टाकीचे काम अर्धवट असून, तेथे जलपुरवठा सुरू झालेला नाही.



'दोन जून रोजी लेखी तक्रार दिली तरी कुठलीही दखल नाही. सावरगावमधील जल जीवन मिशन योजनेचे काम थंड बस्त्यात गेले आहे. त्वरित काम सुरू करण्यात यावे.'

**- संतोष चंदनसे,**
उपसरपंच, सावरगाव

--------------

'गत उन्हाळ्यात ग्रामस्थांना पाण्याची मोठी झळ सोसावी लागली. योजना मंजूर झाली पण काम अर्धवट आहे. ग्रामस्थांना काहीच फायदा झाला नाही. काम त्वरित सुरू करावे.'

**-जानू राठोड,**
ग्रामपंचायत सदस्य, सावरगाव

ग्रामपंचायत उपसरपंच संतोष चंदनसे आणि सदस्य जाणू राठोड यांनी २ जून रोजी अधिकृत तक्रार करून काम लवकर सुरू करावे अशी मागणी केली होती. मात्र एक महिना उलटूनही कोणतीही कारवाई न झाल्याने ग्रामस्थांमध्ये संतापाचे वातावरण आहे.

या योजनेत मंजुरीचे काम अतिशय घाईगडबडीत झाल्याचा आरोप करताना, जलकुंभाचे काम प्रत्यक्षात पूर्ण न होता निधीचा अपव्यय झाला असल्याचे दिसते. गावात पाण्याची तीव्र गरज असतानाही अजूनही नळातून पाणी मिळणे दूरच, जलकुंभाचा घसा कोरडाच आहे.

या पार्श्वभूमीवर उपसरपंच चंदनसे आणि सदस्य राठोड यांनी ३० जून रोजी जिल्हाधिकारी, पातुरचे तहसीलदार, गटविकास अधिकारी, जिल्हा परिषद अभियंता आणि बाळापूरच्या पाणी पुरवठा विभागाला स्मरणपत्र देऊन योजनेचे रखडलेले काम त्वरित पूर्ण करण्याची मागणी केली.

**फलक लावण्याचा विसर, अधिकारी फिरकेना ! :** सावरगाव सारख्या दुर्गम गावासाठी कोट्यवधी रुपयांची योजना मंजूर झाली तरी कामाचा कोणताही फलक लावलेला नाही. कंत्राटदार आणि संबंधित अधिकारी यांची मनमानी सुरू असून, वरिष्ठ अधिकाऱ्यांचे लक्ष या दिशेने वेधण्याची गरज असल्याचे ग्रामस्थांचे म्हणणे आहे.

विशेष म्हणजे, कामाची स्थिती पाहायला कोणतेही अधिकारी गावात फिरकलेले नाहीत.


जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी -५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून बी-२४ दोरकर हाऊस, महसुल कॉलनी, एसटी स्टॅण्डच्या मागे अकोला - ४४४००१ येथे प्रकाशित केले.

**संपादक - प्रदीप देशपांडे**
संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)

**अकोला आवृत्ती वर्ष - २९ अंक २२०**
आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/1997/04048 पोस्टल लायसन क्र. AKL/HO/03/2004

**मुख्य कार्यालय :–** अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००,९४२२९५६२६८
ई-मेल - atimadhyam@gmail. com, abhiram.deshpande70@gmail.com

# नागपूरच्या विद्यार्थ्यांनी सिरिंजपासून बनवले नेब्युलायझर

**वर्धा/ जनमाध्यम**

आपत्तीग्रस्त आणि दुर्गम भागातील रुग्णांना आता ऑक्सिजन मिळणे सोपे होईल. महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाने नागपूरच्या व्हीएनआयटीच्या विद्यार्थ्यांच्या मदतीने सिरिंजवर आधारित नेब्युलायझर विकसित केले आहे. या कमी किमतीच्या वैद्यकीय उपकरणाला विजेचीही गरज नाही. नागपूरचे विश्वेश्वरय्या नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजीच्या सहकायनि हे संशोधन केले आहे.

वीएनआयटी, नागपूर दरवर्षी वैद्यकीय विद्यार्थ्यांसाठी उन्हाळी इंटर्नशिप कार्यक्रम आयोजित करते. यंदाच्या वर्षी महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाचे एमबीबीएसचे तिसऱ्या वर्षातील विद्यार्थी शुभदा पाकडे आणि तनिष्क भुजाडे यांनी या इंटर्नशिप अंतर्गत हा सिरींजवर आधारित नेब्युलायझर विकसित केला आहे. या विद्यार्थ्यांनी डॉ. सतीश देवपुजारी आणि डॉ. रश्मी उद्दनवाडीकर यांच्या मार्गदर्शनाखाली हे संशोधन केले. हे उपकरण वापरण्यासाठी विजेची गरज भासत नाही. प्रत्यक्ष अडचणीच्या ठिकाणी आणि कमी खर्चात हे उपकरण सहज वापरता येऊ शकते.



### विजेची गरज नाही

त्यातून श्वसनासाठी आवश्यक असणारे औषध या नेब्युलायझरद्वारे पोहोचवता येणार आहे. आपत्तीग्रस्त भागांमध्ये अनेकदा वीज उपलब्ध राहत नाही. या आपत्तीत सापडलेल्या लोकांना प्राणवायूची गरज भासू शकते. अशा परिस्थितीत हे अत्यंत साधे वैद्यकीय उपकरण लोकांचे जीव वाचवू शकते.



### असे आहे उपकरण ?

विद्यार्थ्यांनी विकसित केलेल्या या उपकरणात केवळ एक साधी सिरींज, सुई आणि हवेचे इनलेट वापरून नेब्युलायझरसारख्या एरोसोल कणांची निर्मिती केली जाते. हे उपकरण कमी खर्चाचे, निर्जंतुकीकरण करण्यायोग्य आणि सहज उपलब्ध होणाऱ्या रुग्णालयीन साहित्यांपासून तयार केले जाऊ शकते.

त्यामुळे ते पूरग्रस्त भाग, संघर्षप्रवण भाग तसेच ग्रामीण आरोग्य सेवांमध्ये अत्यंत उपयुक्त ठरणार असल्याचा दावा संशोधकांनी केला आहे. या उपकरणाच्या ड्रॉपलेट साइझचे विश्लेषण व तांत्रिक परीक्षण तपासण्याचे काम डॉ. रश्मी उद्दनवाडीकर, डॉ. सुशांत नायक आणि ज्योती ठाकूर यांनी केले आहे.

# गुजरातच्या गिरणारच्या सफारीला हिंगणघाटचे दीपक माडे रवाना

**हिंगणघाट/ जनमाध्यम**

जगावेगळे रसायन चा फॉर्मुला या शहरात बघावयास मिळतो.सुत्रसंचालन असो, वक्तृत्व कला असो, दिलदारपणा असो, हजरजबाबी असो, संकटसमयी धावून जाण्याची वृत्ती असो हिंगणघाट शहरात एक नाव सर्वांच्या तोंडी हमखासपणे येते ते म्हणजे येथील माजी नगरसेवक व सामाजिक कार्यकर्ता दिपक माडे.



गेल्या दहा वर्षापासून बुलेट (मोटरसायकल) ने दरवर्षी एका सहलीला जातात ते सुद्धा एकटेच. आतापर्यंत दिपक माडे यांनी रामेश्वरम, उज्जैन व इतर ब-याच तिर्थक्षेत्राला एकट्याच धाडसी प्रवास यशस्वीपणे केला आहे. भारत देशातील विविध रंगी संस्कृती, परंपरा, आचार विचार, संवाद व जनसमुदायाला जवळुन बघण्याचा व अनुभवण्याचा आनंद घेतला आहे. पाणी असो की ऊन असो कसल्याही गोष्टीची परवा न करता हा अवलिया आपल्या इच्छाशक्तीने प्रत्येक वर्षी हे धाडस करत आहे. वयाच्या ५० च्या वर असलेले दीपक माडे याने या आपल्या अनोख्या छंदाने युवा पिढीला सुद्धा लाजविले आहे. माणसाच्या मनात इच्छाशक्तीचा भर असला तर तो निश्चितपणे समाजासाठी एक आदर्श व एक आगळावेगळा प्रकार करून दाखवतो त्यास त्याच क्रमात दीपक माडेचा हा प्रयोग संपूर्ण शहरासह तालुक्यात सुद्धा हा जनतेमध्ये रुजविला गेला आहे.

यावर्षी गुजरात येथील गिरणार पर्वत, भारतातील एकमेव सिंहाचे गीर अभयारण्य, श्री स्वामी दत्ताचे मंदिर व जैन मंदिर यांचे दर्शन अकरा हजार पायरी चढत घेण्याचा निर्णय केलेला आहे.

त्यांच्या या अगम्य इच्छाशक्तीला आणि आसेतु जम्मू-काश्मीर ते कन्याकुमारी तसेच सोमनाथ ते जगन्नाथ पुरी या आसेतु भारत भ्रमणाच्या निश्चल दृढ संकल्पाला आणि सुखरूप व आनंदी प्रवासाला निरोप देण्यासाठी मोहता चौक येथे एक लहानशा कार्यक्रमांमध्ये हितचिंतकांनी पुष्पगुच्छ हार व शाल श्रीफळ देऊन दीपकला त्याचा प्रवास सुखरूप व यशस्वी होऊ याकरिता आपल्या असंख्य शुभेच्छा दिल्या आहे. २० ते २५ दिवसाचा तो एकटा हा प्रवास करून आपला लक्ष गाठेल.

# म्हणून विषमुक्त शेतीसाठी एकत्रित यावे- पद्मश्री राहीबाई पोपेरे



**वर्धा/जनमाध्यम**

'मी अडाणी बाई, पण मला इतकं कळतं की, मातीला जपलं तर माती तुम्हाला जगवते. म्हणून विषमुक्त शेतीसाठी सारे एकत्र येऊन काम करत राहायला पाहिजे. कॅन बायोसिसचे हे उत्पादन आधुनिक शेती करायला खरचं उपयुक्त आहेत.' असे मत पद्मश्री बिजमाता राहीबाई पोपरे यांनी व्यक्त केले. कृषी क्षेत्रातील कॅन बायोसिसच्या इम्पोर्टेड वॉटर सोल्युबल रोफा तसेच नीम प्रणालीतील विविध १५ उत्पादनांचे लोकार्पण करण्यात आले त्यावेळी त्या बोलत होत्या. तसेच यावेळी त्यांनी आपल्या मनोगतातून मातीचे स्वास्थ्य व आधुनिक शेती तंत्रज्ञानाची ओळख उद्याच्या भविष्याला करून दिली.

यावेळी अ‍ॅग्रोवनचे संपादक व संचालक आदिनाथ चव्हाण, फार्म डीएसएस अ‍ॅग्रीटेक प्रा. लि. संस्थापक डाळिंबरत्न, बाबासाहेब गोरे, पुण्याचे प्रिंसिपल सायंटीस्ट डॉ. सुजॉय साहा, डी सँगोजचे मुख्य समुह माहिती अधिकारी जेफ फ्रान्को आदी मान्यवर उपस्थित होते

याप्रसंगी बोलतांना कंपनीच्या व्यवस्थापकीय संचालीका संदीपा कानिटकर म्हणाल्या, 'रोफा म्हणजे रिअल ऑप्टिमाईज्ड फर्टिलायझर अप्लिकेशन असलं तरी, माझ्यासाठी आर म्हणजे शेतकऱ्यांचा रिस्पेक्ट (आदर) आहे.' रोफा हे फ्रान्स मधील तंत्रज्ञान भारतात उपलब्ध करून देण्यासाठी कॅन बायोसिसने डी सँगोज कंपनी सोबत करार केला असून या श्रेणीतील १२ उत्पादने पूर्णतः पाण्यात विरघळणारी, सर्व फळबागा व भाजीपाला पिकांसाठी कुठल्याही हवामानात प्रभावी आहेत. नीम श्रेणीतील सर्व गुणवत्तापूर्ण उत्पादने विषमुक्त कृषी क्षेत्रात क्रांती आणणारी आहेत. त्यामुळे कॅन बायोसिसने आता जगाला शाश्वत शेतीचा खात्रीशीर पर्याय उपलब्ध करून दिला असल्याची भावना मंचावरील उपस्थित तज्ज्ञांनी व्यक्त केली.

# रसुलाबाद गावाला विभागीय कृषी सहसंचालक यांची भेट

## शेतकरी यांच्या सोबत साधला संवाद



**रसुलाबाद / जनमाध्यम**

विभागीय कृषी सहसंचालक, नागपूर विभाग नागपूर यांनी रसुलाबाद येथे सकाळी ८ वाजता शेतकऱ्यांना भेट दिली. फळबाग लागवड, रेशीम उद्योग आणि भविष्यातील शेती कशी राहील याबाबत मार्गर्शन केले. आणि शेतकऱ्यांना आवाहन केले की, फळबाग, रेशीम उद्योग हे भविष्यात चांगला नफा कमावून देऊ शकतात त्यामुळे शेतकऱ्यांनी फळबाग व रेशीम शेती कडे एक नवीन व शास्वत पैसा मिळून देण्याचे साधन आहे. तसेच कमी कालावधीत जास्त नफा या उद्योग मधून मिळू शकतो. शेतकऱ्यांनी नवीन तंत्रज्ञान अवगत करावे व सध्याच्या बाजार पेठेची मागणी ओळखून शेती करावी असे विभागीय कृषी सहसंचालक उमेश घाटगे यांनी शेतकऱ्यांना सांगितले. सोबत उपविभागीय कृषी अधिकारी रमाकांत कांबळे, तालुका कृषी अधिकारी रवींद्र उघाडे, उप कृषी अधिकारी पंकज लांडे, उपकृषी अधिकारी दिनेश सवळे, सहाय्यक कृषी अधिकारी श्री. खोंडे, मंगेश ठाकरे, निलेश गंध्रे, संदीप नथिले, महेश राघटाटे, शेफिकुर रहमान मोहम्मद बशीर, अजय आसोले, अक्षय बीजवे, इत्यादी शेतकरी उपस्थित होते.

# तलवारीने ऑटोरिक्षावर वार

**वर्धा :** पैसे देण्यास नकार दिल्याने चक्क तलवारीने ऑटोरिक्षावर वार करून वाहनाचे नुकसान करण्यात आले. ही घटना शहरातील आनंदनगर परिसरात घडली. याप्रकरणी वर्धा शहर पोलीस ठाण्यात अनुराग कैलासकर रा. आनंदनगर याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.स्थानिक आनंदनगर येथील रहिवासी मनोज गोपालराव ब्राह्मणे हे उदरनिर्वाहासाठी ऑटोरिक्षा चालवतात. त्यांच्या घराशेजारीच अनुराग कैलासकर हा राहतो. अनुराग हा मनोज यांच्या घरी आला. त्याने पैशाची मागणी केली. आता पैसे नाही असे मनोज याने अनुराग याला सांगितले. त्यानंतर तो तेथून निघून गेला. नंतर त्याने मनोज यांच्या ऑटोरिक्षावर तलवारीने वार करून वाहनाचे मोठे नुकसान केल्याचे तक्रारीत नमुद असल्याचे पोलिसांनी सांगितले.

# अज्ञाताने तोडले शाळेचे गेट; कारवाईची मागणी

**विरुळ (आ)** -गावाची शाळा ही आपले घर असते..जशी आपण घराची काळजी घेतो असेच शाळेचे शिक्षक शाळांची काळजी घेतात. येथील शिक्षकांच्या प्रयत्नातुन बाजार चौक येथील कन्या शाळा डीजीटल बनली शाळेचे रूपडे बदलले. शाळेला नवीन गेट लावण्यात आले परंतु गुरुवारच्या रात्री अज्ञात समाजकंटकांनी या शाळेचे गेट तोडल्याने शाळेचा परिसर उघड्यावर पडला आहे. जिल्हा परिषद शाळा संदर्भात शासनाच्या विविध योजना आहे. शासन करोडो रुपये खर्च करून प्रत्येक गावातील शाळा स्मार्ट करण्याच्या प्रयत्नात असुन काही समाजकंटकांनी शाळेचा गेट तोडल्याने सर्वत्र नाराजी व्यक्त होत आहे. ऐवढेच नाही तर काही मद्यशौकीन रात्रीच्या वेळेस दारू ढोसुन शाळेच्या आवारात दारूच्या शिश्या फेकत असुन शाळेच्या आवारात घाण करतात सर्वत्र खाजगी शाळेंचा सुळसुळाट असतांना मात्र या शाळेची पटसंख्या अधीक आहे, नुकताच या शाळेला शासनातर्फे पुरस्कार देऊन येथील शिक्षकांना सन्मानित करण्यात आले. परंतु काही समाजकंटक अशा पद्धतीचे वर्तन करून शाळेची शांतता भंग करीत आहे. पुलगाव येथील नवनियुक्त ठाणेदार यांनी याकडे गांभीर्याने लक्ष देऊन अशा समांज कटंकावर कारवाई करण्याची मागणी ग्रामस्थांनी केली आहे.



# आरोग्यासाठी हानिकारक ठरणाऱ्या प्लास्टिकचा सर्रास वापर

**आष्टी/ जनमाध्यम**

आजच्या धावपळीच्या व धकाधकीच्या युगात आपण सोयी सुविधेला अधिक महत्त्व देत आहोत त्यामुळे अशा काही गोष्टी आहेत की त्या आपल्या जीवनाचा अविभाज्य घटक बनल्या आहेत आरोग्यासाठी अपायकारक ठरणाऱ्या गोष्टींना देखील आपण जवळ केलेले दिसून येत आहे आज सर्वत्र स्वयंपाक घरात वापरण्यात येणारे प्लास्टिकचे डबे हे प्रकृतीला हानिकारक असल्याचे माहित असतानाही आपण त्याशिवाय राहू शकत नाही प्लास्टिकचा आपण बिनधास्तपणे वापर करत आहोत त्यामुळे आरोग्य तज्ञांच्या मते आपल्या शरीराला अपायकारक ठरणाऱ्या प्लास्टिकचा वापर कसा व किती करावा याबद्दल माहिती असणे गरजेचे आहे,



आरोग्य तज्ञांच्या मते प्लास्टिक मध्ये कधीही अन्न गरम करू नये आज अनेक घरात मायक्रोवेव्हमध्ये वरण-भात तसेच भाजी गरम करताना दिसून येते हॉटेलमध्ये गरमागरम असणारे जेवण हे बहुतांश वेळा मायक्रोवेव मध्येच केलेले असते मात्र प्लास्टिक मध्ये धोकादाय केमिकल असतात आणि ते गरम केल्याने त्यात मिसळतात प्लास्टिकच्या भांड्यात किंवा डब्यात अन्नपदार्थ गरम केल्याने आहारात अनेक प्रकारचे टॉक्सिक तत्वे देखील मिसळलेले जातात त्याचप्रमाणे प्लास्टिक डब्यांना फ्रिज पासून दूर ठेवायला हवेत या प्लास्टिकच्या डब्यावर फ्रिजर सेफ लिहिलेले असेल तेच डबे फ्रीजमध्ये ठेवावे कारण फ्रिजमध्ये असलेल्या तापमानाचा प्लास्टिक वर परिणाम होतो आरोग्य तज्ञांच्या मते गोल डब्यांच्या तुलने चौकोनी किंवा आयताकार डब्याचा चांगला वापर करता येतो त्यामुळे चौकोनी डब्याचा वापर करणे चुकीचे आहे असे आरोग्य तज्ञ सांगतात आरोग्य तज्ञांच्या मते मायक्रोवेव्हमध्ये डबे ठेवण्यापूर्वी डब्याचे झाकण थोडेसे उघडा जेणेकरून आतील वाफ बाहेर सहजपणे पडू शकेल प्लास्टिकच्या डब्यातून दुर्गंधी येणार नाही याची खबरदारी देखील घेणे गरजेचे आहे त्यामुळे प्लास्टिकच्या डब्यात दीर्घकाळ खाद्यपदार्थ ठेवू नयेत प्लास्टिकच्या डब्यावर असलेले डाग काढण्यासाठी क्लोरीन बीचचा वापर करावा असे आरोग्य तज्ञ सांगतात मात्र एकंदरी आरोग्य तज्ञांच्या मते शक्यतोवर किचनमध्ये स्वयंपाकासाठी प्लास्टिक डब्याचा वापर कधीही करू नये ते आरोग्यासाठी हानिकारक असतात या महत्त्वपूर्ण गोष्टी प्रत्येक गृहिणींनी लक्षात घ्यायला हव्या असे आरोग्य तज्ञ सांगतात.

# बारा वर्षापासून सुरू असलेली 'फलदायी' निसर्ग सेवा

**वर्धा / जनमाध्यम**

जिल्हा परिषद येथील शिक्षण विस्तार अधिकारी या पदावरून निवृत्त झालेले रामेश्वर वाघमारे यांनी मागील अकरा वर्षापासून सातत्याने सुरू असलेले फळझाडे वाटपाचे कार्य याही वर्षी नटाळा पुनर्वसन या परिसरात केले.

सेवानिवृत्तीनंतर त्यांनी मागील बारा वर्षापासून संगोपनाची हमी देणाऱ्या वृक्षप्रेमीस २१० वृक्ष वाटप केले.

सदर वृक्ष आपल्या अंगणात किंवा कुंपणाआड लावण्याच्या अटीवर देतात.त्यातून अनेक झाडांचे संगोपन होऊन गावातील लोकांना त्या फळांचा आस्वाद घेता येत आहे.

त्यांनी हा स्तुत उपक्रम त्यांचे मुळ गाव मिटनापुर येथुन सुरू केला, आजपर्यंत आसपासच्या ११ गावात हा उपक्रम राबविला आहे. त्यांची फळे आता गांवकरी चाखत आहेत. या कार्यक्रमात नटाला पुनर्वसनाच्या सरपंच वर्षा डेहनकर ग्रामपंचायत सदस्य ममता शिरसाट, मनिषा भोयर, कु.साक्षी मसने, शरद मसराम, सुधाकर दांदडे ग्रामपंचायत कर्मचारी प्रफुल बोरगे, शैलेश वाघाडे तसेच परिसरातील सरिता बावने, मोहनकर, राजु देशमुख, चंदू उपाध्याय, सारंग ठाकरे, बजरंग लाजूरकर आणि स्थानिक शाळा मुख्याध्यापिका माया खाडगी, शिक्षिका सुचिता वाघ आवर्जून उपस्थित होत्या. यात्रसंगी श्री संत गाडगेबाबा सेवा समितीचे कार्यकर्ते विठ्ठल लोणकर, अरूण भोवरे, रामेश्वर काळे, कृष्णराव क्षीरसागर, सुनिल भोवरे, एकनाथ ढगे, नामदेव क्षीरसागर उपस्थित होते.



# अनुसुचित जाती नवबौध्द घटकातील लाभार्थ्यांसाठी 'स्टँड अप इंडिया' योजना

## १ लाख २५ हजार उद्योजक निर्माण करण्याचे उद्दिष्ट; १५ टक्के मिळणार सबसिडी

**वर्धा /जनमाध्यम**

केद्र शासनाच्यावतीने स्टँड अप योजनेंतर्गत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १२५ व्या जयंती वर्षानिमित्त अनुसुचित जाती, जमातीचे १ लाख २५ नवउद्योजक व महिला उद्योजिका निर्माण करण्यासाठी मार्जिन मनी उपलब्ध करुन देण्यात येणार आहे.

या योजनेंचा अनुसुचित जाती व नवबौध्द घटकांतील उद्योजकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे १२५ वे जयंती वर्ष भारत सरकार आणि महाराष्ट्र शासन मोठ्या प्रमाणात साजरे करीत आसतांना यामध्ये केंद्र शासनाने २०१५ मध्ये स्टैंड अप इंडीया ही योजना घोषीत केली आहे. या योजनेंतर्गत १ लाख २५ हजार अनु. जाती / जमातीचे उदयोजक आणि १ लाख २५ हजार महिला उद्योजीका निर्माण करावयाचे उदिष्ट केंद्र शासनाने ठरवलेले आहे.

देशातील २७ सरकारी बँकांच्या १ लाख २५ हजार शाखांच्या माध्यमातुन १ लाख २५ हजार अनु. जाती/जमातीचे उदयोजक आणि १ लाख २५ हजार महिला उदयोजीका बनविण्याची जबाबदारी प्रत्येक बँकेच्या शाखेवर सोपविण्यात आली आहे. यासाठी केंद्र शासनाने १० हजार कोटीची तरतुद केली असुन सदर रक्कम सिडबी कडे वर्ग करण्यात आली आहे. सिडबीने या रक्कमेचा सुरक्षा हमी कवच तयार केला असुन लाभार्थ्यांना जे कर्ज दिले जाईल त्याला सबसिडी हमी देईल.

केंद्र शासनाच्या स्टँडअप इंडीया या योजने अंतर्गत सबंधीत लाभार्थी यांनी त्यांचा स्व हिस्सा म्हणुन एकुण प्रकल्प किमतीच्या २५ टक्के रक्कम द्यावयाची आहे. योजने अंतर्गत महाराष्ट्र राज्याच्या अनुसुचित जातीसाठीच्या सवलती घेण्यास पात्र असलेल्या अनु. जाती व नवबौध्द घटकांतील नवउद्योजक लाभार्थ्यांची मार्जीन मनी भरण्याची क्षमता नसल्यामुळे या नवउद्योजक लाभार्थ्यांना एकुन प्रकल्प किमतीच्या लाभार्थी यांच्या हिस्यातील २५ टक्के मधील जास्तीत जास्त १५ टक्के मार्जीन मनी उपलब्ध करुन देण्यास मान्यता देण्यात आली आहे.

या योजने अंतर्गत महाराष्ट्र राज्यातील अनुसुचित जातीच्या सवलती घेण्यास पात्र आलेल्या अनुसुचित जाती व नवबौध्द घटकांतील नवउद्योजक यांना १० टक्के हिस्सा भरणा केल्यानंतर व बँकेने अर्जदारास स्टैंड अप इंडीया या योजनेंतर्गत ७५ टक्के कर्ज मंजुर केल्यानंतर उर्वरीत १५ टक्के सबसीडी राज्य शासना मार्फत देण्यात येणार आहे.

सदर योजनेअंतर्गत पात्र ठरलेल्या राज्यातील अनु. जाती व नवबौध्द घटकातील सवलतीस पात्र लाभार्थ्यांना देण्यात येईल. सबंधीत लाभार्थ्यांनी आयुक्त समाज कल्याण पुणे यांच्या नावे अनुदानासाठी मागणी पत्र शासन निर्णय ८ मार्च २०१९, ०९ डिंसे २०२० नुसार परिशिष्ट अ मध्ये विहीत केलेल्या विवरण पत्रात तीन प्रतीत सादर करणे आवश्यक आहे.

प्रस्तावासोबत उद्योग आधार नोंदणी पत्र आणि जात प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे. बँकेचे कर्ज मंजूरी पत्र आयुक्त, समाज कल्याण पुणे यांना सादर करणे आवश्यक आहे.

प्रस्ताव मंजूर झाल्यानंतर सदरची सबसीडी आयुक्त, समाज कल्याण आयुक्तालय, म.रा. पुणे यांच्याकडून ७ दिवसाच्या आत लाभार्थ्यांच्या खात्यामध्ये NEFT/RTGS च्या माध्यमातून जमा करण्यात येईल. सहाय्यक आयुक्त समाज कल्याण यांनी कळविले आहे.

जनमाध्यम

जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्यो मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं.बी.-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, हवालदारपुरा, वर्धा-४४२२२१ येथे प्रकाशित केले.

**संपादक - प्रदीप देशपांडे**

**संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे**

(Responsible for selection of News Under PRB Act)

**वर्धा आवृत्ती वर्ष** - १३अंक २२०

आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/२०१३/५१०९३


**मुख्य कार्यालय :—** अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती-४४४६०१

फोन - ९८२३०१६३००,९४२२९५६२६८

**ई-मेल**-atimadhyam@gmail.com,
abhiramdeshpande@gmail.com

# ‘सफाई अपनाओ, बिमारी भगाओ’ अभियानांतर्गत

## वृक्षारोपण व स्वच्छता जनजागृती कार्यक्रम उत्साहात संपन्न





**अमरावती -** केंद्र सरकारच्या ‘सफाई अपनाओ, बिमारी भगाओ’ या अभियानाच्या पार्श्वभूमीवर आज उत्तर झोन क्र. १ अंतर्गत रामपुरी कॅम्प प्रभाग क्र. ३ नवसारी येथे वृक्षारोपण व स्वच्छता जनजागृती कार्यक्रम उत्साहात पार पडला. हा कार्यक्रम अमरावती महानगरपालिका स्वच्छ भारत अभियान, महेंद्र कॉलनी संचालित अहिल्या महिला आरोग्य समिती, अंकुर होलीनेस फाउंडेशन, आणि विद्याभारती महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आला. कार्यक्रमाची सुरुवात मनपा शाळा क्र. १८ मधील विद्यार्थ्यांसोबत ‘स्वच्छ हात’ या विषयावर सादरीकरणाने झाली. विद्यार्थ्यांमध्ये स्वच्छतेबाबत जागरूकता निर्माण करत त्यांना योग्य सवयी अंगीकारण्याचे महत्त्व सांगण्यात आले. यानंतर शहरी आरोग्य केंद्र, महेंद्र कॉलनी येथे वृक्षारोपण व वृक्षवाटप कार्यक्रम पार पडला. यावेळी अमरावती महानगरपालिकेच्या सन्माननीय अतिरिक्त आयुक्त सौ. शिल्पा नाईक प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होत्या. त्यांचे वृक्ष देऊन स्वागत करण्यात आले. त्यांनी स्वतः वृक्षारोपण करून कार्यक्रमाची सुरुवात केली आणि विद्यार्थ्यांना आपल्या हस्ते वृक्ष वाटप केले.

आपल्या मार्गदर्शनपर भाषणात त्यांनी सांगितले, ‘वृक्षारोपण व संवर्धन ही काळाची गरज आहे. पर्यावरण रक्षणासाठी प्रत्येकाने एक झाड लावून त्याचे संगोपन करणे आवश्यक आहे. तसेच आशा वर्कर्सनी घरोघरी जाऊन स्वच्छतेविषयी जनजागृती करावी.’ या उपक्रमात सहायक आयुक्त नंदकिशोर तिखीले, शहर समन्वयक श्वेता बोके, जेष्ठ स्वास्थ निरीक्षक राजू डिक्याव, ॲड. नीलिमा भूत (अध्यक्ष, अंकुर होलीनेस फाउंडेशन), प्राचार्य प्रा. प्रज्ञा येनकर (विद्याभारती महाविद्यालय), डॉ. पी. जे. बनसोड, एच. डी. डॉ. मुंदडा यांच्यासह अनेक मान्यवर आणि सामाजिक संस्थांचे प्रतिनिधी, शिक्षक, प्राध्यापक, आरोग्य सेवक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

अहिल्या महिला आरोग्य समितीच्या सचिव संध्या पाटील, आरोग्य सेविका वैशाली सुरोशे, प्रवीण आठवले, निलेश गाडे, सौरभ शेंद्रे, डॉ. मोनाली संदीप, प्रा. आर. जे. गजबे (ऱ्ण), तसेच शाळेतील शिक्षक, विद्यार्थी, आशा वर्कर्स, स्वच्छता निरीक्षक, आणि स्थानिक नागरिकांनी या उपक्रमात उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. या उपक्रमाचा उद्देश विद्यार्थ्यांमध्ये स्वच्छतेबाबत जागरूकता निर्माण करणे, पर्यावरणसंवर्धनासाठी वृक्षारोपणाला चालना देणे, आणि ‘सफाई अपनाओ, बिमारी भगाओ’ या राष्ट्रीय अभियानाची प्रभावी अंमलबजावणी स्थानिक पातळीवर सुनिश्चित करणे हा होता.

---

### विद्यमान दिवाणी न्यायाधिश, साहेब क. स्तर, मोर्शी

किरकोळ अर्ज क्र.३६६/२०२५
पुढील ता.२४.०७.२०२५

**जाहीरनामा/सायटेशन**

**अर्जदार :** १) श्रीमती अनिता प्रेमदास नन्नावरे, वय ६५ वर्ष, व्यवसाय-घरकाम
२) श्री. संघपाल प्रेमदास नन्नावरे, वय-२९ वर्ष, व्यवसाय-मजुरी दोघेही रा.चिंचोलीगवळी, ता. मोर्शी, जि. अमरावती.
३) सौ. संगीता अमोल संगोलकर, वय-२६ वर्ष, व्यवसाय-घरकाम रा.न्यु अंबेडकर नगर, वार्ड नं.८० महाबली नगर कोलार रोड हुजूर भोपाल, ता.जि.भोपाल (मध्यप्रदेश)

-- विरुध्द --

**गैरअर्जदार :** Nil

वरील सर्व अर्जदारांनी विद्यमान दिवाणी न्यायाधिश साहेब, (कनिष्ठ स्तर) मोर्शी यांचे न्यायालयांत वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत सेक्शन २, बॉम्बे रेग्युलेशन (८) १८२७ प्रमाणे प्रकरण दाखल केलेले आहे अर्जदाराप्रमाणे अर्जदार नं.१ चे पती तर अर्जदार नं.२ व ३ चे **वडील नामे प्रेमदास देवराव नन्नावरे** हे दिनांक १८/१०/२०२२ रोजी Chincholi Gavali, Tq. Morshi, Dist-Amravati येथे मय्यत झालेले आहे. त्यांचे मृत्युनंतर त्यांचे वारस हे वरीलप्रमाणे आहे तसेच मयताचे नांवे असलेल्या शासकिय व निमशासकिय अभिलेखांत नोंदी होण्याकरीता बारस प्रमाणपत्र मिळण्याकरीता सदर प्रकरण दाखल केलले आहे. मयताला वरील अर्जदाराशिवाय इतर कोणतेही वारस नाही तेव्हा या जाहिर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, जर कुणालाही सदर अर्जदारांचे प्रकरणांवर आक्षेप असेल तर त्यांनी सदर नोटीसच्या एका महिण्याचे आआंत विद्यमान न्यायालयांत आपला लेखी आक्षेप सादर करावा अस्था कोणालाही आक्षेप नाही असे समजुन पुढील कार्यवाही करण्यात येईल.

**दिनांक ३/०७/२०२५**

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय क.स्तर मोर्शी

---

### विद्यमान दिवाणी न्यायाधिश, साहेब क. स्तर, मोर्शी

किरकोळ अर्ज क्र.४१९/२०२५
पुढील ता.१४.०८.२०२५

**जाहीरनामा/सायटेशन**

**अर्जदार :** १) सौ. कुसूम प्रकाशराव बहाड, वय ६२ वर्ष, व्यवसाय-घरकाम रा. बुधवारा अमरावती, ता. जि. अमरावती.
२) अशोकराव महादेवराव खांडेकर मयताचे वारस
२अ) श्रीमती वंदना अशोकराव खांडेकर, वय-५६वर्ष, व्यवसाय- घरकाम
२ब) शुभम अशोकराव खांडेकर, वय-३० वर्ष, व्यवसाय-शेती दोघेही रा. तळेगांव, ता. मोर्शी, जि. अमरावती.
२क) सौ. दिपीका मुकेशराव नेरकर, वय-३४ वर्ष, व्यवसाय-घरकाम रा.पार्वतीनगर अमरावती, ता.जि. अमरावती.
३) कांता लक्ष्मणराव पाटणे मयताचे वारस
३अ) श्री. विनोद लक्ष्मणराव पाटणे, वय-५८ वर्ष, व्यवसाय-शेती
३ब) श्री. मंगेश लक्ष्मणराव पाटणे, वय-४६ वर्ष,व्यवसाय-शेती
३क) सौ. अर्चना अरविंद बहाड, वय ५० वर्ष, व्यवसाय-घरकाम सर्व रा.राजुरा बाजार, ता. वरूड, जि. अमरावती.
३ड) दिनेश लक्ष्मणराव पाटणे मयताचे वारस
३डअ) श्रीमती सुनिता दिनेशराव पाटणे, वय-४२ वर्ष, व्यवसाय-शेती
३डम) ईश्वरी दिनेशराव पाटणे, वय-१७ वर्ष,व्यवसाय-शिक्षण दोघीही रा. काटोल, ता. काटोल, जि. नागपूर.

-- विरुध्द --

**गैरअर्जदार :**Nil

वरील सर्व अर्जदारांनी विद्यमान दिवाणी न्यायाधिश साहेब, (कनिष्ठ स्तर) मोर्शी,यांचे न्यायालयांत वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत सेक्शन २. बॉम्बे रेग्युलेशन (८) १८२७ प्रमाणे प्रकरण दाखल केलेले आहे. अर्जदाराप्रमाणे अर्जदार क्र. १ ची आई तर अर्जदार क.२ (अ) ची सासु तर अर्जदार नं.२ (ब.क) तसेच अर्जदार नं.३ (अ.ब.क) यांची आजी तर अर्जदार नं.३ (डअ) ची आजीसासु तर अर्जदार नं.३ (डब) ची **पणआजी नामे शांताबाई महादेवराव खांडेकर** ही दिनांक ०९/०१/२०१६ रोजी तीचे राहते घरी तळेगांव दाभेरी, ता. मोर्शी, जि. अमरावती येथे मय्यत झालेली आहे. त्यांचे मृत्युनंतर त्यांचे वारस हे वरीलप्रमाणे आहे तसेच मयताचे नांवे असलेल्या शासकिय व निमशासकिय अभिलेखांत नोंदी होण्याकरीता वारस प्रमाणपत्र मिळण्याकरीता सदर प्रकरण दाखल केलले आहे. वरील मयतांना अर्जदारांशिवाय इतर कोणतेही वारस नाही तेव्हा या जाहिर नोटीसद्वारे कळविण्यांत येते की, जर कुणालाही सदर अर्जदारांचे प्रकरणांवर आक्षेप असेल तर त्यांनी सदर नोटीसच्या एका महिण्याचे आंत विद्यमान न्यायालयांत आपला लेखी आक्षेप सादर करावा अन्यथा कोणालाही आक्षेप नाही असे समजुन पुढील कार्यवाही करण्यांत येईल

**दिनांक ३/०७/२०२५**

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय क.स्तर मोर्शी

---

### विद्यमान सह दिवाणी न्यायाधिश तथा अती मुख्य दंडाधिकारी क्रं.२४ यांचे न्यायालय, अमरावती

**(ऑर्डर ५ रुल २० १ (अ) दिवाणी प्रक्रिया संहिता प्रमाणे )**

**कौ.हि.म.सं.का.दरखास्त अर्ज क्रं.५५/२०२४** **ने.ता.१९/७/२०२५.**

**अपिलार्थी :- पुष्पा @ धनश्री**
**विरुध्द**
**गैरअर्जदार :- मयुर**

प्रती,
गैरअर्जदार :- मयूर उमाशंकर मुळे
रा.गजानन महाराज मंदिराजवळ, महादेव खोरी,
अमरावती, ता.जि.अमरावती
दुसरा पत्ता- विठठल रुख्मिणी मंदिराजवळ,
मंगलधाम, अमरावती, ता.जि.अमरावती

अर्जदार हिने कौटूंबिक हिंसाचार कायद्याचे कलम ३१ सह कलम १२५ (२) १२८ फौजदारी प्रक्रिंया संहिता प्रमाणे अंतरीम खावटीची रक्कम वसूल करण्याकरिता विद्यमान न्यायालयात सदर प्रकरण गैरअर्जदाराविरुध्द दाखल केलेले आहे. त्याअर्थी गैरअर्जदार यांनी स्वतः हा किंवा अधिवक्ता मार्फत दि.१९/७/२०२५ रोजी उत्तर देण्याकरिता १०.०० सकाळी हजर राहावे. अन्यथा गैरअर्जदार यांच्या विरुध्द सदर प्रकरण एकतर्फी चालवून निकाल देण्यात येईल.

आज दिनांक ०४/०७/२०२५ रोजी माझ्या सहिने व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

दि.०४/०७/२०२५
ठिकाण :- अमरावती

शिक्का

**आदेशानुसार**
**सही/-**
**कनिष्ठ लिपिक**
**२४ वे दिवाणी व अती मुख्य दंडाधिकारी,अमरावती**

---

### विद्यमान दिवाणी न्यायाधिश, साहेब क. स्तर, मोर्शी

किरकोळ अर्ज क्र.३९१/२०२५
पुढील ता.४.०८.२०२५

**जाहीरनामा/सायटेशन**

**अर्जदार :** १) श्री. प्रकाश पंजाबराव निकम, वय-५४ वर्ष, व्यवसाय-शेती रा. तळणी, ता. मोर्शी, जि. अमरावती.
२) सौ. रजनी गजानन देशमुख, वय-५१ वर्ष, व्यवसाय-घरकाम रा. अमडापूर,पो. राजुरा बाजार, ता. वरूड, जि. अमरावती.

-- विरुध्द --

**गैरअर्जदार :** Nil

वरील सर्व अर्जदारांनी विद्यमान दिवाणी न्यायाधिश साहेब, (कनिष्ठ स्तर) मोर्शी यांचे न्यायालयांत वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत सेक्शन २, बॉम्बे रेग्युलेशन (८) १८२७ प्रमाणे प्रकरण दाखल केलेले आहे. अर्जदारांप्रमाणे अर्जदारांचे **वडील नामे पंजाब दौलतराव निकम** हे दिनांक २९/०४/२०२१ रोजी त्यांचे राहते घरी तळणी, ता.मोर्शी, जि. अमरावती येथे मरण पावलेले आहे तसेच अर्जदारांची आई नामे कमलाबाई पंजाबराव निकम ही दिनांक ०८/०८/२०११ रोजी तीचे राहते घरी तळणी, ता. मोर्शी, जि. अमरावती येथे मरण पावलेली आहे. त्यांचे मृत्युनंतर त्यांचे वारस हे वरीलप्रमाणे आहे. तसेच मयताचे नांवे असलेल्या शासकिय व निमशासकिय अभिलेखांत नोंदी होण्याकरीता वारस प्रमाणपत्र मिळण्याकरीता सदर प्रकरण दाखल केलले आहे. मयताला वरील अर्जदाराशिवाय ईतर कोणतेही वारस नाही तेव्हा या जाहिर नोटीसद्वारे कळविण्यांत येते की, जर कुणालाही सदर अर्जदाराचे प्रकरणांवर आक्षेप असेल तर त्यांनी सदर नोटीसच्या एका महिण्याचे आंत विद्यमान न्यायालयांत आपला लेखी आक्षेप सादर करावा अन्यथा कोणालाही आक्षेप नाही असे समजुन पुढील कार्यवाही करण्यात येईल.

**दिनांक ३/०७/२०२५**

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय क.स्तर मोर्शी

---

### विद्यमान दिवाणी न्यायाधिश, साहेब क. स्तर, मोर्शी

किरकोळ अर्ज क्र.४४०/२०२५
पुढील ता.७.०८.२०२५

**जाहीरनामा/सायटेशन**

**अर्जदार :** १) श्रीमती चंद्रभागा सदाशिवराव ठोंबरे, वय ७८ वर्ष, व्यवसाय-घरकाम
२) श्री. पुंडलिक सदाशिवराव ठोंबरे, वय ६२ वर्ष, व्यवसाय-शेती
३) श्री. नंदकिशोर सदाशिवराव ठोंबरे, वय ६० वर्ष, व्यवसाय-शेती सर्व रा. खानापूर, ता. मोर्शी, जि. अमरावती.
४) श्री. वासुदेव सदाशिवराव ठोंबरे, वय-५४ वर्ष,व्यवसाय-शेती रा. मोर्शी, ता. मोर्शी, जि. अमरावती.
५) सुमन पांडुरंग आंबेकर, वय-६४ वर्ष, व्यवसाय-घरकाम रा. गडीपूरा करजगांव, ता. चांदुर बाजार, जि. अमरावती.

-- विरुध्द --

**गैरअर्जदार :** Nil

वरील सर्व अर्जदारांनी विद्यमान दिवाणी न्यायाधिश साहेब (कनिष्ठ स्तर) मोर्शी यांचे न्यायालयांत वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत सेक्शन २, बॉम्बे रेग्युलेशन (८) १८२७ प्रमाणे प्रकरण दाखल केलेले आहे. अर्जदाराप्रमाणे अर्जदार क्र. १ चे पती तर अर्जदार क.२ ते ५ चे वडील नामे **सदाशिव तुळशीराम ठोंबरे** हे दिनांक २४/०९/२०१९ रोजी Khanapur, Tq.Morshi, Dist-Amravati येथे मय्यत झालेले आहे. त्यांचे मृत्युनंतर त्यांचे बारस हे वरीलप्रमाणे आहे तसेच मयताचे नांवे असलेल्या शासकिय व निमशासकिय अभिलेखांत नोंदी होण्याकरीता वारस प्रमाणपत्र मिळण्याकरीता सदर प्रकरण दाखल केलले आहे. मयताला वरील अर्जदारांशिवाय ईतर कोणतेही वारस नाही तेव्हा या जाहिर नोटीसद्वारे कळविण्यांत येते की, जर कुणालाही सदर अर्जदारांचे प्रकरणांवर आक्षेप असेल तर त्यांनी सदर नोटीसच्या एका महिण्याचे आत विद्यमान न्यायालयांत आपला लेखी आक्षेप सादर करावा से समजुन पुढील कार्यवाही करण्यांत येईल.

**दिनांक ३/०७/२०२५**

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय क.स्तर मोर्शी

---

### जाहिर नोटीस

**विद्यमान २ रे सह दिवाणी न्यायाधीश (क स्तर)**
**चांदूर बाजार, जि अमरावती**

आर.एम.जे.सी. क्र. ४१३/२०२५
ने.ता, ९/०८/२०२५

**अर्जदार :** १. नीलिमा नंदकुमार देशमुख, वय ६६ वर्षे, व्यवसाय - घरकाम
२. चैतन्य नंदकुमार देशमुख, वय ४० वर्षे, व्यवसाय - सर्व्हीस३. ईशान नंदकुमार देशमुख, वय ३६ वर्षे, व्यवसाय -सर्व्हीस सर्व रा. बेलोरा, ता. चांदुर बाजार जि. अमरावती,

**गैरअर्जदार :-निरंक**

**बॉम्बे रेग्यूलेशन ॲक्ट १८२७ चे कलम ८ प्रमाणे वारस प्रमाणपत्र मिळण्याबाबत**

अर्जदार वरील ठीकाणी राहतात. **मय्यत नंदकुमार काशीराव देशमुख** यांचा मृत्यु दि. ३०/०९/२०२४ रोजी रा. बेलोरा, ता. चांदुर बाजार जि. अमरावती येथे झालेला आहे. तसेच **मय्यत गयाबाई काशिराव देशमुख** यांचा मृत्यु दि. २८/११/२००८ रोजी रा. बेलोरा, ता. चांदुर बाजार जि. अमरावती येथे मरण पावले,यांच्या मृत्यूनंतर अर्जदार हेच त्यांचे कायदेशीर वारस आहेत, अर्जदाराव्यतीरिक्त इतर कोणीही कायदेशीर वारस नाहीत.अर्जदारांना मय्यताचे कायदेशीर वारस असल्याबाबत वारस प्रमाणपत्राची कार्यालयीन कामाकरीता आवश्यकता आहे. त्याकरीता विद्यमान दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) चांदुर बाजार येथील न्यायालयात **आर.एम.जे.सी.नं. ४१३/२०२५** नुसार अर्ज दाखल केला आहे.त्याअर्थी वारसाचे प्रमाणपत्र देण्याबाबत काही आक्षेप असल्यास वृत्तपत्रामध्ये जाहीरात प्रसिध्दी दिनांकापासून ३० दिवसांचे आत न्यायालयात आपला आक्षेप स्वतः किंवा वकीलामार्फत हजर राहून नोंदवावा त्यानंतर सदर कोर्टाकडून कोणत्याही आक्षेपाच अथवा व्यक्तीची दखल घेतल्या जाणार नाही व अर्जदारांना वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.आज दि. २७/०६/२०२५ रोजी माझ्या सही व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

शिक्का

आदेशानुसार,
**आदेशानुसार सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी व फौजदारी न्यायालय, चांदूरबाजार**

---

### दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर, अमरावती

**वि.श्री.एस.एस.बिंगरदेव ८ वे सह दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर, अमरावती यांचे न्यायालयात**

**किरकोळ अर्ज - १२०८/२०२५**
**श्री.मिलिंद विरुध्द निरंक**
**पुढील तारीख ०६.०८.२०२५**

**जाहीरनामा/सायटेशन**

**अर्जदार :** 1) **Milind Vasantrao Shirbhate**, Age 57 yrs., Occu.- Business
R/o. Dasara Maidan Road, Mahalaxmi Nagar,
Amravati, Tq. & Dist. Amravati

-- विरुध्द --

**गैरअर्जदार -** निरंक

सर्वत्र लोकास सुचित करण्यात येते की, **मयत योगिता मिलिंद शिरभाते** हया **दि.३१.०३.२०२५** रोजी नागपूर, ता.जि.नागपूर येथे मयत झाले. **अर्जदार मिर्लींद विरुध्द निरंक** यांनी वरीलप्रमाणे यांनी ह्या कोर्टात सदरहू मयत यांचे वारसांचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत **APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE** प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **श्री मिर्लींद विरुध्द निरंक** वरीलप्रमाणे सदरहू मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजविण्याचे असेल तर ह्या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने ह्या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि ह्या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास तर सदरहू कोर्ट सदरहू अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबित दिसल्यास त्यांना सदरहू **मयत** यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज **दिनांक ०२.०७.२०२५** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशान्वये,
**सहायक अधीक्षक,**
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अमरावती

---

### विद्यमान दिवाणी न्यायाधिश, साहेब क. स्तर, मोर्शी

किरकोळ अर्ज क्र.३८१/२०२५
पुढील ता.१०.०५.२०२५

**जाहीरनामा/सायटेशन**

**अर्जदार :** १) श्री दिनेश महादेवराव संभावीत, वय ५२ वर्ष, व्यवसाय-शेती
२) श्री. प्रशांत महादेवराव संभावीत, वय ४३ वर्ष, व्यवसाय-शेती दोघेही रा. अंबाडा, ता. मोर्शी, जि. अमरावती.३) सौ. माधुरी सुधिर याऊल, वय ४९ वर्ष,व्यवसाय-घरकाम रा. शिरजगांव कसबा, ता. चांदुर बाजार, जि. अमरावती.४) सौ. वनमाला प्रभाकरराव सुने, वय-४५ वर्ष, व्यवसाय-घरकाम रा.कु-हा, ता. तिवसा, जि. अमरावती.५) अर्चना प्रमोदराव अंबाडकर मयताचे वारस ५अ) कु.श्रावणी प्रमोदराव अंबाडकर, वय-१७ वर्ष, धंदा-शिक्षण
६) कु.ईश्वरी प्रमोदराव अंबाडकर, वय-१४ वर्ष, व्यवसाय-शिक्षण दोघीही रा.नांदगांव खंडेश्वर, ता. नांदगांव खंडेश्वर, जि. अमरावती.

-- विरुध्द --

**गैरअर्जदार :** Nil

वरील सर्व अर्जदारांनी विद्यमान दिवाणी न्यायाधिश साहेब, (कनिष्ठ स्तर) मोर्शी यांचे न्यायालयांत वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत सेक्शन २. बॉम्बे रेग्युलेशन (८) १८२७ प्रमाणे प्रकरण दाखल केलेले आहे. अर्जदाराप्रमाणे अर्जदार क्र. १ ते ४ ची आई अर्जदार नं.५ (अ.ब) ची **आजी नामे वच्छलाबाई महादेवराव संभावीत** ही दिनांक १७/०१/२०२२ रोजी तीचे राहते घरी अंबाडा, ता.मोर्शी, जि. अमरावती येथे मय्यत झालेली आहे. त्यांचे मृत्युनंतर त्यांचे वारस हे वरीलप्रमाणे आहे तसेच मयताचे नावे असलेल्या शासकिय व निमशासकिय अभिलेखांत नोंदी होण्याकरीता वारस प्रमाणपत्र मिळण्याकरीता सदर प्रकरण दाखल केलले आहे. वरील मयतांना अर्जदाराशिवाय इतर कोणतेही वारस नाही तेव्हा या जाहिर नोटीसद्वारे कळविण्यांत येते की, जर कुणालाही सदर अर्जदारांचे प्रकरणांवर आक्षेप असेल तर त्यांनी सदर नोटीसच्या एका महिण्याचे आंत विद्यमान न्यायालयांत, आपला लेखी आक्षेप सादर करावा अन्यथा कोणालाही आक्षेप नाही असे समजुन पुढील कार्यवाही करण्यात येईल.

**दिनांक ३/०७/२०२५**

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय क.स्तर मोर्शी

---

### विद्यमान दिवाणी न्यायाधिश, साहेब क. स्तर, मोर्शी

किरकोळ अर्ज क्र.३७९/२०२५
पुढील ता.२९.०७.२०२५

**जाहीरनामा/सायटेशन**

**अर्जदार :** १) संगीता लक्ष्मण राऊत, वय-५१ वर्ष, व्यवसाय -घरकाम
२) श्रीमती अश्विनी अंकुश राऊत,वय-२४ वर्ष, व्यवसाय -घरकाम दोघेही रा. मायवाडी, पो. पाळा, ता. मोर्शी, जि. अमरावती.

-- विरुध्द --

**गैरअर्जदार :** Nil

वरील सर्व अर्जदारांनी विद्यमान दिवाणी न्यायाधिश साहेब, (कनिष्ठ स्तर) मोर्शी यांचे न्यायालयांत वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत सेक्शन २, बॉम्बे रेग्युलेशन (८) १८२७ प्रमाणे प्रकरण दाखल केलेले आहे. अर्जदाराप्रमाणे अर्जदार नं.१ चा मुलगा तर अर्जदार नं.२ चे पती नामे अंकुश लक्ष्मणराव राऊत हे दिनांक २७/०३/२०२३ २०२३ रोजी Yavali, Tq.Morshi, Dist-Amravati येथे मय्यत झालेले आहे. त्यांचे मृत्युनंतर त्यांचे वारस हे वरीलप्रमाणे आहे तसेच मयताचे नांवे असलेल्या शासकिय व निमशासकिय अभिलेखांत नोंदी होण्याकरीता वारस प्रमाणपत्र मिळण्याकरीता सदर प्रकरण दाखल केलले आहे. मयताला वरील अर्जदारांशिवाय ईतर कोणतेही वारस नाही तेव्हा या जाहिर नोटीसद्वारे कळविण्यांत येते की, जर कुणालाही सदर अर्जदारांचे प्रकरणांवर आक्षेप असेल तर त्यांनी सदर नोटीसच्या एका महिण्याचे आंत विद्यमान न्यायालयांत आपला लेखी आक्षेप सादर करावा अन्यथा कोणालाही आक्षेप नाही असे समजून पुढील कार्यवाही करण्यांत येईल.

**दिनांक ३/०७/२०२५**

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय क.स्तर मोर्शी

---

### जाहिर नोटीस

**विद्यमान २ रे सह दिवाणी न्यायाधीश (क स्तर)**
**चांदूर बाजार, जि अमरावती**

आर.एम.जे.सी. क्र. ४१२/२०२५
ने.ता, १९/०८/२०२५

**अर्जदार :** १. कुसुम वसंतराव भुस्कडे, वय ७८ वर्षे, व्यवसाय - घरकाम
२. अभय वसंतराव भुस्कडे, वय ५१ वर्षे, व्यवसाय उप मुख्याध्यापक मेडीकल कॉलेज सर्व रा. कु-हा ता. चांदुर बाजार जि. अमरावती

....... विरुध्द.......

**गैरअर्जदार :-निरंक**

**बॉम्बे रेग्यूलेशन ॲक्ट १८२७ चे कलम ८ प्रमाणे वारस प्रमाणपत्र मिळण्याबाबत**

अर्जदार वरील ठीकाणी राहतात. मय्यत वसंतराव अमृतराव भुस्कडे यांचा मृत्यु दि. ०७/०१/२०२५ रोजी रा. कु-हा ता. चांदुर बाजार जि, अमरावती येथे झालेला आहे. तसेच मय्यत पार्वताबाई अमृतराव भुस्कडे ह्या अंदाजे १९९६ व्या वर्षी मय्यत झाली आहे. यांच्या मृत्यूनंतर अर्जदार हेच त्यांचे कायदेशीर वारस आहेत. अर्जदाराव्यतिरिक्त इतर कोणीही कायदेशीर वारस नाहीत.अर्जदारांना मय्यताचे कायदेशीर वारस असल्याबाबत वारस प्रमाणपत्राची कार्यालयीन कामाकरीता आवश्यकता आहे. त्याकरीता विद्यमान २ रे सह दिवाणी न्यायाधीश (क, स्तर) चांदुर बाजार येथील न्यायालयात आर.एम.जे.सी.नं. **४१२/२०२५** नुसार अर्ज दाखल केला आहे.त्याअर्थी वारसाचे प्रमाणपत्र देण्याबाबत काही आक्षेप असल्यास वृत्तपत्रामध्ये जाहीरात प्रसिध्दी दिनांकापासून ३० दिवसांचे आत न्यायालयात आपला आक्षेप स्वतः किंवा वकीलामार्फत हजर राहून नोंदवावा त्यानंतर सदर कोर्टाकडून कोणत्याही आक्षेपाच अथवा व्यक्तीची दखल घेतल्या जाणार नाही व अर्जदारांना वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल. आज दि. २७/०६/२०२५ रोजी माझ्या सही व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

शिक्का

आदेशानुसार,
**आदेशानुसार सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी व फौजदारी न्यायालय, चांदूरबाजार**

---

### दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर, अमरावती

**वि.श्री.एस.एस.बिंगरदेव ८ वे सह दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर, अमरावती यांचे न्यायालयात**

**किरकोळ अर्ज - १२३१/२०२५**
**श्रीमती चंद्रकांत अधिक चार विरुध्द निरंक**
**पुढील तारीख ०७.०८.२०२५**

**जाहीरनामा/सायटेशन**

**अर्जदार :**
1) **Chandrakant Devidas Mehare**, Age 51 yrs., Occu.- Business
R/o. Ward No. 25, Bakdewadi, Amravati, Tq. & Dist. Amravati
2) **Megha Arun Mahindre**, Age 60 yrs., Occu.- Housewife
R/o. Gajanan Peth, State Bank Colony, Akola, Tq. & Dist.Akola
3) **Kanchan Navneet Lokhande,** Age 48 yrs., Occu.- Housewife
R/o. Plot No. 28, Bus Stop No.2, Gopal Nagar, Nagpur,
Tq. & Dist. Nagpur
4) **Jaishree Prashant Khodke**, Age 46 yrs., Occu.- Housewife
R/o. S-5, Jalaram Vihar, Birla Colony, Jathar Peth, Akola
Tq. & Dist. Akola
5) **Rajshree Ajay Bhanang,** Age 43 yrs., Occu.- Housewife
R/o.NB1-12, R.K. County, Tower N1, Opp. Narmada College,
Tavra Road, Jhandeshwar (ct)., Dist. Bharuch (GJ)

-- विरुध्द --

**गैरअर्जदार -** निरंक

सर्वत्र लोकास सुचित करण्यात येते की, **मयत देविदास हरिभाऊ मेहरे** हे **दि.२२.०१.२०१५** रोजी अमरावती, ता.जि.अमरावती येथे व **मयत सुनिता देविदासजी मेहरे** हया **दि.१५.१०.२०१२** रोजी अमरावती, ता.जि.अमरावती येथे मयत झाले. **अर्जदार चंद्रकांत अधिक चार विरुध्द निरंक** यांनी वरीलप्रमाणे यांनी ह्या कोर्टात सदरहू मयत यांचे वारसांचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत **APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE** प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **चंद्रकांत अधिक चार विरुध्द निरंक** वरीलप्रमाणे सदरहू मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजविण्याचे असेल तर ह्या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने ह्या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि ह्या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास तर सदरहू कोर्ट सदरहू अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबित दिसल्यास त्यांना सदरहू **मयत** यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज **दिनांक ०१.०७.२०२५** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशान्वये,
**सहायक अधीक्षक,**
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अमरावती

---

### विद्यमान दिवाणी न्यायाधिश, साहेब क. स्तर, मोर्शी

किरकोळ अर्ज क्र.४२१/२०२५
पुढील ता.१३.०८.२०२५

**जाहीरनामा/सायटेशन**

**अर्जदार :** १) सौ. रसिका गणेशराव भुयार, वय ४० वर्ष, व्यवसाय-घरकाम
२) श्री. गणेश बळीराम भुयार, वय ५३ वर्ष, व्यवसाय-शेती दोघेही रा. निंभी, ता. मोर्शी, जि. अमरावती.

-- विरुध्द --

**गैरअर्जदार :** Nil

वरील सर्व अर्जदारांनी विद्यमान दिवाणी न्यायाधिश साहेब (कनिष्ठ स्तर) मोर्शी यांचे न्यायालयात वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत सेक्शन २. बॉम्बे रेग्युलेशन (८) १८२७ प्रमाणे प्रकरण दाखल केलेले आहे. अर्जदाराप्रमाणे अर्जदारांचा **मुलगा नामे प्रणव गणेशराव भुयार** हा अविवाहीत असतांना दिनांक १७/०५/२०२५ रोजी Nimbhi, Tq Morshi, Dist-Amravati येथे मय्यत झालेला आहे. वरील अर्जदारांशिवाय त्याला ईतर कोणीही कायदेशीर वारस नाही, त्यांचे मृत्युनंतर त्यांचे वारस हे वरीलप्रमाणे आहे. तसेच मयताचे नावे असलेल्या शासकिय व निमशासकिय अभिलेखांत नोंदी होण्याकरीता वारस प्रमाणपत्र मिळण्याकरीता सदर प्रकरण दाखल केलले आहे. मयताला वरील अर्जदाराशिवाय इतर कोणतेही वारस नाही तेव्हा या जाहिर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, जर कुणालाही सदर अर्जदाराचे प्रकरणावर आक्षेप असेल तर त्यांनी सदर नोटीसच्या एका महिण्याचे आंत विद्यमान न्यायालयांत आपला लेखी आक्षेप सादर करावा अन्यथा कोणालाही आक्षेप नाही असे समजुन पुढील कार्यवाही करण्यांत येईल.

**दिनांक २/०७/२०२५**

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय क.स्तर मोर्शी

---

### विद्यमान दिवाणी न्यायाधिश, साहेब क. स्तर, मोर्शी

किरकोळ अर्ज क्र.३९९/२०२५
पुढील ता.६.०८.२०२५

**जाहीरनामा/सायटेशन**

**अर्जदार :** १) श्रीमती पल्लवी रविकिरण इंगळे, वय ३६ वर्षे, व्यवसाय - घरकाम
२) कु.श्रीनीती रविकिरण इंगळे, वय-११ वर्षे, व्यवसाय -शिक्षण
३) कु. ऋतुजा रविकिरण इंगळे, वय ३ वर्षे
(अर्जदार कं. १ ही अर्जदार क्रं. २ व ३ ची अ.पा.क.आई असे)
४) कमल श्रीराम इंगळे, वय ७३ वर्षे, व्यवसाय -घरकाम सर्व रा. चिखलसावंगी, ता. मोर्शी, जि. अमरावती

-- विरुध्द --

**गैरअर्जदार :** Nil

वरील अर्जदारांनी वि. दिवाणी न्यायाधिश साहेब (क. स्तर) मोर्शी यांचे न्यायालयात वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत U/s २ बॉम्बे रेग्युलेशन (८) १८२७ प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे. अर्जदार कं. १ हीचे पती, तर अर्जदार कं. २ व ३ यांचे वडील व अर्जदार कं. ४ चा मुलगा नामे रविकिरण श्रीराम इंगळे यांचा दि.२९/०४/२०२५ रोजी न्युरॉन हॉस्पीटल नागपुर, ता. जि. नागपुर येथे मृत्यु झाला. तसेच मयतांचे नांवे असलेल्या शासकीय तथा निमशासकीय अभिलेखात नोंदी होण्याकरीता वारस प्रमाणपत्र मिळण्याकरीता सदर प्रकरण दाखल केलेले आहे. मयताना वरील अर्जदारांशिवाय ईतर कोणतेही वारस नाहीत. तेव्हा या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते कि, जर कोणालाही सदर अर्जदारांचे प्रकरणावर आक्षेप असेल तर त्यांनी सदर नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन एक महीण्याच्या आंत वि. न्यायालयात आपला लेखी आक्षेप सादर करावा. अन्यथा कोणालाही आक्षेप नाही असे समजुन पुढील कार्यवाही करण्यात येईल.

**दिनांक २७/०६/२०२५**

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय क.स्तर मोर्शी

---

### जाहिर नोटीस

**विद्यमान २ रे सह दिवाणी न्यायाधीश (क स्तर)**
**चांदूर बाजार, जि अमरावती**

आर.एम.जे.सी. क्र. ४२२/२०२५
ने.ता, २१/०८/२०२५

**अर्जदार :** १) वामन नामदेव राऊत, वय ७८ वर्षे, व्यवसाय - शेती रा. बेलोरा, ता चांदर बाभार, जि. अमरावती.२)सुमन अंबादासराव ठाकरे, वय ७२ वर्षे व्यवसाय - घरकाम रा. परसोळा, पोस्ट. खराळा, ता. चांदूर बाजार जि. अमरावती३) रजनी हिम्मत खाडे, वय १९ वर्षे व्यवसाय -घरकाम रा. वार्ड नं. ३, आशेली, ता. मोशी, जि. अमरावती.४) अलका नंदकुमार निभोरकर, वय ४९ वर्षे धंदा घरकाम रा. नरसिंगपूर, बाचली शहिद ता. जि. अमरावती

....... विरुध्द.......

**गैरअर्जदार :-निरंक**

**बॉम्बे रेग्यूलेशन ॲक्ट प्रमाणे वारस प्रमाणपत्र मिळण्याबाबत**

अर्जदार क्र १ ते ४ वरील विकाणी राहतात अर्जदार ते ४ यांचे **वडील नामे नामदेव मारोतराव राऊत** यांचा मृत्यु दिनांक २०/०२/२००५ रोजी बेलोरा, ता. चांदुर बाजार, जि. अमरावती येथे झाला. तसेच **अर्जदार यांची आई नामे वत्सलाबाई नामदेवराव राऊत** यांचा मृत्यु दिनांक १५/०९/२००७ रोजी बलता बाबर जि. अमरावती येथे झालेला आहे. वरील अर्जदार हे त्यांचे कायदेशिर वारस आहेत. या अर्जदारा व्यतिरिक्त इतर कोणीही कायदेशिर वारस नाहीत, अर्जदार मयताचे कामदेशिर बारस असल्याने त्यांना कार्यालयीन कामाकरीता वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे.त्याअर्थी वारसाचे प्रमाणपत्र देण्याबाबत काही आक्षेप असल्यास वृत्तपत्राम्ध्ये जाहीरात प्रसिध्दी दिनांकापासून ३० दिवसांचे आत न्यायालयात आपला आक्षेप स्वतः किंवा वकीलामार्फत हजर राहून नोंदवावा त्यानंतर सदर कोर्टाकडून कोणत्याही आक्षेपाची अथवा व्यक्तीची दखल घेतल्या जाणार नाही व अर्जदारांना वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.आज दि. २/०७/२०२५ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्कयानिशी दिली.

शिक्का

आदेशानुसार,
**आदेशानुसार सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी व फौजदारी न्यायालय, चांदूरबाजार**

---

### दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर, अमरावती

**वि.श्रीमती एन.सी.सोरटे ७ वे सह दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर, अमरावती यांचे न्यायालयात**

**किरकोळ अर्ज - ११३४/२०२५**
**श्रीमती संगीता अधिक एक विरुध्द निरंक**
**पुढील तारीख २२.०७.२०२५**

**जाहीरनामा/सायटेशन**

**अर्जदार :**
1) **Sangita Anil Adekar**, Age 40 yrs., Occu.- Household,
R/o. Karajgaon, Post - Tiosa, Dist. Amravati
2) **Satish Vasantrao Raut**, Age 38 yrs., Occu.-
R/o. Ward No.4, Ramkrushna Colony, Benoda Shahid,
Tq. Warud, Dist. Amravati

-- विरुध्द --

**गैरअर्जदार -** निरंक

सर्वत्र लोकास सुचित करण्यात येते की, **मयत वसंत नारायण राउत** हे **दि.२९.१२.२०१०** रोजी वरुड, ता.जि.अमरावती येथे व **नानुबाई वसंतराव राउत ११.०८.२०१९** रोजी वरुड, ता.जि.अमरावती मयत झाले. **अर्जदार संगिता अधिक एक विरुध्द निरंक** यांनी वरीलप्रमाणे यांनी ह्या कोर्टात सदरहू मयत यांचे वारसांचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत **APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE** प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **श्रीमती संगिता अधिक एक विरुध्द** वरीलप्रमाणे सदरहू मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजविण्याचे असेल तर ह्या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने ह्या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि ह्या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास तर सदरहू कोर्ट सदरहू अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबित दिसल्यास त्यांना सदरहू **मयत** यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज **दिनांक २५.०६.२०२५** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशान्वये,
**सहायक अधीक्षक,**
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अमरावती

---

जनमाध्यम

जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती - ४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, रेल्वेपुलाजवळ, राजकमल चौक, अमरावती -४४४६०१ येथे प्रकाशित केले.

**संपादक-प्रदीप देशपांडे**
**संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे**
(Responsible for selection of News Under PRB Act)

**अमरावती आवृत्ती वर्ष - ३६ अंक ३००**
आर.एन.आय.रजी.नं. 49763/89 पोस्टल लायसन क्र. ATI/RNP/47/2023-2025

**मुख्य कार्यालय :-** अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००,९४२२९५६२६८
**ई-मेल** - atimadhyam@gmail.com, abhiram.deshpande70@gmail.com

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

## संक्षिप्त



### कृषीदिनी शेतकऱ्यांना पुरस्कार

**अंजनगाव बारी-** पंचायत समिती अमरावती येथे कै. वसंतराव नाईक शेतकरी गौरव पुरस्कार,माजी पंचायत समिती सदस्या रश्मि अजय घुले ( युवा स्वाभिमान पार्टी ) यांच्या हस्ते उत्कृष्ठ शेतकरी यांना प्रदान करण्यात आला. हरित क्रांतिचे प्रणेते, महाराष्ट्र राज्याचे माजी मुख्यमंत्री स्व. वसंतराव नाईक साहेब यांच्या ११२ व्या जयंती निमित्त १ जुलै २०२५ रोजी महाराष्ट्र कृषि दिनाच्या दिवशी पंचायत समिती अमरावती येथे गट विकास अधिकारी सुदर्शन तुपे तसेच माजी पंचायत समिति सदस्या रश्मि अजय घुले, तालुका कृषी अधिकारी प्रशांत गुल्हाने यांच्या समक्ष,अंकिता लाड,स.ग.वि. अधिकारी प.स. अमरावती, यांच्या हस्ते अमरावती तालुक्यातील प्रगत शेतकऱ्यांचा सत्कार करण्यात आला. यामध्ये सौरभ माहोरे, संतोष कचरे, नरेंद्र भुगुल या शेतकऱ्यांना वसंतराव नाईक पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. याप्रसंगी उपस्थित सर्व कृषी विभागाचे कृषी सहायक, पंचायत समितीचे कृषि विस्तार अधिकरी, व मोठ्या संखेने शेतकरी तसेच युवा स्वाभिमान पार्टिचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

### महाडीबीटी शिष्यवृत्ती अर्ज २०२५-२६ साठी पोर्टल सुरु

**अमरावती-**सन २०२५-२६ या शैक्षणिक वर्षातील शिष्यवृत्तीसाठी महाडीबीटी पोर्टल कार्यान्वित झाले आहे. सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग तसेच इतर मागास बहुजन कल्याण विभागांतर्गत अनुसूचित जाती, विजाभज, इमाव व विमाप्र प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी विविध शिष्यवृत्ती योजनांचे अर्ज भरण्यास पासून सुरुवात झाली आहे. सन २०२४-२५ या शैक्षणिक वर्षाचे नवीन/नूतनीकरण अर्ज तसेच २०२३-२४ या शैक्षणिक वर्षाचे 'रि-अप्लाय' अर्ज भरण्यासाठी ३१ जुलैपर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे.या योजनांमध्ये भारत सरकार मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती, शिक्षण फी परीक्षा फी योजना, राजश्री शाहू महाराज गुणवत्ता शिष्यवृत्ती, व्यावसायिक पाठ्यक्रमाशी संलग्न वसतिगृहांतील विद्यार्थ्यांना निर्वाह भत्ता आणि व्यवसाय प्रशिक्षण शुल्क प्रतिपूर्ती योजना यांचा समावेश आहे. अनुसूचित जाती प्रवर्गातील विद्यार्थ्यांनी २०२५-२६ या शैक्षणिक वर्षासाठी प्रथम वर्षाचे आणि नूतनीकरणाचे अर्ज महाडीबीटी प्रणालीवर भरणे सुरु आहे. सर्व अर्ज शासनाच्या https://mahadbtmahait.gov.in या संकेतस्थळावर भरण्यात यावेत.जिल्ह्यातील सर्व पात्र अनुसूचित जाती आणि विमाप्र प्रवर्गातील विद्यार्थ्यांना तसेच महाविद्यालयांच्या प्राचार्यांना आवाहन करण्यात येत आहे की, महाविद्यालयांनी आपल्या व्हॉट्सॲप ग्रुपवर नोंदणीकृत अर्जांची संख्या वाढवावी आणि समानसंधी केंद्रांच्या समन्वयकांमार्फत विद्यार्थ्यांना सूचना द्याव्यात. पात्र विद्यार्थी शिष्यवृत्तीपासून वंचित राहणार नाहीत याची दक्षता संबंधित प्राचार्यांनी घ्यावे असे आवाहन, समाज कल्याण सहाय्यक आयुक्त यांनी केले आहे.

# अखेर अचलपूर कृषी उत्पन्न बाजार समितीला आली जाग

# 'त्या' शेतकऱ्याला मिळणार नुकसान भरपाई

**अचलपूर/वार्ताहर**

कृषी उत्पन्न बाजार समिती प्रशासन व त्या अडत्याच्या निष्काळजीपणामुळे वीस कट्टे गव्हाला अक्षरशः पावसामुळे कोंब फुटले होते. एफ. ए. क्यू. दर्जाच्या गव्हाची अशाप्रकारे माती झाल्यामुळे सदर शेतकऱ्याला हजारो रुपयांचे आर्थिक नुकसान सहन तर करावे लागले.याची तक्रार त्या शेतकऱ्याने अचलपूर कृषी उत्पन्न बाजार समिती प्रशासन कडे दिली होती .याची तत्काळ दखल घेत संबंधित अडत्याने कोंब फुटलेल्या २० कट्टे गव्हाची मोजणी करून खरेदी करणार असल्याने शेतकऱ्याला नुकसान भरपाई मिळणार आह.

गव्हाचे नुकसान झाल्याने या शेतकऱ्याला मानसिक धक्का बसला होता. याप्रकरणी शेतकरी योगेश बुटे यांनी सचिव योगेश चव्हाण यांना तक्रार दिली होती.योगेश बुटे रा. बेलज यांनी २५ मे २०२५ रोजी सायंकाळच्या सुमारास महालक्ष्मी अडत दुकानाचे संचालक प्रदीप धोंडे यांच्या अडत दुकानात २० कट्टे गहू विक्रीसाठी ठेवला होता. योग्य भाव आल्यानंतर विक्री करावी, असे धोंडे यांना बुटे यांनी स्पष्टपणे सांगितले होते. दरम्यान जून महिन्यात पाऊस सुरु झाला. तरी सदर कड़े सुरक्षित ठिकाणी हलविण्याऐवजी तेथेच ठेवण्यात आले. अडत दुकानदाराने आपले कर्तव्य समजून सदर कट्टे शेडमध्ये ठेवण्याची जबाबदारी त्यांची होती. अनेक दिवस कट्टे भर पावसातच चिंब होत राहिले. आज ३ जुलै रोजी गुरुवार आठवडी बाजार असल्याने बुटे यांनी २ जुलै रोजी बाजारसमिती मध्ये येऊन गव्हाच्या



पोत्यांची पाहणी केली असता गव्हाला कोंब फुटल्याचे आढळून आले.मेहनतीने भर उन्हात ओलीत करून आणि हजारो रुपये खर्च करून गव्हाचे उत्पन्न बुटे यांनी घेतले होते. सदरचे गहू विकून आलेल्या पैशातून बी बियाणे रासायनिक

### २० कट्टे गव्हाला फुटले होते कोंब

खते आणि शेतीच्या अंतर मशागतीचे स्वप्न बुटे यांनी पाहिले होते. मात्र अडत दुकानदाराच्या गंभीर चुकीमुळे आणि अक्षम्य दुर्लक्षामुळे त्यांच्या स्वप्नांची राखरांगोळी झाली.

दरम्यानच्या काळात अनेक वेळा संपर्क करून गहू सुरक्षित आहे का, विक्री केव्हा करणार आहात, याबाबत अडत दुकानदाराशी संपर्क साधला असता तुमच्या गहू एकदम सुरक्षित आहे. चांगला भाव आल्यास विकला जाईल, असे त्यांना सांगण्यात आले होते.मात्र आता अडत दुकानदाराने चांगलेच घूमजाव केले होते .सदर गहू आपल्या अडतमध्ये ठेवलाच नसल्याचे ते म्हणत होते.

मात्र बुटे आपल्या मागणीवर ठाम असल्याने जर दोन दिवसांत नुकसान भरपाई दिली नाही तर बाजारसमिती आवारात बेमुजत उपोषण करण्याचा इशारा त्यांनी दिला होता. पत्राच्या प्रती माजी आमदार बच्चू कडू, तहसीलदार, उपविभागीय अधिकारी यांना देण्यात आल्या. यानंतर अचलपूर कृषी उत्पन्न बाजार समिती प्रशासनाला जाग येऊन यासंदर्भात सभापती ,उपसभापती आणि संचालकांच्या उपस्थितीत या मुद्द्यावर चर्चा करण्यात आली .आणि त्या अडत्याने कोंब आलेले २० गव्हाच्या पोत्याची मोजमाप करून खरेदी करणार असल्याने त्या शेतकऱ्यावर बाजार समिती व त्या अडत्यांच्या दुर्लक्षामुळे आर्थिक नुकसानीचां बोज्यातून मुक्तता झाली आहे.

## खा.बळवंत वानखडे यांची वाढदिवसानिमित्त लाडूतुला

**अंजनगाव सुर्जी/वार्ताहर**

खासदार बळवंत वानखडे यांचा वाढदिवस त्यांची लाडुतुला करुन साजरा झाला.लाडूतुला करून सदरचे लाडू सर्वांना वाटण्यात आले. खासदारांचे कार्यक्रम स्थळी प्रभामंगलम येथे आगामन होताच शुभेच्छा देणाऱ्यांची रीघ लागली असल्याने या परिसराला यात्रेचे स्वरूप प्राप्त झाले होते.तालुका व शहर कॉंग्रेस यांनी खासदारांचे वाढदिवसाच्या निमित्ताने अनेकांनी सामाजिक व लोक हिताचे उपक्रम आयोजित केले होते.



यावेळी मंचकावर जिल्हा बॅंकेचे अध्यक्ष सुधाकर भारसाकळे, जि.प.चे मा.सभापती बाळासाहेब हींगणीकर, कृ.ऊ.बा.स. दर्यापुरचे सभापती सुनिल गावंडे, संचालक प्रभाकर तराळ, मा.जि.प.सदस्य विलास पवार, शिवाजीराव हरने,विकास येवले, विनोद पवार, ता.अध्यक्ष प्रमोद दाळु, शहर अध्यक्ष प्रदीप देशमुख, प्रेम बोके, अनिल भारसाकळे यांनी खा.बळवंत वानखडे यांचा गुलाब पुष्पहार अर्पण करून जन्मदिनाच्या शुभेच्छा दिल्या. लाडूतुला सोहळ्याचे संचालन अमोल घुरडे आभारप्रदर्शन वर्षा बोबडे यांनी केले. कार्यक्रम यशस्वी आयोजनास सुधाकर खारोळे, अमर शिंगणे, संजय सरोदे, हेमंत येवले,अजय डीके, कासमतभाई,मो.कलीम मो.कलाम., रमेश सावळे, आशिक अन्सारी, राजु कुरेशी, दिगंबर वानखडे, बबलू पाटील काळमेघ, कैलास शिरसाट,सुरेंद्र वानखडे, विजय दामले, साहेबराव सदाशिव, मनोज लहू पंचांग ता. कॉंग्रेस कमिटी ग्रामीण व शहर, अल्पसंख्यक विभाग, अनुसूचित जाती विभाग, महिला कॉंग्रेस, युवक कॉंग्रेस, तथा सर्व कॉंग्रेस कमिटी यांचे सहकार्य लाभले.

## संसदेतील चर्चेच्या अधिकाऱ्यांनी नोंदी घ्याव्यात- आ.खोडके

**अमरावती/का.प्र.**

महाराष्ट्र विधानपरिषदेमध्ये नियम २६० अन्वये प्रस्तावावर चर्चा होत असतांना संबंधित खात्यांचे अधिकारी उपस्थित नसल्याने आ.संजय खोडके यांनी सभागृहासमक्ष खंत व्यक्त केली. प्रस्तावातील चर्चे दरम्यान अधिकाऱ्यांनी नोंदी घेवून माहिती देण्याची सूचना आ.संजय खोडके यांनी केली. यावर अधिकाऱ्यांनी नोंदी घेणे गरजेचे असल्याचे विधान परिषद उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांनी घोषित केले.

या सभागृहातील कामकाज हे सर्व दृष्टीने अत्यंत महत्वाचे आहे. सभागृहातील प्रस्ताव व चर्चा हि देखील तितकीच महत्वाची असून या संदर्भात सर्व माहिती सादर करणे हे संबंधित खात्याच्या अधिकाऱ्यांनी उपलब्ध करणे आवश्यक आहे. मात्र विधानपरिषदेत विविध प्रस्तावांवर चर्चा होत असतांना संबंधित खात्याचे अधिकारी उपस्थित नसल्याने आ.संजय खोडके यांनी सभागृहासमक्ष खंत व्यक्त केली. तसेच महत्वपूर्ण प्रस्तावातील चर्चे दरम्यान अधिकाऱ्यांनी नोंदी घेवून माहिती देण्याची सूचना आ.संजय खोडके यांनी केली. यावर विधान परिषदेतील प्रस्तावांवर चर्चा होत असतांना अधिकारी वर्गाने नोंदी घ्याव्यात असे पीठासीन उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांनी घोषित केले.

## एसबीआयचे शशी रंजन यांचे क्रीडाईतर्फे स्वागत

### बांधकाम क्षेत्रातील मान्यवरांची उपस्थिती

**अमरावती/का.प्र.**

स्टेट बँक ऑफ इंडिया (डीजी एमओ) शशिरंजन यांचे क्रीडाई अमरावतीतर्फे गुरुवारी विशेष स्वागत समारंभात उत्साहपूर्ण स्वागत करण्यात आले. शहरातील शाम चौक मेन ब्रॉंचला पार पडलेल्या या कार्यक्रमात बांधकाम, बँकिंग आणि उद्योजक क्षेत्रातील अनेक मान्यवरांनी उपस्थित राहून



कार्यक्रमाची शोभा वाढवली.

समारंभात क्राडाई अमरावतीचे अध्यक्ष राजन पाटील यांनी शशिरंजन यांचे स्वागत करत बँकिंग क्षेत्रातील त्यांच्या कार्याचा गौरव केला. याप्रसंगी शशिरंजन यांनी बँकेशी संबंधित सहकार्य करण्याची ग्वाही दिली. याप्रसंगी महाराष्ट्रचे जॉईंट सेक्रेटरी नीलेश ठाकरे, ॲडव्हायझरी बोर्डचे भुषण देशपांडे, माजी अध्यक्ष पंकज देशमुख यांच्यासह अनिल वीखे, दिलीपभाई पोपट, कपील आंडे, आशीष दुधे, प्रविण ढवळे, लक्ष्मीकांत जोशी यांनीही उपस्थिती लावली. या कार्यक्रमात एसबीआयचे श्रीकांत पगल (एजीएम), आदित्य पाठक चिफ मॅनेजर (एचएलएसटी) योंचीही विशेष उपस्थिती लाभली.

## प्रधानमंत्री पीक विमा योजनेसाठी ३१ जुलैपर्यंत मुदतवाढ

**अमरावती/का.प्र.**

प्रधानमंत्री पीक विमा योजनेअंतर्गत खरीप हंगाम २०२५-२६ साठी जिल्ह्यातील शेतकरी सहभागास सुरुवात झाली आहे. नैसर्गिक आपत्ती, कीड आणि रोगांसारख्या प्रतिकूल परिस्थितीमुळे पिकांचे नुकसान झाल्यास शेतकऱ्यांना विमा संरक्षण प्रदान करणे, हे या योजनेचे उद्दिष्ट आहे. जिल्ह्यातील शेतकऱ्यांसाठी भारतीय विमा कंपनीची निवड करण्यात आली असून, या योजनेमुळे पिकांच्या नुकसानीच्या अत्यंत कठीण परिस्थितीतही शेतकऱ्यांचे आर्थिक स्थैर्य अबाधित ठेवण्यास मदत होईल. विमा काढण्याची अंतिम मुदत ३१ जुलै २०२५ आहे.

या योजनेचा लाभ घेण्यासाठी ३१ जुलैपर्यंत पिकाचा विमा काढून घ्यावा. योजनेबद्दल सविस्तर माहितीसाठी गावातील कृषी सहायक, मंडळ कृषी अधिकारी आणि तालुका स्तरावर तालुका कृषी कार्यालयाशी संपर्क साधावा.योजनेमुळे शेतकऱ्यांना नाविण्यपूर्ण आणि सुधारित मशागतीचे तंत्रज्ञान व सामुग्री वापरण्यास प्रोत्साहन मिळेल. कृषी क्षेत्रासाठीच्या पतपुरवठ्यात सातत्य राखणे, अन्नसुरक्षा, पिकांचे विविधिकरण आणि कृषी क्षेत्राचा गतिमान विकास व स्पर्धात्मकता वाढवणे हे या योजनेचे महत्त्वाचे हेतू आहेत. इतर व्यक्तींच्या नावाने, तसेच इतर अवैध मार्गाने विमा काढला गेल्यास तो अर्ज रद्द करण्यात येईल. योजनेत सहभागासाठी शेतकरी ओळखपत्र क्र. (AGRISTACK Farmer ID) असणे अनिवार्य असेल आणि पीक विमा नुकसान भरपाईसाठी, ई-पिक पाहणी अंतर्गत पिकांची नोंद करणे बंधनकारक राहील. ॲग्रीस्टॅक नोंदणी क्रमांक, ७/१२, ८-अ, आधार कार्ड, बँक पासबुक, स्वयं घोषणापत्र यांचा समावेश आहे.

भात (तांदूळ)- विमा संरक्षित रक्कम ६१ हजार, विमा हप्ता १५२.५० रुपये, ख. ज्वारी- विमा संरक्षित रक्कम ३२ हजार ९००, विमा हप्ता ८२.२५ रुपये, सोयाबिन- विमा संरक्षित रक्कम ५५ हजार ९००, विमा हप्ता ५५९ रुपये, मूग- विमा संरक्षित २६ हजार ६०० विमा हप्ता ५३२ रुपये, उडीद- विमा संरक्षित २५ हजार, विमा हप्ता ६२.५० रुपये, तूर विमा संरक्षित ४५ हजार ७००, विमा हप्ता ४५७ रुपये, कापूस- विमा संरक्षित ६० हजार, विमा हप्ता -७५० रुपये, मका -विमा संरक्षित ३६ हजार, विमा हप्ता ९० रुपये. सी. एस .सी केंद्रामार्फत अर्ज करण्यासाठी शेतकरी हिस्सा रक्कम प्रति हेक्क्टर या पेक्षा अतिरिक्त पैसे घेतल्यास शेतकऱ्यांनी कृषि विभाग, तहसिल कार्यालयास तक्रार करावी. जिल्हा कृषि अधिकारी कार्यालय यांच्याशी संपर्क साधावा व तशी तक्रार नोंदवावी. असे आवाहन केले आहे.

## फळपीक विमा योजनेसाठी ६ जुलैपर्यंत नोंदणी

**अमरावती-**जिल्ह्यातील फळ उत्पादक शेतकऱ्यांना पुनर्रचित हवामान आधारित फळपीक विमा योजना मृग बहार २०२५-२६ अंतर्गत अर्ज करण्याची अंतिम मुदत ६ जुलै २०२५ पर्यंत आहे. नैसर्गिक आपत्ती, कीड किंवा रोगांमुळे फळपिकांचे होणारे मोठे नुकसान टाळण्यासाठी ही योजना शेतकऱ्यांसाठी संजीवनी ठरणार आहे. जिल्ह्यासाठी भारतीय विमा कंपनीची निवड झाली असून, राज्य शासनाने या योजनेस दोन वर्षांसाठी (२०२४-२५ आणि २०२५-२६) मान्यता दिली आहे. योजनेमुळे शेतकऱ्यांचे आर्थिक स्थैर्य टिकून राहील आणि त्यांना आधुनिक शेती तंत्रज्ञान वापरण्यास प्रोत्साहन मिळेल. संत्रा, मोसंबी, लिंबू, पेरू, डाळिंब आणि सीताफळ या अधिसूचित फळपिकांसाठी ही योजना लागू आहे. योजनेत सहभागी होण्यासाठी शेतकरी ओळखपत्र क्रमांक आणि ई-पीक पाहणीमध्ये नोंदणी अनिवार्य आहे.पेरू, लिंबू, संत्रा, मोसंबीसाठी आधार संकेतस्थळावरील तांत्रिक अडचणींमुळे ३ ते ६ जुलै २०२५ अशी ४ दिवसांची विशेष मुदतवाढ देण्यात आली आहे. असे आवाहन जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी, अमरावती यांनी केले आहे.

## वाठोडा शुक्लेश्वर देवस्थानातील चोरीची घटनेप्रकरणी

## महाराष्ट्र मंदिर महासंघाच्यावतीने जिल्हाधिकारी व पोलीस अधिक्षकांना निवेदन

**अमरावती/का.प्र.**

विदर्भाची काशी म्हणून ओळखले जाणारे पवित्र शुक्लेश्वर देवस्थान येथील मंदिरात २८ जुलैला रात्री चोरीची घटना घडल्याचे २९ जुलैला सकाळी लक्षात आले. त्यासंदर्भात स्थानिक पोलीस ठाण्यात तक्रार नोंदवण्यात आली आहे.



याबाबतीत महाराष्ट्र मंदिर महासंघाच्या नुकत्याच पार पडलेल्या बैठकीत चिंता व्यक्त करण्यात आली. मंदिरात घडलेल्या या चोरीच्या घटनेसंदर्भात महाराष्ट्र मंदिर महासंघाच्या वतीने आज जिल्हाधिकारी कार्यालय, अमरावती व पोलीस अधिक्षक विशाल आनंद यांना निवेदन सादर करण्यात आले.या निवेदनात शुक्लेश्वर देवस्थानातील चोरीचा तपास जलद गतीने करून संबंधित गुन्हेगारा विरुद्ध कठोर कारवाई करण्यात यावी व तसेच मंदिरेही भाविकांची श्रद्धास्थाने असून कशा वारंवार होणाऱ्या चोऱ्यांमुळे भाविकांमध्ये अस्वस्थता व क्षोभ निर्माण झाला आहे त्यामुळे पोलीस प्रशासनाने या घटनांकडे गांभीर्याने लक्ष द्यावे व सुरक्षित उपाययोजना तातडीने कराव्यात अशी मागणी करण्यात आली आहे.

यावेळी अमरावती जिल्ह्यातील विविध मंदिरे व देवस्थानांचे विश्वस्त, पुजारी, सेवेकरी आणि महासंघाचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. सर्वांनी एकमुखाने मंदिर सुरक्षेसाठी सरकारने योग्य ती उपाययोजना करावी, अशी जोरदार मागणी केली.यावेळी श्रीनिवास पांडुरंग खेरडे, रामदास सदाशिवराव बुरघाटे, उमेश पंजाबराव गावंडे, प्रदीप लक्ष्मणराव ठोसर, आशिष न. मारुडकर सचिव, पिंगळादेवी देवस्थान, कैलास पनपालिया, मोहन इंगळे, विश्वस्त पुंजाराम नेमाडे अध्यक्ष सचिन वैद्य, प्रदीप गर्गे, श्रीकांत पिसोळकर, निलेश टवलारे आदी उपस्थीत होते.

## आकांक्षा प्रकाशनच्या राज्यस्तरीय कथा स्पर्धेचा निकाल जाहीर

**अमरावती/का.प्र.**

आकांक्षा प्रकाशन ही संस्था गेली अनेक वर्षे साहित्य व सामाजिक क्षेत्रात वेगवेगळे उपक्रम राबवित असते. त्यातीलच एक भाग म्हणून दरवर्षी राज्यस्तरीय कथालेखन स्पर्धा सुरू करण्यात आली आहे. हे या स्पर्धेचे चवथे वर्ष आहे. या स्पर्धेला राज्यभरातून व बाहेरून सुद्धा भरपूर प्रतिसाद मिळाला.

२०२५ च्या आकांक्षा प्रकाशन आयोजित स्पर्धेचा निकाल नुकताच जाहीर करण्यात आला.

प्रथम पुरस्कार लीलाधर दवंडे,कामठी यांच्या 'पोळा' कथेला प्राप्त झालेला आहे. दवंडे कथाकार आणि कवी आहेत.त्यांचे दोन काव्यसंग्रह प्रसिद्ध आहेत. अनेक सामाजिक संघटनांशी त्यांचा संबंध आहे.द्वितीय पुरस्कार प्रा.प्रसेनजीत तेलंग, चांदुर रेल्वे यांच्या 'कूप' या कथेला तर तृतीय पुरस्कार सोनाली करमरकर, नागपूर यांच्या 'चक्रव्यूह' आणि संध्या



दानव, चंद्रपूर यांच्या 'मामंजी' कथेला विभागून देण्यात आला.

प्रा. तेलंग ललित, काव्य, समीक्षा आणि वैचारिक लेखन सातत्याने करत असतात. प्रगतिशील लेखक संघटनेतेचे ते राज्य संघटक आहेत. परिवर्तनवादी चळवळीत आणि वाङ्मयीन चळवळीत ते गत २५ वर्षे सक्रियपणे कार्यरत आहेत.

तसेच सोनाली कोलारकर यांच्या आतापर्यंत अनेक दिवाळी अंकातून कथा प्रसिद्ध झालेल्या आहेत. त्यांचा एक कथासंग्रही प्रकाशित आहे.संध्या दानव यांचे दोन कथासंग्रह प्रसिद्ध आहेत.

त्या चंद्रपूरला दूरदर्शनला वृत्त उद्घोषिका आहेत. वऱ्हाडी, ग्रामीण, कथा लिहिण्यात त्यांचा हातखंडा आहे. लवकरच हे पुरस्कार एका कार्यक्रमात प्रदान करण्यात येतील असे आकांक्षा प्रकाशनच्या संचालक अरुणा सबाने यांनी कळवले आहे.

प्रथम पुरस्कार अडीच हजार रुपये, द्वितीय पुरस्कार दोन हजार रुपये, तृतीय पुरस्कार एक हजार रुपये तसेच ग्रंथ भेट, सन्मानचिन्ह व सन्मानपत्र असे पुरस्काराचे स्वरूप आहे. या स्पर्धेच्या परीक्षक प्रसिद्ध कथा, कादंबरीकार विजयाताई ब्राह्मणकर व ललित लेखिका कवयित्री वर्षा थोटे यांनी केले आहे. पुरस्कार प्राप्त कथालेखक व स्पर्धकांचे आकांक्षा प्रकाशन तर्फे अभिनंदन करण्यात आलेले आहे.

शनिवार ५ जुलै २०२५
E-paper - www.janmadhyam.com
जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय


# बँकांच्या सक्तीच्या वसुलीविरोधात बच्चू कडूंचे एसबीआय च्या मुख्य कार्यालयासमोर आंदोलन



**मुंबई/प्रातिनिधी :** राज्यातील शेतकऱ्यांकडून सुरू असलेल्या बँकांच्या सक्तीच्या कर्जवसुलीविरोधात प्रहार चे संस्थापक तथा माजी राज्यमंत्री बच्चू कडू आक्रमक झाले आहेत. 'सक्तीने वसुली थांबवा अन्यथा बँक अधिकाऱ्यांना उलटे टांगू,' असा निर्वाणीचा इशारा आधीच दिल्यानंतरही कर्जवसुली सुरूच असल्यामुळे आज (४ जुलै) सकाळी १० वाजता मंत्रालय नजीकच्या स्टेट बँकेच्या मुख्य कार्यालयासमोर बच्चू कडू यांच्या नेतृत्वात तीव्र आंदोलन सुरू करण्यात आले. या आंदोलना मुळे बँकेच्या ☞(पान २ वर)




बच्चू कडू यांचा बँकेला घेराव

## ■ शेतकरी लढ्याला नवे बळ - संपूर्ण राज्याचे लक्ष आंदोलनाकडे

राज्यभरातील शेतकरी आणि युवक आंदोलनाकडे आशेने पाहत असून या लढ्याला आता व्यापक स्वरूप मिळण्याची शक्यता आहे. ग्रामीण भागातील अनेक संघटना बच्चू कडू यांच्या पाठीशी उभ्या राहिल्या असून, येत्या काही तासांत आंदोलन आणखी तीव्र होण्याची चिन्हं आहेत.

## ■ महायुती ने दिले होते सात बारा कोरा चे आश्वासन

महायुती ने निवडणूकीच्या वेळी सत्तेत आल्यावर शेतकऱ्यांना सात बारा कोरा करण्याचे आश्वासन दिले होते. त्यामुळे राज्यातील शेतकऱ्यांनी सातबारा कोरा होईल म्हणून कर्ज भरले नाही.सरकारच्या या खोट्या आश्वासनाला शेतकरी बळी पडला आणि कर्ज थकीत झाले मात्र बँकांनी शेतकऱ्यांकडून सक्तीची कर्जवसुली धोरण अवलंबिल्यामुळे आज शेतकरी आत्महत्येकडे वळला आहे. एकीकडे शेतकरी संकटात असतांना बँकांनी सक्तीची कर्जवसुली करणे कितपत योग्य आहे असा सवाल बच्चू कडू यांनी उपस्थित केला.स्टेट बँकेने आज सर्व शाखांना आदेश द्यावेत की शेतकऱ्यांकडून सक्तीची कर्जवसुली करू नये अन्यथा अधिकाऱ्यांना आज कामकाज करू देणार नाही असा इशारा सुद्धा बच्चू कडू यांनी दिला आहे.

# महिलेचा जीव वाचवताना चालकाचे नियंत्रण सुटले!



**भरधाव कार यशोदानगरात थेट ट्रकवर आदळली; सुदैवाने जीवितहानी नाही**

**अमरावती/प्रतिनिधी :- :** शहरातील यशोदानगर परिसरात शुक्रवारी दुपारी एक धक्कादायक अपघात घडला. भरधाव आलेली कार थेट ट्रकवर आदळली, मात्र सुदैवाने चालकाचे प्राण वाचले. कारचे मात्र मोठे नुकसान झाले असून, अपघातानंतर परिसरात एकच खळबळ उडाली. ही घटना चपराशीपूरा मार्गावरील फॉरेस्ट कॉलनीजवळील स्मशानभूमीसमोर दुपारी २ वाजताच्या सुमारास घडली. घटनास्थळी मोठ्या प्रमाणावर नागरिकांनी एकच गर्दी जमली होती. प्राथमिक माहितीनुसार, रस्त्याच्या मधोमध अचानक एक महिला आल्याने चालकाने तिला वाचवण्याचा प्रयत्न केला. त्यामुळे वाहनाचे नियंत्रण सुटले आणि कार रस्त्याच्या कडेला उभ्या ट्रकवर जोरात आदळली. धडकेचा आवाज इतका मोठा होता की परिसरातील नागरिक तात्काळ घटनास्थळी पोहोचले. स्थानिकांनी तात्काळ मदत करत चालकाला बाहेर काढले. कोणतीही जीवितहानी झाली नसली तरी कारचे पुढचे अवघे भाग क्षतिग्रस्त झाला आहे.

## ■ नो पार्किंग झोनची मागणी तीव्र

यशोदानगर परिसरात शाळा, कॉलेज असल्याने विद्यार्थ्यांची वर्दळ मोठ्या प्रमाणात असते. अशा ठिकाणी ट्रकसारखी अवजड वाहने रस्त्याच्या कडेला उभी राहिल्यास अपघाताची शक्यता वाढते, असा संताप स्थानिकांनी व्यक्त केला आहे. या पार्श्वभूमीवर वाहतूक शाखेने या मार्गावर 'नो पार्किंग झोन' घोषित करावा, अशी जोरदार मागणी होत आहे. अवजड वाहनांच्या बेकायदेशीर पार्किंगमुळे शहरात अपघाताचे प्रमाण वाढत आहे, असा आरोप नागरिकांकडून करण्यात आला आहे.

# कचऱ्या सह भीम ब्रिगेड कार्यकर्ता धडकले मनपावर - पोलिसांनी रोखला मोर्चा

## शहरात वाढलेल्या घाणीच्या साम्राज्यामुळे आक्रोश






**अमरावती/प्रतिनिधी : -** शहरातील विविध भागांमध्ये घाणीचे साम्राज्य पसरलेले आहे. यामुळे नागरिकांच्या आरोग्याला धोका निर्माण झालेला आहे. वाढत्या घाणीमुळे संतापलेल्या भीम ब्रिगेड पदाधिकाऱ्यांनी आज शुक्रवार ४ जुलाई रोजी कचरा घेऊन महापालिका कार्यालयात धडक दिली. पोलिसांनी त्यांचा मोर्चा रोखला. तरीपण कार्यकर्ता मनपामध्ये घुसले आणि त्यांनी येथे कचरा फेकला. मनपा कंत्राटदार हाय हायचे नारे लावण्यात आहे. जबरदस्त आक्रोश पदाधिकाऱ्यांनी यावेळी व्यक्त केले. मनपा आयुक्त सोम्या शर्मा ला दिलेल्या निवेदनात म्हटले की शहरात सर्वत्र स्वच्छता कंत्राटदारांची मनमानी सुरू आहे. कुठल्याही प्रभागात स्वच्छता दिसून येत नाही. कचरा ☞(पान २ वर)

## ■ आयुक्तांनी दिले कारवाईचे निर्देश

भीम ब्रिगेड पदाधिकाऱ्यांच्या आंदोलनाची दखल घेत मनपा आयुक्त सौम्या शर्मा यांनी कार्यवाहीचे निर्देश दिले. त्यांनी परिसरात साफसफाई सह धुवारणी फवारणी करण्याचे आदेश दिले. त्यासह सार्वजनिक शौचालयाची दुरुस्ती करण्याचे आदेशही त्यांनी दिले.

# पुणे-अमरावती एक्सप्रेसच्या शौचालयात प्रवाशाचा आढळला मृतदेह

## प्रवाशांमध्ये उडाली खळबळ



अकोला / अमरावती (दि. ४ जुलै) : पुणे-अमरावती एक्सप्रेसच्या शौचालयात एका प्रवाशाचा मृतदेह आढळल्याने अकोला रेल्वे स्थानकावर एकच खळबळ उडाली. मृत इसमाचे नाव रमेश महादेवराव चौधरी (रा. अमरावती) असे आहे. प्राप्त माहितीनुसार, ☞(पान २ वर)

# रमेशचंद्र चौधरी यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार

**अमरावती/प्रतिनिधी :-** जनमाध्यम चे स्तंभलेखक व ज्योतिष्यकार माजी मुख्याध्यापक रमेशचंद्र चौधरी यांचे काल अकस्माक निधन झाले. ते ७६ वर्षांचे होते. आज दुपारी १२ वाजता त्यांच्या पार्थिवावर अंबाघाट येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. रमेशचंद्र चौधरी अमरावतीला येण्यासाठी पुणे अमरावती एक्सप्रेस ने काल पुण्यावरून निघाले होते. त्यांचा मुलगा राहुल ने त्यांना बी २ कोचमध्ये पुण्यावरून बसून दिले होते. मात्र अकोल्याजवळ ती गाडी पोहोचण्याच्या बेतात असताना शौचालयास गेलेले रमेशचंद्र चौधरी यांना ☞(पान २ वर)

# एसी वायर व पाईप चोरणारे गजाआड

## आरोपींकडून २.६५ लाखांचा ऐवज जप्त



**अमरावती/प्रतिनिधी :-** सिटी कोतवाली पोलिसांनी यशस्वी कामगिरी करत एसी व आरआर कंपनीचे वायर बंडल व पाईप चोरणाऱ्या दोन कुख्यात आरोपीयांना अटक केले. आरोपींकडून २ लाख ६५ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. अटक आरोपींमध्ये अशिलदास सुरशेल पवार (२२, राजुरा बेडा ) व विक्की दिलीप भोसले (२५,बैलोलपूर ) यांचा समावेश आहे. १ जुलै रोजी इंजिनिअर अभिषेक सुनील ढोके (२६,नागपूर) यांनी पोलिसात तक्रार दिली होती की त्यांच्या कंपनीचे शहरामध्ये एसी बसवण्याच्या साइटवर काम चालू आहे. त्याकरिता ४ जून रोजी नागपूर वरून अमरावतीला साहित्य पाठवले होते. संपूर्ण साहित्य गुलशन टॉवरच्या मागे कोठारी यांच्या गोडाऊन मध्ये ठेवले होते. ३० जून रोजी मॅनेजर यांनी कंपनीला फोन करून माहिती दिली की गुलशन टॉवरच्या मागे गोडाऊन मध्ये साईट वरचे कंपनीचे वायर बंडल, एसीचे कोपर पाईप एकूण चार प्रकारचे ५२० फुटाचे व कम्युनिकेशन केबल ३०२ फुट तसेच आरआर कंपनीचे वायर बंडल व एसी कॉपर पाईप असा १ लाख ९२ हजार ७६५ रुपयांचा साहित्य चोरीला गेले आहे. पोलिसांनी तत्काळ गुन्हा दाखल करून गोडाऊनची पाहणी केली साईट मॅनेजर यांना विचारपूस करून चोरीची माहिती घेतली. चोर गोडाऊनच्या खिडकीचे ग्रील तोंडून आत मध्ये घुसले होते. त्यांनी तिथून एसी वायर व कांपर वायर पाईप चोरून नेले होते. या प्रकरणात गुप्त माहितीच्या ☞(पान २ वर)




# वृक्ष लागवडीची बनवा बनवी, त्याच ठिकाणी झाडे लावा-लावी

## प्रकरण दडपण्याचा वनविभागात प्रकार सुरू



**अचलपूर/प्रतिनिधी :-** पावसाळ्यात दरवर्षी आपण बघतो की सामाजिक वनीकरण व वनविभाग जण सामान्य यांना संदेश देतो की झाडे लावा-झाडे जगवा पण गेल्या २ वर्षापासून वनविभागच्या भ्रष्ट अधिकारी मुळे /अवैध वृक्षतोड प्रति आदिवासी पर्यावरण संघटन पदाधिकारी व वृक्षप्रेमी वनविभागाला संदेश देत आहे की झाडेतर लावाच-पण जुनी झाडे अगोदर जगवा जेणे करून आपला परिसर-हिरवा परिसर राहील. २०२३-२४ मधे वनपरिक्षेत्र वनविभाग परतवाडा यांनी मौजा गोंडवाघूली व वागडोह येथे मोठ्या थाटामटात १६००० झाडे लावली होती पण ती सर्व झाडे एका वर्षातच मेली, मग पुन्हा चौकशी भीती पोटी अगदी त्याच जागेवर एप्रिल मधील हाय तापमानात इतभर गड्डा करून झाडे लावली ती सुद्धा सर्व झाडे मेली. मग पुन्हा सीसीएफच्या नोटीस मुळे डिएफओ पाटील यांच्या २९ जून २०२५ सकाळी सकाळी झालेल्या ढाबा पार्टी मध्ये गुरुमंत्र ☞(पान २ वर)













